# माणूस

१४ मार्च १९७० ८० पैसे

आजवर ' मुंबई बंद 'चा कार्यक्रम कामगारवर्गाकडून, या वर्गाच्या संघटनांकडून सामान्यतः योजला गेला. त्यामुळे त्याचे यश फार मर्यादित असे. या वेळी दोन मार्चला ' मुंबई बंद '............



# दोन मार्च……

आजवर 'मुंबई बंद'चा कार्यक्रम कामगारवर्गाकडून, या वर्गाच्या संघटनांकडून सामान्यत: योजला गेला. त्यामुळे त्याचे यश फार मर्यादित असे. या वेळी दोन मार्चला 'मुंबई बंद' मालकवर्गानेच उचलून धरल्याने यशाची जवळजवळ अगोदरच निश्चिती झालेली होती. गिरण्या आदल्या दिवशी रविवार असूनही चालू ठेवण्यात आलेल्या होत्या. सोमवारी दोन मार्चला मुंबईचे जीवन थंडावणे त्यामुळे अपरिहार्यच होते.

दुसरा महत्त्वाचा विभाग सरकारी कर्मचारी. महाराष्ट्र शासनालाच बंद हवे होते. त्यामुळे कामावर न जाणाऱ्यांवर काहीही कारवाई होण्याची भीती नव्हती. मुख्यमंत्री नाइकांनी बंद मागे घेण्याविषयी शिवसेनाप्रमुखांना आवाहन केलेले असले, तरी तो एक लटका देखावा होता. यावर कुणीही विश्वास ठेवीत नव्हता.

गिरण्यांप्रमाणेच सरकारी कारभारही पूर्वयोजनेनुसार बंद ठेवला गेला.

बंद शांतपणे पार पडावा, दंगली होऊ देऊ नयेत, झाल्याच तर त्या कठोरपणे मोडून काढल्या जाव्यात ही काळजी मात्र मुख्यमंत्र्यांनी घेतलेली होती. कारण इथे त्यांच्या अब्रूचा प्रश्न होता. गेल्या फेब्रुवारीच्या दंगली त्यांना फार महागात पडलेल्या होत्या. देशभर नाचक्की झालेली होती. ही चूक या वेळी कुठल्याही परिस्थितीत ते करू इच्छित नव्हते. शिवसेनेच्याही हे पथ्यावरच पडणारे होते. गेल्या फेब्रुवारी दंगलीची शिवसेनाप्रमुखांनीही दहशत घेतलेली नव्हती काय ?

मालक-सरकार-शिवसेना या त्रिकोणाशिवाय आणखी एक घटक या कार्यक्रमाला अनुकूल होता. सर्वसामान्य मराठी लोकभावना. म्हैसुरी नेत्यांच्या निरर्गल, असभ्य प्रलापांमुळे मराठी मन चिडलेले,

मलपृष्ठ १ वर…

१४ मार्च १९७०

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक एकेचाळीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ८० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

प्रिय माजगावकर

'मौजे गांधीनगर' या माणूस मधील चालू लेखमालेतील, 'समाजवादाचा निळा पक्षी', 'साबरमती' (श्री. ज. जोशी) व 'अडीच ते अडीच' (वि. शं. पारगावकर) हे पाठोपाठचे लेख अतिशय सरस वाटले. लेखकांचे अभिनंदन.

'अडीच ते अडीच' हा वि. शं. पारगावकरांचा आँखो देखा हाल, अतिशय बोलका आहे. या लेखामधील मला आवडलेली गोष्ट म्हणजे श्री. पारगावकर यांच्या या वार्तापत्रात, वैचारिक मंथनाचे कसलेही उसने अवसान नाही. वार्तापत्राच्या या सुंदर 'पोता'बद्दल श्री. पारगावकर यांचे खास अभिनंदन.

कै. बाळूकाका कानिटकर यांच्या चिरंजिवांचे पत्र व श्री. ज. जोशी यांचा खुलासा वाचला. या खुलाशात श्री. ज. जोशी लिहितात–"कै. बाळूकाकांना पुढारीपणाची झळाळी प्राप्त झाली नव्हती. कर्तृत्व व नशीब, या दोन गोष्टींवर ते अवलंबून असते. एवढेच सांगून श्री. ज. थांबत नाहीत; तर पुढे असे सांगतात की कै. बाळूकाकांनी काही स्वार्थ व लबाडीने देशभक्ती केली असती, तर त्यांना पुढारीपण मिळाले असते.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

श्री. ज. हे सर्व काही सोपे करून सांगण्याच्या पद्धतीने हे जे लिहितात त्याच्याशी मी सहमत नाही. कर्तृत्व निराळे, त्याग निराळा व नेतृत्वाची प्रतिभा ही निराळी. कितीही मोठा त्याग पाठीशी असला अथवा नशिबाने कितीही हात दिला तरी नेतृत्वाची प्रतिभाच नसेल तर ते नेतृत्व मिळवता येत नाही. चुकून लाभले तर ते टिकत नाही. विचारांची स्पष्टता हे या प्रतिभेचे प्रमुख अंग असते. यश, अपयश हा भाग यात येत नाही. श्री. नानासाहेब गोरे हे फार यशस्वी पुढारी नाहीत. परंतु शनिवारवाड्यापुढील सभा असो किंवा अगदी छोटासा समारंभ असो श्री. गोरे किती तर्कशुद्ध–तारतम्याने बोलतात याचा अनुभव सर्वांना असेल.

कै. बाळूकाकांजवळ नेतृत्वाचा हा आवश्यक गुण होता काय ? मी त्यांचे भाषण एकदाच ऐकले. वीस वर्षांपूर्वी 'कानिटकर-कुल वृत्तांता 'च्या प्रकाशन समारंभात अध्यक्ष म्हणून कै. बाळूकाका बोलले. ते म्हणाले–

'देशाची फाळणी झालेली आहे. अशा वेळी सर्व कानिटकर मंडळी आज संघटित होत आहेत हे पाहून मला आनंद होतो. ठिकठिकाणी अशी माणसे एकत्र आली की अखंड हिंदुस्तान व्हायला वेळ लागणार नाही.'

दुसरे उदाहरण स्वा. सावरकरांचे. नुकतेच दिवंगत झालेले प्रसिद्ध पत्रकार लुई फिशर व सावरकर यांच्या भेटीचा प्रसंग. लुई फिशर म्हणाले–

'इंग्रज देश सोडून गेले तर हिंदू व मुसलमान यांच्यात यादवी होईल. १७६१ मध्ये पानिपतावर काय झाले याचा हिंदूंनी विचार करावा..."

साहेबाला क्षणाची उसंत न देता स्वातंत्र्यवीर म्हणाले–

'१७६१ चे काय सांगता ? अगदी काल परवा तुमचे डंकर्क झालेले आम्ही पाहिले आहे. म्हणून तुम्ही हिटलरपुढे शरणागती दिली की काय ? 'डंकर्क' किंवा 'पानिपत' हा काही इतिहासातील अखेरचा शब्द नाही.'

नेतृत्व हे असे प्रतिभावान असते. एखादे वाद्य लावून ठेवलेले असावे तसा काहीसा हा पुरुष असतो. सहज बोटे पडली तरी सुरावरच बाहेर पडायची. त्यागाचे महत्त्व कमी नाही व त्यागी माणसाची उपेक्षाही समाजाकडून होता कामा नये. परंतु त्यागी पुरुष हा नेता होईलच असे नाही.

कै. न. वि. गाडगीळ, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, यशवंतराव चव्हाण, स. का. पाटील ही सर्व मंडळी नेतृत्व निरवणारी होती किंवा आहेत याचे कारण नेतृत्वाची प्रतिभा या सर्वांच्या ठिकाणी कमीअधिक प्रमाणात निश्चित आहे. तुम्हांला काय वाटते ?

फेब्रुवारी, २१ –वि. ग. कानिटकर

सप्रेम नमस्कार

आपण विचारलेत म्हणून लिहितो. नाहीतर समक्ष भेटीत यासंबंधी बोलू शकलो असतोच.

नेतृत्व हा एक वेगळा, स्वतंत्र गुण आहे

हे आपले म्हणणे सर्व काही सोपे करून सांगण्याच्या पद्धतीचेच एक उदाहरण आहे. यात अमान्य करण्यासारखे काय आहे? पण 'विचारांची स्पष्टता हे नेतृत्वप्रतिमेचे प्रमुख अंग असते' या आपल्या पुढील विश्लेषणाबाबत मात्र थोड लिहिण्यासारखे आहे. मी आपल्या या मताशी सहमत नाही.

नेहरूंची विचारसृष्टी सावरकर-गोरे यांच्याप्रमाणे ठाम व स्पष्ट नव्हती. गांधीजींचा 'आतला आवाज' तर प्रसिद्धच होता. आपण दिलेल्या बाळूकाकांच्या विचारांइतकेच तर्कदुष्ट विचार गांधीजींनी अनेकदा मांडलेले आहेत. बाळूकाकांनी फाळणीचा व कानिटकर कुलाचा संबंध जोडला. गांधीजींनी ब्रह्मचर्य आणि फाळणी यांचे लग्न लावलेले आहे. तरीपण या दोघांनी भारतीय जनतेचे निरंकुश नेतृत्व पन्नास-एक वर्षे केलेच ना? अशी अनेक उदाहरणे देता येतील.

नेतृत्व हे मूलतः भावनोद्दीपक असते. याचा अर्थ भावना व विचार यांची पूर्ण फारकत असते असा नाही. पण विचारांपेक्षा भावनांचे आवाहन नेतृत्वात अधिक प्रभावी असते इतकेच. स्वातंत्र्यपूर्व काळात 'देशासाठी त्याग' ही लोकभावना होती. सावरकर-गोरे-गाडगीळ यांच्याप्रमाणेच बाळूकाका, हरिभाऊ फाटक, सेनापती बापट, शंकरराव देव हीही या लोकभावनेची प्रतीके होती. कमीजास्त प्रमाणात यापैकी प्रत्येकामागे अनुयायी वर्ग होता. मुळशी-सत्याग्रहाचा काळ आठवा. वैचारिक स्पष्टता, तर्कशुद्ध, तारतम्यपूर्ण लिहिणे-बोलणे-वागणे, शिवाय टिळकांची पूर्वपुण्याई–हे सर्व असूनही तात्यासाहेब केळकरांचे नेतृत्व मागे पडले. बाळुकाका-शंकरराव देव पुढे सरसावले. कारण देशासाठी त्याग ही भावना या गांधीवाद्यांनी अधिक उत्कटपणे व्यक्त केली. स्वातंत्र्योत्तर काळात परिस्थिती बदलली. सत्ता आणि संपत्ती हे लोकांच्या आकर्षणाचे मुख्य विषय झाले. त्यामुळे 'वैचारिक स्पष्टता' असूनही सावरकर-गोरे मागेच पडले. सत्ता आणि संपत्ती यांचे वाटप करू शकणारे पुढे आले. सत्तेची अभिलाषा हे या काळातील नेतृत्वगुणाचे प्रमुख अंग आहे.

पूर्वी त्यागाची अभिलाषा असणारे लोकांचे नेतृत्व करू शकले, त्यांच्या कौतुकादरप्रेमाचे विषय ठरले. आता प्रखर सत्ताभिलाषा असणारेच यशस्वी नेते ठरू शकतात. वैचारिक स्पष्टतेपेक्षा ही अभिलाषा दोन्हीकडे महत्त्वाची आहे. मूलभूत आहे.

सत्ताभिलाषा जशी विकृत स्वरूप घेऊ शकते तशीच त्यागाभिलाषेची गत अनेकदा होत असते. गांधीवाद्यांमध्ये अशी विकृती आपणास आढळत किंवा आढळली असल्यास त्याबाबत मला काही म्हणायचे नाही. शेवटी आपल्यापैकी प्रत्येकजण माणूसच असतो.

सावरकरांच्या नेतृत्वातील उत्कट त्यागाभिलाषा वगळा आणि आपण दिलेल्या फिशर संभाषणाचा परिणाम काय शिल्लक उरतो ते सांगा. एक आक्रमक, तिखट हजरजबाबीपणा. फार

तर एका यशस्वी वकिलाला अवश्य असणारा गुण. गोरे आपण म्हणता तसे स्वयंभूव तारतम्याने जरूर बोलतात. पण हा प्राध्यापकाचा विशेष आहे. त्याचधानाने तर्कतारतम्य वगळून बोल-णाऱ्या एस्. एम्. च्या नेतृत्वाचे आवाहन अधिक प्रभावी होते व काही प्रमाणात आजही आहे, हे मला वाटते आपण मान्य करू शकाल. एस्. एम्. नी अधिक बेभान-पणे स्वातंत्र्य आंदोलनात स्वतःला झोकून दिलेले होते. त्यांची त्यागाभिलाषा अधिक उत्कट होती. भावनावेग तीव्रतर होता.

आपण असे बाळूकाकांचे एक भाषण पत्र नोंदवले तसाच मी एक त्यांचा प्रसंग, थोडे विषयांतर करून येथे नोंदवतो. गांधीखुनानंतरचा दुसरा दिवस. नारायण पेठेतून जमाव वर टिळक रस्त्याकडे जाळपोळीसाठी निघाला होता. बाळूकाका घरी आजारी असल्याने अंथरुणावर निजून होते. लघवी काढण्यासाठी नळी घातलेली होती. जमाव चित्रशाळा चौकापर्यंत आला. बाळुकाकांना हे कोणीतरी सांगि-तले. त्या अवस्थेत त्यांनी नळी बाहेर काढली आणि तिरीमिरीने चालत ते जमावासमोर उभे राहिले. 'तुम्हाला ब्राह्मणांची घरे जाळायची आहेत ना? चला तर मग. प्रथम माझे घर जाळा. मी तयारीच आहे'—बाळूकाकांनी त्या प्रक्षुब्ध जमावाला हे सांगून आवरले.

जमाव बाळूकाकांना डावलून पुढ जाऊ शकला नाही. दुसऱ्या वाटेने तो नंतर गेला हे वेगळे. वैचारिक स्पष्टता अस-णारे तारतम्यवादी दारेखिडक्या लावून लपून बसलेले होते, तेव्हा हा 'विक्षिप्त म्हातारा' खवळलेल्या जमावासमोर उभा राहून, गांधीवादीपद्धतीने प्रति-कारही करतो, यात काही नेतृत्वगुण आपल्याला आढळत नाहीत का?

मला हा प्रसंग सांगणारी व्यक्ती हयात आहे. मी खोदून विचारून या प्रसंगाच्या सत्यतेबद्दल खात्री करून घेतलेली आहे. तूर्त येथेच थांबू.

लेखमाला आवडल्याचे आपण पत्राने कळविलेत याबद्दल आभारी आहे. जोशीबुवांचा 'निळा पक्षी' चांगलाच आहे. पारगावकरांच्या 'अडीच हे अडीच' बद्दल तर मी घरी जाऊन त्यांचे अभिनंदन केलेले आहे. साहित्यिकांनी सामाजिक जीवनात मिसळावे, गर्दीशी नाते जोडावे, दलित आणि ललित यांच्यातील कृत्रिम दरी कशी व्हावी, सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्यासाठी तरी या उभयतांनी एकमेकांच्या जवळ यावे असा 'माणूस'चा पहिल्यापासूनचा प्रयत्न आहे. कधीकधी त्याला असे यश येते.

आपला

श्री. ग. माजगावकर

# बंद....

'दोन मार्चला मुंबई बंद! बंद म्हणजे एकदम बंद! रस्त्यावर एक वाहनही दिसता कामा नये.'

शिवसेनेचे 'सरसेनापती' श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी आठ फेब्रुवारीच्या 'हुतात्मा दिनी' परळच्या भोईवाडा मैदानावर घोषणा केली आणि आजपर्यंत कधीही पाहिला नव्हता असा बंद दोन मार्चला मुंबईने अनुभवला. मुंबईच्या दक्षिण टोकातल्या कुलाब्यापासून तो उत्तरेला थेट कल्याणपर्यंत त्या दिवशी काही तास एक वाहनदेखील बाळासाहेब ठाकरे यांच्या परवानगीशिवाय रस्त्यावरून फिरत नव्हते. पोलिसांच्या गाड्या, पत्रकारांची वाहने आणि शिवसेनेचे ध्वज लावलेल्या गाड्या. बस्स! बाकी सारा शुकशुकाट. दुकाने-हॉटेले तर अपवादालाही उघडी नव्हती. त्या दिवशी मुंबईत राज्य होते ठाकरे यांचे.

शिवसेनेचा बंद कार्यक्रम एवढ्या प्रचंड प्रमाणावर यशस्वी झाला याचे थोडे श्रेय 'सरसेनापती' बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबरच सरकारचेही. नाही तरी बरेच लोक कुचेष्टेने 'सरकारी बंद' म्हणून नावे ठेवतातच. पण खरोखरच बंद शांततेने पार पडला याचं मोठं श्रेय सरकारचंच. माझ्या माहितीप्रमाणे स्वतः मुख्य-मंत्र्यांनी पुढाकार घेऊन मुंबईतल्या गिरणी मालकांना आणि इतर कारखानदारांना रविवारी कारखाने उघडे ठेवून सोमवारी दोन मार्चला सुट्या देण्याचा सल्ला दिला. अशा रीतीने मुंबईतला सुमारे पाच ते सात लाख कामगार त्या दिवशी घरी राहिला. बंद शांततेने पार पडायला या गोष्टीचा मोठाच हातभार लागला. संघटित असलेले कामगार एकदा गिरणीतून घोळक्यांनी बाहेर पडल्यावर त्यांना आवरणे कठीण असते.

शिवसैनिकांनी शांततेच्या शपथा घेतल्या होत्या हेही खरे. शिवसैनिकांची बाळा-साहेब ठाकरेंवर निष्ठाही मोठी आहे. पण चळवळीच्यावेळी जाळपोळ, लुटालूट करणारे लोक चळवळीतले निष्ठावान कार्यकर्ते कधीच नसतात. ते कुणी भलतेच असतात. मग दोन मार्चला एवढी अभूतपूर्व शांतता कशी होती? लुटालुटीचा आणि जाळपोळीचा एकही प्रकार घडला नाही.

बंद कार्यक्रमाच्या दोन दिवस अगोदर मुख्यमंत्री नाईक आणि ठाकरे यांची बैठक झाली होती. नाइकांनी ठाकरेंना बंद मागे घेण्याचे आवाहन केले होते. पण ठाकरे म्हणाले, 'तुम्हाला शांतता टिकेल की नाही याचीच भीती वाटते ना? तुम्ही काळजी करू नका. आमचा बंद शांततापूर्ण आहे. माझे शिवसैनिक माझ्या शब्दाबाहेर नाहीत.'

'अहो, पण कुठे जाळपोळ, लुटालूट झाली तर महाराष्ट्राचं नाव...' मुख्य-मंत्र्यांनी भीती व्यक्त केली.

'एवढंच ना ? मी सांगतो तसा प्रकार कुठे होणार नाही. कुठे झाला तर ते बाहेरचे शिवसैनिक नसतील.'

'ठीक आहे. कुठे असा प्रकार घडला तर मग आम्ही आमचे उपाय योजू–'

आणि वार्ता अशी आहे की पोलिसांना हुकूम गेले, दुकाने लुटताना कोणी दिसले तर सरळ गोळ्या घाला !

ज्या बेळगावच्या प्रश्नावर हा बंद आयोजित केला होता तो अर्थातच सर्वच विरोधी पक्षीयांच्या आणि राज्यकर्त्या कॉंग्रेसच्याही जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. पण शिवसेनेसारख्या संघटनेने चालविलेल्या चळवळीत सक्रीय भाग घेणे या पक्षांना थोडे अपमानास्पद वाटत होते. पण तरीही शेवटच्या दिवसापर्यंत एक डावे कम्युनिस्ट सोडले तर जवळ जवळ सर्व पक्षांनी रडतकढत का होईना पण आपला पाठिंबा व्यक्त केला होता. निदान विरोध तरी करायचा नाही असे ठरविले होते.

काही लोक याचे बरेचसे श्रेय महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील यांनाही देतात. बेळगावच्या प्रश्नावर दिल्लीवर दबाव आणण्याची राज्यकर्त्या कॉंग्रेसचीही इच्छा होतीच. त्यासाठी दोन मार्चचा बंद शांततामय आणि यशस्वी होणे आवश्यक होते. बंदच्या सुमारे एक आठवडा आधी वसंतरावांनी दिल्लीला हवाई उड्डाण केले. तिथे त्यांनी कुणाशी गाठीभेटी घेतल्या आणि काय बोलणी केली कुणास ठाऊक. पण लगेच दिल्लीहून डांगे, मधू लिमये यांचे मुंबईच्या आपापल्या पक्ष शाखांना फोन आले–बंदला पाठिंबा द्या. मुंबईच्या कामगार संघटनांवर या दोन पक्षांची पकड जबरदस्त आहे. परिणामी संपूर्ण महाराष्ट्र समितीने बंदला पाठिंबा देणारा ठरावच केला. सं. सो. पा. ने आपले तोंड वाचवण्यासाठी समितीच्या या सभेवर बहिष्कार टाकला आणि वेगळा ठराव केला– 'बेळगावच्या कारणाला पाठिंबा आहे. बंदला विरोध नाही. पण शिवसेनेसारख्या संघटनेच्या खांद्याशी खांदा लावणार नाही.'

बंदची 'श्रेयनामावली' देण्यात शिवसेनेचे श्रेय कमी करण्याचा हेतू मुळीच नाही. बंदच्या अगोदर दोन-तीन दिवस जे मुंबईत होते त्यांना हे पटणार नाही. मुंबईची सारी दुकाने, हॉटेले त्या दिवशी बंद राहिली याचे कारण शिवसेनेने निर्माण केलेला जबरदस्त दरारा. मागच्या फेब्रुवारीच्या दंगलीत झालेली लुटालूट आमच्या लोकांनी केली नाही असे शिवसेनेचे लोक सांगतात. पण दुकानदारांना आणि हॉटेलमालकांना भरवसा नाही. फेब्रुवारी ६९ च्या दंगलींची प्रचंड छाया या बंदवर पडली होती. आणि या दंगलीमुळे शिवसेनेने केवढे प्रचंड सामर्थ्य कमावले आहे याचे प्रदर्शनच २ मार्चच्या बंदमध्ये झाले. शेवटी सामर्थ्य–सामर्थ्य कशातून येते ? बर्ट्रांड रसेलच्या म्हणण्याप्रमाणे राजकीय, आर्थिक आणि भौतिक सामर्थ्य कमावण्याला शारीरिक (संघटित अथवा लष्करी) ताकदीचा पाया आवश्यक आहे. बाळ ठाकरेंच्या एका शब्दासरशी मुंबई हलू लागते याचे कारण त्यांनी आपल्या मुठीतला जोर गेल्या फेब्रुवारीत दाखवला होता.

श्री. ठाकरे यांनी एवढी ताकद कशी कमावली याचाही थोडक्यात आढावा घेणे अप्रस्तुत होणार नाही. श्री. ठाकरे मुंबईतल्या आणि महाराष्ट्रातल्या बेकार तरुणांची साधी भाषा बोलतात. त्यांच्या भाषणात औपचारिकपणा, दांभिकपणा नसतो. तुम्ही–आम्ही आपापसात ज्या शब्दांमध्ये बोलू तीच भाषा ते भाषणात वापरतात. आणि ते तरुणांना एकदम पटते. ठाकऱ्यांची मते कुणाला पटोत वा न पटोत; पण त्यांचे हे गुण मान्य केलेच पाहिजेत. शिवसेना निर्माण झाली ती नोकऱ्यांमध्ये मराठी तरुणांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी. तेव्हा तो प्रश्न निकडीचा होता. श्री. ठाकरे यांनी मराठी तरुणांच्या नेमके नाडीवरच बोट ठेवले होते. साऱ्या राजकीय पक्षांचे तरुणांकडे दुर्लक्ष झाले असताना त्यांनी त्यांच्या हृदयालाच हात घातला आणि त्यांची निष्ठा जिंकून घेतली.

मराठी लोकांसाठी नोकऱ्यांची शिवसेनेने हाती घेतलेली चळवळ बऱ्याचशा प्रमाणात आता यशस्वी झाली आहे सरकारी आणि खाजगी नोकऱ्यांमध्ये आता स्थानिक माणसांना प्राधान्य मिळू लागले आहे. मुंबईत आणि महाराष्ट्रात नव्याने निघत असलेल्या कारखान्यात कटाक्षाने मराठी कामगार मोठ्या प्रमाणावर भरती केले जाऊ लागले आहेत. उदाहरणच द्यायचे झाले तर पुण्याच्या टेल्कोचे. (कुशल मराठी कामगार हव्या त्या प्रमाणात मिळत नाहीत ही गोष्ट आलाहिदा) अशा परिस्थितीत शिवसेनेची चळवळ जिवंत ठेवायला कोणते तरी कारण हवे होते. आणि ठाकऱ्यांनी घोषणा केली 'बेळगावचा प्रश्न शिवसेनाच धसास लावील.'

बेळगावच्या प्रश्नावर वर्षानुवर्षे टाचा घासत असलेली विचारी संपूर्ण महाराष्ट्र समिती आणि दर विधानसभेच्या अधिवेशनात त्या प्रश्नावर शिरा ताणताणून भाषणे ठोकणारे विरोधी पक्षांचे आमदार! त्यांना जे साधले नाही ते शिवसेनेने एका वर्षात करून दाखवले. आणि बेळगावच्या प्रश्नावर जो हवा निर्माण झाली आहे त्याचे श्रेय शिवसेनेलाच आहे हे कुणी नाकबूल करील काय? मागे एक नोव्हेंबरपर्यंत बेळगावचा प्रश्न सुटला नाही तर काळा दिवस पाळण्याची धमकी ठाकरेंनी दिली होती. त्या वेळी इंदिरा गांधींनी खास निरोप पाठवून आंदोलन पुढे ढकलण्याविषयी ठाकरेंना सुचवले होते. संपूर्ण महाराष्ट्र समिती या काळात का गप्प बसली होती? की त्यांची ताकद संपली?

श्री. ठाकरे यांच्या पोतडीत आणखी काही मंत्र आहेत की त्या योगे ते मुंबई-तील तरुणांना हाताशी धरू शकतात. शिवसेनेचा कम्युनिस्टविरोध सर्वश्रुतच आहे. कम्युनिस्टांचा उल्लेख ठाकरे 'लाल अवलाद' असा करतात आणि त्यांना ठेचून काढण्याची भाषा वापरतात. नुकताच त्यांचा रोख आता 'हिरव्या सर्पावर' आला आहे. आणि मुस्लिमांमध्येही शिवसेनेने दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. कल्याणच्या दुर्गाडीचे, महाडच्या महिकावतीचे प्रकरण त्यांनी चांगलेच पेटविले. त्यांच्या भाषणात ते आता हिंदुत्वाचा हिरीरीने पुरस्कार करतात. या दोन्ही विषयांवर फक्त ठाकरेच तरुणांना पेटवू शकतात.

मी इथे ठाकरे यांच्या तरुणांचा उल्लेख करतो तो मर्यादित आहे मुंबईचे सारेच मराठी तरुण ठाकऱ्यांचे भक्त नव्हेत. उच्च मध्यमवर्गातील तरुणांना ठाकऱ्यांचा फारसा आढा नाही. पण खालच्या मध्यमवर्गातील तरुणांवर आणि कामगार-वर्गातल्या तरुणांवर शिवसेनेचा जबरदस्त प्रभाव आहे. शिवसेनेच्या मोठ्या सभा पाहिल्या की याची प्रचीती येते.

'कोकणचे प्रश्न शिवसेनाच सोडवील--' अशी नवी हाक ठाकऱ्यांनी दिली आहे. एक छोटासा तुफानी कोकण दौराही ते नुकताच आटोपून आले आहेत. ज्याच्या अंगात काही करून दाखविण्याचे सामर्थ्य आहे, आत्मविश्वास आहे अशाच पुढाऱ्याच्या मागे लोक जातात. कोकणचे लोक शिवसेनेच्या मागे धावले तर त्यांना दोष देता येणार नाही. कारण अजूनपर्यंत तरी साऱ्या पुढाऱ्यांनी कोकणला अंगठेच दाखवले आहेत. बाळ ठाकरेंनी मात्र सांगितले आहे, 'कशाला लागता या पक्षांच्या मागे. शिवसेनेवर भरवसा ठेवा आणि बघा तुमचे प्रश्न सुटतात की नाही ते.' कोकणचा विषय श्री. ठाकऱ्यांची ताकद नक्कीच वाढवील आणि मुंबईच्या बाहेर त्यांना एक स्थान निर्माण करील.

मुंबईच्या मराठी माणसांच्या नोकऱ्यांच्या प्रश्नापासून तो कोकणपर्यंत असा हा शिवसेनेचा प्रवास आहे. पुढच्या सार्वत्रिक निवडणुकांपर्यंत आणखी अनेक विषय सेनेच्या कक्षेत येतील. फेब्रुवारीच्या दंगलीनंतर श्री. ठाकरे यांचे वजन वाढले. मार्च दोनच्या बंदने त्यांची प्रतिष्ठा वाढली. लोकांची भीती, सरकारचा पाठिंबा, विरोधी पक्षांचा पाठिंबा याही गोष्टींची बंद यशस्वी होण्यास मदत झाली असली तरी त्यामुळे प्रतिष्ठा वाढली ती मात्र श्री. ठाकरे यांचीच.

—वार्ताहर

# विराट मोर्चा....

ग्रामीण महाराष्ट्र सुखी व समृद्ध होत असल्याचा प्रचार करण्यात येत आहे. खरोखरच ग्रामीण महाराष्ट्र समृद्ध झाला आहे का?

या प्रश्नाचे उत्तर देणारा एक विराट मोर्चा डावे-उजवे कम्युनिस्ट पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष आणि लाल निशाण पक्षाच्या वतीने संघटित करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या या भूमिहीन शेतकऱ्यांना, शेत-मजुरांना आणि आदिवासींना भेटण्यासाठी म्हणून दि. ४ रोजी सकाळी ९॥ वा. मी दादर स्थानकावर उतरलो. खरं म्हणजे मला थोडा उशीरच झाला होता. कारण सकाळी ८॥ वाजल्यापासून ही सारी मंडळी जमणार होती. (काही मंडळी दि. ३

[पृष्ठ ३७ वर]



# मुक्ताफळे

## □ तिकिट घेउनि निजा !

'देशियेचेनि नागरपणे । शांतु श्रृंगाराते जिंगे । तरी ओविया होती लेणे । साहित्यासी ।।'– ज्ञानेश्वरमाऊलींनी साहित्यात केवळ अलंकार होऊन राहतील, अंगभूत सौंदर्याने मराठी भाषा जेथे श्रृंगारावरही मात करील, अशा ओव्या ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात लिहिल्या आहेत. ह्याच अध्यायात भगवान, अर्थात प्रत्यक्ष भगवानच, आपण कुठे कुठे आहोत हे सांगताना म्हणतात—

'छळितया विंदाणा । माजी जू ते मी विचक्षणा । म्हणोनि चोहटा चोरी पंचिकवणा । निवारू न ये ।।' अर्थ कळला नसेल ! याचा अर्थ भगवान म्हणतात, प्रत्यक्ष भगवान म्हणतात, की फसवणूक करण्याच्या कसबात, जुगार ही माझी विभूती आहे ; म्हणून जुगारात भर चव्हाटयावर मनुष्य नागवला गेला तरी त्याचे कुणी निवारण करू शकत नाही.

आता भगवान कृष्णांनी जो जुगार प्रत्यक्ष आपला म्हटला, त्याचे पुनरुत्थान महात्मा गांधी – फादर ऑफ दि नेशन – यांच्या जन्मशताब्दी वर्षात, महाराष्ट्र सरकारने केले तर तो गीताभक्त गांधीजींचा व मराठी भाषाभक्त महाराष्ट्र सरकार यांचा परस्पर गौरवच होय ! परंतु सरकारचा, लोकांची श्रीमंत होण्याची अपेक्षा वाढवणारा धर्मनिरपेक्ष कार्यक्रम काही विद्वानांना पसंत नसावा, याचे आम्हांस खरोखरच आश्चर्य वाटते.

डॉ. वि. म. दांडेकर यांनी 'इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल विकली' या नियतकालिकाच्या १९७० च्या वार्षिकात 'गव्हर्न्मेंट बाय गॅम्बलिंग' म्हणजे 'जुगाऱ्यांचे राज्य' हा जो लेख लिहिला आहे त्याचे प्रत्येक कॉंग्रेसवाल्याने खंडण केले पाहिजे. राज्यकर्त्यांचे 'मुंडण' होत असताना स्वस्थ बसणे आम्हांला तरी शक्य नाही. गांधीशताब्दी वर्षात, कॉंग्रेस सरकारने समाजवादाचे दोन प्रमुख कार्यक्रम पार पाडले. एक दारूबंदीचे वस्त्रहरण करून त्याचा 'बिकिनी' सूट केला आहे.

बिकिनी म्हणजे जे अंगावरचे वस्त्र असून नसल्यासारखे असते ते! त्याप्रमाणे म्हटली तर दारूबंदी आहे आणि म्हटली तर नाही, अशी मोठी पारदर्शक व्यवस्था सरकारने केली आहे. दुसरा कार्यक्रम म्हणजे भव्य प्रमाणावर 'सरकारी मटका'! ह्राही आता लोकमान्यता पावलेला आहे.

वस्तुत: लोकांवर कर वाढवून आणि परदेशी हात पसरून राज्य करणे हाच सरकारी कार्यक्रम असतो. जनतेकडून आता अधिक कर वसूल करणे शक्य नाही व एखाद्या कोलंबसाने नवा देश शोधून काढल्याखेरीज, आता आपल्या देशाला ज्ञाते देश कर्ज देणार नाहीत, यामुळे सरकारने जनता जुगाराचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर आखला व देशातल्या देशात पैसा निर्माण केला, याबद्दल सरकारचे आम्ही तरी अभिनंदन करू. श्रीमंतांच्या खिशाला धक्का न लावणारी व गरिबांच्या खिशातून भराभर नोटा बाहेर काढणारी ही विभूती म्हणज दारिद्रचमुक्तीचा 'अंगारा' होय!

इतर सरकारी योजनांचे काय झाले? फारसे चांगले झाले नाही. परतु लॉटरी ही सरकारी योजना असूनही, जनतेने ती डोक्यावर घेतली. इतकेच नव्हे तर सहकारी क्षेत्रातील अनेक दिवाणी दावे, हे ठिकठिकाणी कोर्टदरबारी लक्तरा-सारखे लोंबकळत असताना, जनतेत निर्माण झालेल्या 'लॉटरी सिंडिकेट' या उत्स्फूर्त सहकारी चळवळीचा तेजस्वी इतिहास व यामुळे रस्तोरस्ती आणि गल्ली-बोळातून निर्माण झालेले 'मटका महर्षी' यांची जीवनचरित्रे लोकांना सांगितली जातील तर ती पुढील पिढ्यांना चिरकाल स्फूर्ती देत राहतील.

इतर सहकारी क्षेत्रांत तोटा आला, तर ज्यांचे पैसे जातात ती माणसे आरडा-ओरडा करतात हा तर नित्याचा अनुभव. परंतु आमच्या माहितीतील कितीतरी शिक्षक – प्राध्यापक – कारकून – साधे नाही – अगदी सरकारकून – असे आहेत, की जे 'लॉटरी सिंडिकेट'मधून नेहमी एक रुपयाचे तिकिट घेतात व निकाल जाहीर होताच – वीस किंवा दहा नये पैसे घेऊन येतात! – हूं का चूं न करताना!! भारतीय जीवनात पसरत चाललेली ही नवी सोशिकता सहकारी चळवळीतील नवाच पैलू आहे.

महाराष्ट्रात मटका पसरत चालला होता. लोक मटकाधीन होत होते. यापासून जनतेला वाचवण्यासाठी सरकारने लॉटरी सुरू केली. असे असताना महाराष्ट्र सर-कारच्या लॉटरीपेक्षा 'मटका' अधिक चांगला हे विशद करताना डॉ. वि. म. दांडेकर लिहितात—

'मटका खेळणारा जुगारी ० ते ९ या दहा आकड्यांपैकी एका आकड्यावर रुपया लावतो. जर त्याचा अंक आला तर त्याला एका रुपयाचे नऊ मिळतात. म्हणजे गेला तर रुपया जातो. मिळाले तर नऊ मिळतात. म्हणून जर एखाद्या माणसाने नियमितपणे प्रत्येक आकडा एकएकदा लावला तर थोड्याच वेळात

त्याच्या हे लक्षात येईल की सर्वसाधारणपणे एका रुपयातली दहा टक्के रक्कम [दर वेळी रुपया जाऊन दहाव्यांदा नऊ आले तरी] त्याच्या खिशातून जाते. वर्षभरात लावलेल्या शंभर रुपयांतले ३५–४० रुपये असे गेले की त्याच्या लक्षात येईल, की अशा पद्धतीने श्रीमंत होणे शक्य नाही. आपला खेळ म्हणून, गंमत म्हणून 'मटका' खेळायचा असला तर खेळू !

'परंतु सरकारी लॉटरीत एका रुपयाचे, तीन लाख मिळायचे असतात ! यामुळे मटक्यापेक्षा लॉटरीचे आकर्षण जास्त असते. या कारणानेच 'मटका' खेळणाऱ्यांच्या कितीतरी पटींनी लोक लॉटरी खेळू लागले आहेत. शिवाय हा सरकारी मटका खेळल्याने अप्रतिष्ठा वगैरे होण्याचा प्रश्न नसतो. खासगी मटका हा नियमबाह्य असतो. पोलीस मटका चालवणाऱ्यांच्या अड्डयावर छापेसुद्धा घालतात आणि आकडा लावताना मनुष्य सापडला तर तुरुंगात वगैरे जायला लागते. सरकारी लॉटरी एकदम सुप्रतिष्ठित ! मुख्यमंत्री पहिले तिकीट राज्यपालांना विकतात आणि मग विक्री सुरू होते.

'सरकारी लॉटरीतील बक्षिसाची एकंदर रक्कम साधारणपणे १/३ असते. एकंदर २५ लाख जमा करतात आणि सुमारे ८ लाखांची बक्षिसे वाटली जातात. यावरून नेहमी लॉटरी खेळणाऱ्यांच्या हे ध्यानात यायला हवे, की सर्वसाधारणपणे रुपयातली २/३ रक्कम ही नक्की जायची असते. मटक्यात आज १/१० रक्कमच जाते.'

काय म्हणावे या विद्वत्तेला ! मटका वाईट होता म्हणून तो सरकारने अप्रतिष्ठित ठरवला हे डॉक्टरसाहेबांना सांगितले कुणी ? गवळणींच्या डोक्यावरील मटके फोडण्यात ज्याचे बालपण गेले, त्या भगवान श्रीकृष्णांनी विभूती म्हणून आपला म्हटलेला 'मटका' अप्रतिष्ठित होईलच कसा ! परंतु खासगी मटक्यातले लोणी, बिनसरकारी माणसे खात होती म्हणून सरकारने या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून, समाजवादाची वाटचाल भक्कमपणे सुरू केलेली आहे, असा सरकारी लॉटरीचा अर्थ आहे ! मटकेवाले सुप्रीम कोर्टापर्यंत गेले तर काय होईल हे आज सांगता येत नाही. मटकेवाल्यांना विद्वान माणसांनी अशी चिथावणी देणे योग्य आहे काय ? यात जनतेचा विचार नाही, समाजवादाचा नाही, हे डॉक्टरसाहेबांनी लक्षात ठेवावे.

या लेखात श्री. दांडेकर लिहितात की, लग्नप्रसंगी, लॉटरीची तिकिटे आहेर म्हणून देण्याची पद्धत सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांना बक्षिसेदेखील याच स्वरूपात आता मिळू लागतील. आम्ही तर म्हणतो लोकांनी शाळेची फी लॉटरीच्या तिकिटात द्यावी व सरकारी करदेखील लॉटरीच्या तिकिटांनी भरावे, म्हणजे शाळा व सरकार यांच्या तिजोऱ्या भरभरून वाहू लागतील व नव्या नव्या तिजोऱ्या बांधणे एवढा एकच उद्योग शाळा व सरकार यांना उरेल ! आणि एकदा का

शाळा व सरकार ही श्रीमंत झाली की शिक्षणाचा व पोटाचा प्रश्न एकदम सुटेल. पोट भरण्यासाठी शिकण्याची भानगडच राहणार नाही. सरकारने आमच्या सूचनेचा विचार करावा. म्हणजे दर २५ लाख इन्कमटॅक्सपैकी निदान ८ लाख तरी नक्की वसूल होत जाईल आणि शिवाय सोळा लाखइतकी रक्कम जनताजनार्दनाला टॅक्स म्हणून भरूनही भरल्यासारखे काही वाटायचे नाही! यासाठी एक प्रचंड 'जन-आंदोलन' उभारले जाणे आवश्यक आहे.

'आता फक्त बक्षिसे मिळवणाऱ्यांना राष्ट्राध्यक्षांनी भारतरत्न, पद्मभूषण, पद्मविभूषण, पद्मश्री करण्याचेच बाकी राहिले आहे' असे श्री. दांडेकर उपहासाने लिहितात. उपहास का बुवा? आम्ही हे उपहासाने वाचले नसून नव्या उल्हासाने वाचले. केंद्र सरकारने भारतरत्न लॉटरी, पद्मभूषण लॉटरी, पद्मश्री लॉटरी सुरू करावी. आयुष्यभराचे कर्तृत्व, पराक्रम, सेवा याचसाठी असणारी ही बिरुदावली, काहीही न करता नशिबाने काहीजणांना मिळाली म्हणून बिघडणार आहे वाटतं? कसल्याही कर्तृत्वाशिवाय माणसाने श्रीमंत होणे हीच तर लॉटरीमागची मूळ कल्पना आहे!

राज्य सरकारांची लॉटरी हे एक प्रचंड 'लोकनाटच' आहे. डोक्यावर 'मटके' घेऊन या सरकारी गवळणी ठुमकत ठुमकत बाजाराला निघाल्या आहेत. यांच्या बाजाराची वाट कृष्णदेवदेखील अडवीत नाही, हे आम्ही या विषयाचा सखोल अभ्यास करून सुरुवातीलाच दाखवले आहे.

गवळणी नाचत आहेत, पिटातून शिट्या व टाळ्या पडत आहेत. मटक्याची लावणी रंगत आहे –

दैवाने गाठ जणु पडली देशभक्ताची।
तोडाल प्रीत तरी, आण 'बापू' रक्ताची॥

पहिले दिवसापासून लागला चटका।
काय सुख सांगावे, खेळा सरकारी मटका॥

ही मजा काही उमजा। तिकिट घेउनि निजा।
सख्या जिव आमुचा तुमचे पाशी॥

पळपळ होते अधिरता,
पांची प्राण जाऊ पाहाती। दैवाने गाठ जणु पडली देशभक्तांची॥

तात्पर्य लॉटरीवर टीका करणाऱ्यांनो –

ही मजा काही उमजा।
अन् तिकिट घेउनि निजा॥

– श्यामसखा

रातराणी । रातराणी

विजय । तेंडुलकर

# ॥ भजन ॥

नवी दिल्ली.

राजरस्ता. निऑन साइन्सच्या गर्दीत आणखी एक निऑन साइन : दि सेलर. प्रत्येक बंदरात ज्याचे एकेक कुटुंब म्हणे असते तो सेलर नव्हे, सेलर म्हणजे तळघर. दिल्लीतल्या तरुण पिढीचे आवडते ठिकाण.

गल्लीत उतरल्यासारखे एका निरुंद जिन्याने उतरून खाली तळघरात. रस्त्यावरच्या दिव्यांनी रेखाटलेला गडद अंधार, जिन्यातला भगभगीत उजेड ओलांडून दारावाटे आत एका अंधारउजेडाच्या स्थिर आणि रंगीबेरंगी खेळात. बाहेरच्या रंग आणि गद्य गोंगाटातून एकदम स्वरांच्या आणि तालाच्या एका उग्र संगीत कोलाहलात. संगीताच्या या एकाद्या गरम वाफेच्या धुस्काप्यासारख्या धुस्काप्याने क्षणभर दाराशीच गुदमरायला होते. मागे सरकायला होते. आतच सिग्रेटींचा घरभर कोंदटलेला धूर, चित्रविचित्र गंध आणि दर्प. आणि अंधुक रंगीबेरंगी उजेडाने उजळून विचित्र दिसणारे माणसांचे चेहरे. एका काळोख्या कोपऱ्यात वाचाळ संगीताच्या दणक्यावर नाचणाऱ्या तरुण मुलामुलींच्या वळवळत्या आकृती.

जागृतीतून एखाद्या विलक्षण स्वप्नात चुकून पाय ठेवल्यासारखे वाटते.

एक टेबल धरून कोपऱ्यात बसल्यावर जरा धीर चेपतो. नजर धीट होते. कान सरावतात. नाकाला सिग्रेटींच्या आणि असंख्य दर्पांचे काही वाटेनासे होते.

एका बाजूच्या टेबलाशी काही सरदारजी चवीने आणि दोन्ही हातांनी खात

पीत असतात. खाण्यासाठी हे एक हे पंजाबी हॉटेल सोडून इकडे कुठे आले? पलीकडे दोन सूटबूटवाले मध्यमवयीन पुरुष नुसताच उंची सिग्रेटींचा धूर सोडीत एकमेकांकडे साधे पहाणेही टाळून शेजारी शेजारी बसलेले. नजरा काळोख्या भागातल्या नाचत्या, वळवळत्या स्त्री-पुरुष आकृत्यांवर धूसरपणे टेकलेल्या. हे उगीच कोणी फिरते सेल्समन वगैरे वाटतात. एक पोरसवदा तरुण जोडपे आणि त्याच्याबरोबर शाल गुंडाळलेली एक संकोचयुक्त करड्या मुद्रेची वडीलधारी बाई. ही सोबत यांनी या तळघरात कशाकरता आणली? की हीच नको नको म्हणता आली? टोकाला दारापासच्या टेबलाशी एक लालबुंद गौरकाय उतारवयस्क जोडपे, संथपणे जेवणारे. मधूनच न जेवता समोरचे सर्व काही पहात रहाणारे. या 'पिढी'चा या तरुणांच्या 'तळघरा'शी काय संबंध? भोवतालच्या हैदोसाचा कोणताही परिणाम यांच्यावर दिसत नाही. बरा तर नाहीच पण वाईटदेखील नाहीं. एखाद्या पार्कात संध्याकाळच्या वेळी बसावे तशीं ही वयस्क जोडगोळी या कर्कश गोंगाटात निवांतपणे खात बसली आहे, की या कोलाहलात यांना यांचा निवांतपणा सापडला आहे? मधल्याच एका टेबलावर मुळात गौरकाय पण मेणच पटलेलीं तीन मंडळी. दोन पुरुष. एकाने बैराग्याप्रमाणे किंवा भिकाऱ्याप्रमाणे किंवा एखाद्या वेड्याप्रमाणे, वाढलेल्या अस्ताव्यस्त पिंगट जटांवर एक रंगीत चिंधी बांधून ठेवली आहे. दाढीमिशांच्या जंगलात एक सिग्रेटचे थोटुक जळते आहे, अंगात नक्षीचा रंगीत झोळणा आणि खाली तसलीच रंगीत लुंगी. कशाचाच मूळ रंग ओळखणे बिकट. याच्याबरोबरच्याने पांढरा (म्हणजे मुळात केव्हातरी) भरड खादीचा झब्बा लहेंगा नेसून केस नुसतेच मानेपर्यंत पौराणिक चित्रपटातल्या नटाप्रमाणे किंवा पानाच्या ठेल्लेवाल्याप्रमाणे रुळते सोडले आहेत. त्याचीही दाढी चार दोन दिवसांची वाढलेली आहे. या दोघांबरोबर एक तरुण स्त्री आहे. हिने एक तंग गुलाबी, परकर पोलक्याचे स्मरण देणारा पोषाख केला आहे तो पोटाच्या भागाशीं दोन्ही बाजूंनी येऊन जरा आधीच संपला आहे. मुळात आहेच पण या पोषाखात ती आणखीच वेडीवाकडी उंचाडी वाटते. सोनेरी केसांना घाईघाईने मागे एका रबरात गुंतवून ठेवले आहे. डोळ्यांना या रात्रीच्या वेळीं, अंधुक उजेडात काळा चष्मा आहे. कोमल ओठात धूर ओकणारीं सिग्रेट. आक्रस्ताळ्या दणकेबाज संगीताची लय धरून काहीतरी मधूनच स्मरण व्हावे तसे पुढ्यातल्या ग्लासातले काहीतरी पीत, हीं तिघे त्या लयीवर हलक्या टाळ्या पिटींत, बसल्या बसल्या शरीरे हलवताहेत, मुद्रा त्या लयीने का कशाने कोण जाणे, विलक्षण धुंद. डोळे किलकिले नाहीतर शून्यात लागलेले किंवा मधूनच भजन गाणाऱ्यांचे होतात तसे धुंद. ही खरी या ठिकाणची हक्कदार पिढी. हिप्पीज़.

पलीकडं अंधाऱ्या कोपऱ्यात जोरजोराने नाचणारी तरुण मुलेमुली. त्यांच्याही मुद्रा भजनानंदात होतात तशा बेहोष आणि तल्लीन. शरीराच्या पुढे मागे इकडे

तिकडे झटके घेणाऱ्या मुक्त हालचाली. कोणी मुठी आखडून मागे मागे झटके घेत जागच्या जागी झिम्मा खेळते आहे तर दुसरा दोन्ही कुशींनी आळीपाळीने शरीर सैलपणे मागे पुढे करीत अंगात संचार व्हावा तसा मानेला झटके देतो आहे आणि मधूनच चेहराही झपाटल्यासारखा करतो आहे. एक जोडपे चक्क बॉलडान्स नाचते आहे. दुसरे एकमेकासमोर सुचेल तसे पुढेमागे होत पिंगा घालते आहे. कशाला नियम दिसत नाहीत. महत्त्व दिसते लयीला. लय जोसात आहे. गीताचे शब्द समजत नाहीत. शब्द समजतात रंगीबेरंगी विदूषकी चौकडयांच्या पोषाखातल्या बोडक्या वेटरने आणून ठेवलेल्या लाकडाच्या पांढऱ्या शुभ्र फळीवरच्या 'मेनू 'तले; पण अर्थ समजणं कठीण. 'विचेस ब्रू' चेटकिणीचा रस्सा—म्हणजे काय? 'मिड-नाइट ब्यूटी' म्हणजे खाण्याचा प्रकार की पिण्याचा? सगळी नावे अपरिचित. (मनात विचार सरकून जातो, मुंबईच्या काका तांब्यांच्या चालकत्वाखाली तर हे दिल्लीचे 'तळघर' चालवले जात नसेल? नाहीतर ही अभिनव नावे कुठून बरे आली?) वेटर खासगीत सांगतो, विचेस ब्रू म्हणजे भाज्यांचा रस्सा आणि मिड-नाइट ब्यूटी म्हणजे आइस्क्रीम घातलेला कोका कोला.

दरम्यान संगीत सुरू झाले तसेच एका दणक्याने एकदम थांबते. आता शांततेचाच गोंगाट वाटतो. नाचणारी कमजास्त बेहोष तरुण जोडपी मर्त्य जगात येतात, घाम पुसत, धापा टाकीत कृतकृत्य मुद्रांनी टेबले गाठतात. प्रकाशयोजना बदलते. सारे आणखीच अद्भुत होते. रंगीत प्रकाशाचे भगभगीत झोत थेट डोळ्यात भसाभस घुसतात आणि बाजूचा अंधार आणखीच रहस्यपूर्ण होतो. भिंतींना जडवलेली कागदी चांदी आणि वरची एकाहून एक विचित्र बटबटीत चित्रे आणखीच गडद आणि मोठी वाटतात. छताकडे लक्ष जाते. तिथल्या ताणल्या गोणपाटांवर नावेच नावे ब्रशने चिताडलेली. सीता आणि रामपासून गिल्डा आणि शकूरपर्यंत. नावांची लांबच लांब आणि रुंदच रुंद गिचमीड. त्यात आपले शोधण्याचा मोह होतो. ही नावे कुणी घातली? ट्रिपच्या ठिकाणी आम्ही खडने गिचमिडून ठेवत होतो त्याची आठवण होते: अमूक तमूक येऊन गेले. तारीख तमूक अमूक. छतावरच्या या सहस्रनामात तरुण पिढीला तिचे आयडेंटिफिकेशन किंवा नाते सापडत असावे; शून्यात म्हणून वर छताकडे तरुण नजर लावल्यावर.

नवे संगीत, नवे गीत. तोच उग्र दणका. फरक लयीचा. पूर्वीचे नाचून शिणलेलेच दम खाऊन नव्याने रिंगणात उतरतात. नव्याने तरुण शरीरांची मुक्त पिळवणूक आणि वळवळ. नवा घाम. नवी आसुसून आणलेली बेहोषी आणि तंद्री. नवे 'भजन' आणखी मंडळी सामील होतात. नजीकच्या टेबलापासची हक्कदार. तिघे आपाप-सातले शब्दांविना चाललेले मूक संभाषण किंवा कम्युनिकेशन टाकून एकदम मनाने लयीवर स्वार होतात आणि जागीच बसून झुलू, डुलू आणि उसळू लागतात. ती गुलाबी उंचाडी गॉगलवाली हलक्या टाळ्या देत गाण्याचे शब्ददेखील समाधिस्थ

मुद्रेने, अर्धवट उघड्या डोळ्यांनी म्हणू लागते. तिला गाणे माहीत आणि वर पाठ दिसते. सगळी सिनेमातली गाणी तोंडपाठ असलेली एक मुलगी आमच्या चाळीत वागे होती ती रेडिओवर रेकॉर्ड लागली रे लागली की अशीच गुणगुणे. मधूनच तो बटा आणि चिंधीवाला जोडीदार तिच्या तोंडाशी कान एकाग्रतेने नेतो. भयंकर झाल्या स्वरात वाजणाऱ्या त्याच गाण्याच्या आक्रोशात तिच्या ओठाचे त्या गाण्याचे तुकडे शब्द ऐकण्यासाठी एकाग्र होऊन झुलत रहातो. पुन्हा दूर होऊन आपला आपण 'भजन' करतो.

आता एक नवा 'पॉश' तरुण दोन तसल्याच मैत्रिणींना घेऊन 'गुहे'त प्रवेश करतो. एक टेबल गाठून तिथे बसून कुजबुजतात आणि बघता बघता भोवतालच्या कर्यीत हरवतात. त्यांचेही भजन! एक नवीन कुटुंब प्रवेश करते. बायको, नवरा, बहुधा नवऱ्याचा मित्र आणि तीन लहान मुले. हे लोक वाट तर चुकले नाहीत? मुलां-वर हे संस्कार?? ते एक टेबल गाठतात. बसतात. सुन्न, गोंधळलेले चेहरे. संकोचलेला चेहरा, भयचकीत, उत्सुक, तीन कोवळे चेहरे. पहाता पहाता सर्व उठून थेट बाहेरची वाट पकडतात. आधी प्रौढ; मग—नाइलाजाने—पोरे; पुन्हा पुन्हा मागे वळून पहात. दॅट्स इट! हे चुकूनच पोचले होते. 'तळघर' यांच्यासाठी नक्कीच नाही.

लागते ते ते नवे आक्रस्ताळे गाणे त्या गॉगलवाल्या गुलाबी उंचाड्या ठकीला पाठ! न चुकता तिचे ओठ सिग्रेटीच्या धुराची वर्तुळे सोडीत त्याचे शब्द रेकॉर्डबरो-बरीने बोलतात. इथे येऊन येऊन हे पाठांतर आपसुक झाले? की आवर्जून केले?

प्रकाशयोजना बदलते. तळघराचे नवेच विचित्र रूप. जुने सारे आणखीच गडद, भडक, कर्कश होते. नाचाच्या जल्लोषात आता ते हिप्पी त्रिकूट एकदम एका ऊर्मीने उतरते. ती उंचाडी ठकी अंगावर झुरळ चढावे, कानात माशी अडकावी आणि लाल मुंगी डसावी तशी एकावेळी अनेक झटके आपल्या काटकिळ्या गोऱ्या अंगाला देऊ लागते. ते दोघे जोडीदार नाचाच्या हैदोसात एकेकटे हरवून डोळे मिटून टाळ्या पिटीत 'भजन' करीत रहातात; जणू चंद्रभागेच्या तीरीचाच 'सीन' चालला आहे! त्यातला एक जण तर 'हरे हरे' 'क्रिश्न क्रिश्न' म्हणत टाळ्या पिटीत तुडका नाचतो; त्या कर्कश गोंगाटात!

तेवढ्यात यांचे आणखी तीन नवे 'जातवाले' येतात. एकाला रुबाबदार नाजूक टोकदार छोटी दाढी, लांब काळेभोर केस. पोरीसारखी देखणी मुद्रा. डोक्यावर एक रंगेल मध्ययुगीन हॅट. दुसरा बंदरातून थेट आलेल्या खलाशासारखा दांडगा आणि रांगडा. मागाहून तिसरी देखणे न दिसण्याचा आटोकाट प्रयत्न केलेली एक देखणी. (मनात येते, ऑफेलिया...हॅम्लेटच्या दिलाची दुर्दैवी राणी...)

आता तळघर चांगलेच भरलेले असते. आणखी भरत असते; विराण रानात नाहीतर उजाड माळावर टाहो फोडल्यासारख्या गीतांच्या स्वरांनी, लयींनी, लयी-वर चौफेर नाहीतर जागच्या जागी नाचणाऱ्या तरुण पावलांनी.

शून्यात नजर लावलेल्या नाहीतर एका आसुसल्या धुंदीतल्या तरुण मुद्रांनी, बेंगरूळ, अनाकर्षक दिसणाऱ्या फॅशननी शृंगारलेल्या तरुण देहांनी. तारुण्याशी निगडित रम्यमधुर स्वप्ने, हळव्या आशाअपेक्षा, भावविवश प्रीती आणि मैत्री, सौंदर्याची ओढ आणि काव्यात्मता आजच्या या तळघरातल्या तरुण जगातून हद्दपार वाटतात. हे जग फार फार कर्कश आहे, भडक आहे, सस्ते आहे, साऱ्या संवेदना बोथटून टाकण्याच्या ध्यासात असलेले आहे.

रात्र चढेल तसे हे आणखी गजबजेल. आक्रोश वाढेल, शरीरे आक्रसतील आणि झटके घेत नाचतील, ओठ आणि मुद्रा भजन करतील—शून्याचे भजन, निरर्थकतेचे भजन, हेतुहीन, निरुद्देश अस्तित्वाचे भजन.

परत निरुंद जिना चढून वर येताना उगीच—अगदी उगीच मनात सरकून जाते, अशाच तळघरात एकजण फार फार पूर्वी समाधिस्त झाला. जवळ जवळ याच वयात. एका साक्षात्कारानंतर; शतकानुशतके टिकेल अशा कर्तृत्वानंतर.

तेव्हांचे ते तळघर.

हे आजचे तळघर.

□ □ □



- सौ. निलान जोशी

# मुक्काम चंदीगड

पंजाब-हरियाना ह्या वादात केन्द्रीय सरकारच्या भूमिकेत एक खटकणारी गोष्ट म्हणजे १९६१ साली घेतलेल्या जनगणनेच्या वेळी गृहीत धरलेल्या तात्त्विक बैठकीचा सपशेल त्याग. पंजाबातील सर्वच राजकीय पक्षांनी वरील गोष्टीखातर दिल्ली सरकारचे अभिनंदन करताना फक्त स्वतःची सोय पाहिली. उर्वरित विवाद्य प्रश्नांचा विचार करण्याकरिता भाषा तज्ज्ञांची जी समिती नेमण्यात आली आहे तिच्या मूळातच मर्यादित असणाऱ्या अधिकारात आणखीन काटछाट होण्याची शक्यता वर उल्लेखिलेल्या घटनेमुळे निर्माण झाली आहे.

हरियाना सरकारच्या 'तेरी बी चूप मेरी बी चूप' छाप धोरणाने मात्र तेथील अन्यायावर एकप्रकारे शिक्कामोर्तब केले आहे. माजी मुख्यमंत्री भगवत-दयाल यांनी तर चंदीगडच्या बदलीच म्हणून जणू काही मिळालेल्या फजिल्का तालुक्याला लवकरात लवकर पचविण्याकडे लक्ष केन्द्रित करण्याचे आवाहन करून जनतेची स्थिती मात्र 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी करून टाकली आहे. कुठल्याही चळवळीत वरचेवर सार्वजनिक मालमत्तेची नुकसानी ही जशी घडते तशी ती हरियाणांतही घडली. पण त्या करता त्या-त्या भागातील रहिवाशांवर सामुदायिक दंड आणि जप्ती बसवून तर हरियाना सरकारने स्वराज्यातील अपूर्व अशा दंडेल-शाहीलाच जन्म दिला आहे. चंदीगडची तत्त्वशून्य तडजोड मान्य करणाऱ्या मुख्य-मंत्र्यांच्याही प्रतिष्ठेला न साजणारे असे हे कृत्य होते. देशहिताकडे लक्ष ठेवून चंदीगडला खेटून असलेली सहा खेडी आणि रेल्वे स्थानक एवढ्यावर समाधान मानायला जनतेला भाग पाडण्याचा त्याने चंग बांधलेला दिसतोय्. जवळजवळ पाचशे कोटी रुपये प्राप्तीचे ते शहर गमावून नवी राजधानी बांधण्यासाठी म्हणून देऊ केलेली दहा कोटींची रक्कम तेथील लोकांना नगण्य वाटल्यास नवल ते कसले? हिमाचल सरकारने तर मोरनीचा डोंगराळ भाग, पिंजोरची औद्योगिक वसाहत आणि काल्काचा पूर्वेकडील प्रदेश यावर हक्क सांगून हरियानाला आणखीनच डिवचले आहे. पण यातूनही कुठली अस्थिरता निर्माण होईल असं वाटत नाही.

स्वतःच्या कोत्या वैयक्तिक भवितव्याचीच खात्री ज्यांना नाही अशा तुरळक पुढाऱ्यांच्या प्रभावळीतला अपवाद वजा करता हिमाचल, पंजाब आणि विशेषेकरून हरियाना हे प्रांत पूर्णपणे निवळलेलेच आहेत. क्वचित कुठे अमृतसरात फत्तेसिंहाविरुद्ध ऐकू येणारी एखादी लटकीशीच आरोळी किंवा क्वचित रेवाडी अगर हिस्सारमध्ये जनसंघ आणि तत्समांची फिरून उठाव करण्याची उसनी ललकारी. राजकीय प्रांगणातील ह्या सर्वव्यापी चैतन्यहीनतेचे कारण शोधता नैराश्यच पदरी येते. शिडातील वारा पार निघून गेलाय् अन् व्याख्यानबाजीला तोंडची वाफंच दवडण्याचं स्वरूप प्राप्त झालंय्.

वास्तविक, न सुटलेले असे प्रश्न मुळी नसतीलच का? ठळक गाऱ्हाणी मुळातच नाहीशी झाली असतील का? बहुतांश जनतेचं किमान समाधान तरी झालं असेल का? या सर्वांचंच 'नाही' हे उत्तर आहे. आजकाल अन्याय निवारणाकरिता कुठेतरी चळवळ सुरू होते. चालविणाऱ्यांच्या ताकदी आणि निष्ठेप्रमाणेच ती थोडा काळ चालतेही. त्यातूनच अधून-मधून काही हुतात्मे जन्माला येत राहतात. पण मग कालांतराने सर्वकाही थंडावून जाते. भारतीय लोकशाहीतील हे चित्र अतिशय करुण आहे. योग्य दिशाच आधी नसते आणि ती असली तरी हाती सुकाणू घेणारेच तितकेसे लायक नसतात. त्यातून चुकूनच एखादा बरा नेता लाभला तर गटबाजीमुळे संघटनाच निष्क्रिय होऊन बसते. सर्रास सर्वच पक्षांच्या बाबतीत हल्ली हे पाहायला मिळतं. सर्वसाधारण जनतेची स्थिती वारा प्यालेल्या एखाद्या भांबावलेल्या वासरा सारखी होऊन गेली आहे.

हुकूमशहांचा हुकूमशहा मुसोलिनीने पन्नास वर्षांपूर्वीच्या इटालीतील नामर्दपणाचं चित्र रेखाटताना लोकांना उद्देशून म्हटलं होतं की, "...greetings to all those numerous groups of proletarians and employees who are not willing to submit to the leadership of political parties composed and controlled chiefly by little and big mediocrity which is now trying, by impoverishing and mystifying the masses to gain applause and salaries..."

विरोधानं का होईना पण धोक्याचा कंदील म्हणून वरील उद्गारांकडे बघणे उद्बोधक ठरावे. गंध-रंग-रूपहीन अशी ही जनता, ही विनचेहऱ्यांची माणसं हीच आजच्या शासनयंत्रणेला जन्म देऊन तिच्याच भाराखाली पिचून जातात, भरडून निघतात. पहिल्या चार्ल्सचा शिरच्छेद केल्यानंतर ज्या एका नव्या जगाची नांदी दिली गेली तिचीच तिरडी तर नसेल ना बांधली जात? महान स्पॅनिश तत्त्वज्ञ ऑर्तेगा म्हणतो—

"Historic sovereignty finds itself in a state of dispersion. ...once more the horizon opens out towards new unknown



# ओळख

'मुक्काम चंडीगड' या सदरांतील ह्या तिसरा व शेवटचा लेख. याच्या लेखिका सौ. निला‌न् जोशी (पूर्वाश्रमींच्या कु. मीला गोखले) या मूळच्या पुण्याकडल्या. परप्रांतात जाऊन तेथे नावलौकिक मिळवणं हे आपल्याकडील निदान भगिनींमध्येतरी अजून तितकसं रूढ नाही. पण कॉलेजातील अभ्यास संभाळून त्यांनी कलकत्ता येथे झालेल्या आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत 'ब्रेस्ट स्ट्रोक' गटात अखिल भारतात तिसरा क्रमांक मिळवला. पुण्यात असताना त्यांनी आंतरशालेय् स्पर्धांमध्ये सतत तीन वर्षे, सवँच गटांत पहिला क्रमांक मिळवून वैयक्तिक अजिक्यपदही पटकावले होते. १९६२ साली त्रिवेंद्रम येथे भरलेल्या राष्ट्रीय पोहोण्याच्या खुल्या स्पर्धेत महाराष्ट्रातर्फे भाग घेऊन वयाच्या अवघ्या चवदाव्या वर्षी सबंध भारतात त्या तिसऱ्या आल्या होत्या. पुणे विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन सामन्यातही त्यांनी विजेतेपद मिळवले होते. पंजाबविद्यापीठाचे वैयक्तिक अजिक्यपद आणि हरियाणा राज्याची पूरनचंद ढाल मिळवून त्यांनी शंभर मीटर अंतर १ मि. ३९ से. मध्ये पोहून राज्याचा 'ब्रेस्ट स्ट्रोक'चा नवा रेकॉर्ड प्रस्थापित केला.

याशिवाय त्यांच्या आवडीचा प्रांत म्हणजे चित्रकला. पुणे यूथ फेस्टिव्हल मध्ये 'लँड स्केप' विभागात दुसरे तर अभिनव कला निकेतनच्या ग्रीटिंग्स्च्या स्पर्धेत त्यांनी पहिले पारितोषिक मिळविले. चंदीगडलाही 'वॉटर कलर' विभागात त्यांनी विद्यापीठांचे पहिले बक्षीस मिळविले.

directions, because it is not known who is going to rule...no one knows towards what centre human things are going to gravitate and hence the life of the world has become scandalously provisional..."

शितावरनंच परीक्षा करायची झाली तर एक चित्रच डोळ्यांपुढे आणू या. बाहेरील जगाचं ज्ञान जो केवळ वर्तमानपत्रांतूनच मिळवतो असा नागरिक जेव्हा वाचतो की दूर तिकडे आंध्र प्रदेशात गिरिजनांवर सरकारीपक्षातील गटांकडून खुनी हल्ले आज कित्येक दिवस चालू आहेत तेव्हा एका विशिष्ट भूमिकेलाच चिकटण्याचा मोह त्याला पडतो. नेमकं थोड्याच वेळात त्याचं लक्ष विरुद्धच्या टोकाच्या, केरळातील, एका खास बातमीकडे जातं आणि तो गोंधळून जातो; परत-परत स्वतःशी धागे जुळवण्याचा प्रयत्न करतो. पण गुंता कमी न होता वाढतच जातो.

संसदीय लोकशाहीतील ह्या कर्तनशील सहनशीलतेचा जर कुणी आज कस लावून अंत पाहत असेल तर ते म्हणजे आयाराम-गयाराम हे नसून लोककल्याणार्थ, लोकांनीच सरसकट निवडून दिलेले वेगवेगळे पक्ष आणि त्यांचे पुढारी. आपल्याच चमत्कारिक करणीने त्यांनी असंख्य ध्येयवादी तरुणतरुणींना स्वतःपुरतंच जास्तीतजास्त उत्साहाने बघायचा धडा घालून दिला आहे. हल्लीच्या पिढीने ही जी, कमालीची व्यक्तिनिष्ठ आणि म्हणूनच काहीशी असहिष्णुतेची, वृत्ती जोपासायला सुरुवात केली आहे तीच अखेर राष्ट्रपुरुषाला मारक ठरणार आहे. प. बंगालातील भस्मासुराकडे बोट दाखवून आपण त्या मानाने खूपच सुरक्षित असल्याचा प्रत्यय स्वतःला आणत राह्यचा हे केव्हातरी थांबायला हवंच. जनतेचे मूलभूत प्रश्न, तिच्या प्राथमिक गरजा, देशाचं सार्वभौमत्व या सर्वांबद्दल जागरूक राहणं हे प्रत्येक एकएकट्या नागरिकाचंही कर्तव्य आहेच. त्या अनुषंगाने सार्वकालीन शिक्षण देण्याची वेळ आता आली आहे.

नोव्हेंबर १९६९ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अधिवेशन सोलापूर येथे झाले. अधिवेशनात ठरल्याप्रमाणे विभागीय बैठकी घेण्यात येत आहेत. पुणे विभागाची बैठक १४–१५ मार्चला तळेगाव येथे आहे. त्यानिमित्त...

# शिक्षणप्रसार व ग्रंथालयविकास

**शान्ता बुद्धीसागर**

स्वतंत्र भारतातील सर्वांगीण प्रगतीबरोबरच शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसाराकरिता प्रथमपासूनच शासन जागरुक आहे. त्यामुळे पहिल्या तीन पंचवार्षिक योजनेच्या अखेर देशातील प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या संख्येत खूपच वाढ झालेली आपल्याला दिसून येते. १९४७ मध्ये देशात २ लाख २० हजार शाळा होत्या व त्यात १८ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असत. त्याकरिता शासनाला ६० कोटी रुपये खर्च येत असे. तर १९६५ मध्ये या शाळांची संख्या ५ लाखावर गेली व ६० लाख विद्यार्थी शिकू लागले. स्वाभाविकच त्यावर होणारा खर्च ६०० कोटी-पर्यंत वाढला. १९४७ साली साक्षरतेचे प्रमाण बारा टक्के होते ते १९६१ च्या शिरगणतीच्या वेळी २४ टक्के झाल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्रातील प्रगती :** भारताच्या या शैक्षणिक प्रगतीत महाराष्ट्रही आपला वाटा योग्यप्रकारे उचलीत आहे. १९५५–५६ ते १९६५–६६ या दशकात प्राथमिक शाळांची संख्या २८ हजार ३ शे सत्तेचाळीस वरून ४१७८१ पर्यंत वाढली व त्यातील विद्यार्थी ३० लाख ७ हजार सुरुवातीस होते त्या ठिकाणी ५५ लाख ३ हजार शिक्षण घेऊ लागले. तर दुय्यम शाळा याच काळात १४१२ वरून ४०३२ पर्यंत वाढल्या व त्यामधील विद्यार्थ्यांची सख्या ५ लाखावरून १५ लाखावर गेली. तसेच महाविद्यालये व विश्वविद्यालयात १९६६–६७ साली पुढीलप्रमाणे विद्यार्थी पदवीपर्यंत व पदव्युत्तर शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. मुंबई विद्यापीठ–७१७-

९८, पुणे विद्यापीठ–२२७०९, नागपूर विद्यापीठ–५०४५३, मराठवाडा विद्यापीठ –१७६९८, शिवाजी विद्यापीठ–१६४३८, नाथीबाई ठाकरसी विद्यापीठ– ५९३१. व याकरिता सर्व विद्यापीटांना मिळून (एस्. एन् डी टी. सोडून) ४२३७०७७६ रुपये खर्च आला. तर महाराष्ट्र शासनाने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर वार्षिक ६९ कोट रुपये खर्च केला आहे.

**चौथी पंचवार्षिक योजना** : – या योजनेचा प्रौढ शिक्षणावर अधिक भर देण्याचा संकल्प आहे व त्यादृष्टीने कार्यवाही ही सर्वत्र चालू झाली आहे परंतु या शिक्षण प्रसाराच्या योजना खऱ्याखुऱ्या अर्थाने फलद्रप होण्याकरिता मोठ्या प्रमाणात देशी भाषेत ग्रंथप्रकाशने होणे अगत्याचे आहे हे कोणीही मान्यच करेल; पण याच काळात भारतातील सर्व भाषेत मिळून प्रसिद्ध झालेली ग्रंथसंख्या पाहता निराशाच वाटावी अशी परिस्थिती आहे. १९६३ ते ६८ या पाच वर्षाच्या काळात भारतातील सोळाही भाषेत मिळून एकूण एक लाख एकशे एकोणनव्वद ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यापैकी इंग्रजी या एकाच भाषेत ४७९३३ ग्रंथ आहेत. ते वजा करता देशी भाषेत सरासरी १०४५१ ५ ग्रंथ प्रकाशित होतात असे दिसून येईल. त्यापैकी मराठी भाषेत दरसाल १६८४ हे प्रमाण पडते. इतर भाषांच्या तुलनेने मराठीचा नंबर दुसरा लागतो. (हिन्दी १ ला.) याचे जरी आपल्याला सकृद्दर्शनी समाधान वाटले तरी सर्वच भाषांचे आकडे हे सरकारी प्रकाशने, क्रमिक पुस्तके, धार्मिक, ललित व ललितेतर इत्यादि सर्व वाङ्मयप्रकाराचे मिळून आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आता साक्षरतेशी याचे प्रमाण पाहू जाता १९४७ साली ६५०० साक्षरांच्या मागे १ पुस्तक हे प्रमाण होते. ते १९६६ मध्ये १० हजार साक्षरांच्या मागे १ असे प्रमाण पडले आणि मला वाटते ही खासच चिंतनीय बाब होय. याची कारणे अनेक असू शकतात तशीच संभाव्य उत्तरेही. देशात इतर सारी प्रगती होत असली तरी लोकांची क्रयशक्ती अद्याप वाढलेली नाही हेही एक ठराविक उत्तर याबाबतीत असू शकेल आणि सकृद्दर्शनी ते कोणालाही बिनतोड वाटेल. परंतु वरील प्रकाशने ही शालेय क्रमिक पुस्तके व सरकारी प्रकाशने मिळून आहेत याचा उल्लेख वर केलेलाच आहे आणि मग वाढत्या शिक्षणसंस्था, विद्यार्थीसंख्या व बदलता अभ्यासक्रम लक्षात घेता प्रकाशने का वाढत नाही याचा शोध घेणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर साक्षरता व सार्वत्रिक शिक्षण प्रसाराच्या मोहिमेला सुयोग्य अशा विपुल प्रकाशनाची व ग्रंथालय विकासाची जोड मिळाल्याशिवाय खराखुरा शिक्षणप्रसार होणे कठीण आहे हे आपणास पटावयास हरकत असू नये.

महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळीची परंपरा नवीन नाही असं जरी म्हटलं जात असलं आणि केवळ स्थानिक उपक्रमशीलतेतून शतकापूर्वी स्थापन झालेली काही महत्त्वाची ग्रंथालये असली तरीसुद्धा ग्रंथालय चळवळीचा थोडाफार प्रसार जो झाला तो त्यावेळच्या मुंबई सरकारने फैजी शिफारशीनुसार ग्रंथालय विकास योजना लागू

केल्यावर आणि ग्रंथालयांना आर्थिक सहाय्य सुरू केल्यावरच. मुंबई, पुणे व मराठवाडा या तीन विभागात मिळून १८७५ पूर्वी स्थापन झालेली ग्रंथालये फक्त २८ आहेत व त्यानतर १९२५ पर्यंतच्या काळात ६३ ग्रंथालये निघाली. यानंतरच्या काळात १९५० पर्यंत १५२ वाचनालये निर्माण झाली आणि १९७० पर्यंत २८३ वाचनालयांची त्यात भर पडली आहे व नागपूरसह चारी विभागात मिसळून आज एकूण ५२४ सरकारमान्य सार्वजनिक ग्रथालये कार्य करीत आहेत. सयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट झालेला नागपूर विभाग हा पूर्वीच्या मध्यप्रदेशातील भाग असल्यामुळे तेथील कायद्यानुसार या विभागातील ग्रंथालयांचा विकास झालेला आहे. तसेच मराठवाड्याबद्दलही पूर्वीच्या हैद्राबाद व नंतर आंध्र राज्यातील हा भाग बराचसा अविकसित स्वरुपात आजही आहे.

फैजी समितीवर आधारित असलेल्या ग्रंथालय विकास योजनेच्या सुरुवातीस सामान्यत: २ लाखावरून ८ लाखापर्यंत वार्षिक खर्च येत असे. नुकत्याच लागू करण्यात आलेल्या नवीन ग्रंथालय कायद्यानुसार त्यात २५ लाख इतक्या रकमेची अधिक तरतूद करण्यात आलेली आहे, व एक मध्यवर्ती, चार विभागीय आणि प्रत्येक जिल्हा तालुकानिहाय याप्रमाणे ग्रंथालयाचाही व लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक १० हजार वस्तीकरिता एक, पंचवीस हजाराकरिता दोन, पन्नास हजाराकरिता तीन व एक लाखाकरिता चार आणि त्याहीपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरात किती ग्रंथालये असावीत हे ठरविण्याचा अधिकार डायरेक्टर ऑफ लायब्ररीज याजकडे देण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक हजार वस्तीच्या गावापर्यंत ग्रंथालयाचे जाळे सबंध महाराष्ट्रात निर्माण व्हावे व कोणाही नागरिकाला आपल्या स्थानिक ग्रंथालयामार्फत तालुका, जिल्हा, विभाग व मध्यवर्ती ग्रंथालयातून हवे ते पुस्तक मिळण्याची सोय उपलब्ध व्हावी म्हणून साखळी योजना ही या नवीन कायद्याने अपेक्षिली आहे. या सव ग्रंथालय चळवळीचे नियमन करण्याकरिता स्वतंत्र संचलनालय निर्माण केले, अधिकारी नेमले व त्यांना आणि शासनाला वेळोवेळी सल्ला देण्याकरिता जिल्हा पातळीवर जिल्हा ग्रंथालय समिती व राज्यपातळीवर शिक्षण मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली स्टेट लायब्ररी कौन्सिल स्थापन करण्यात आले आहे. तसेच यापुढील विकासाकरिता योजना व नियमही तयार झालेले आहेत. त्यानुसार यापुढे ग्रंथालय चळवळ प्रसरण पावणार आहे – विकसित होणार आहे, ती कशी ह्याचा थोडक्यात विचार करू. तत्पुर्वी ग्रंथालय क्षेत्रातील तज्ञ मंडळींचा याबाबतीत मूलभूत मतभेद आहे हेही येथे नमूद करणे अगत्याचे आहे. या क्षेत्रातील महर्षि पद्मश्री एस. आर. रंगनाथन यांनी पूर्वीच्या मुंबई सरकारला तसेच भारतातील निरनिराळ्या सरकारला व खुद्द भारत सरकारला सुद्धा काही योजना, कायद्याचे मसुदे, आवश्यक तरतुदी कळविल्या होत्या; परंतु महाराष्ट्र शासनाने त्यातील काहीच भाग स्वीकारून स्थानिक उपक्रमशीलतेला वाव देणारा

अभिनव प्रयोग करून पाहण्याचे ठरविले आहे असे दिसते; तरी प्रयोगांती जरूर तो बदल मोकळ्या मनाने करण्याची शासनाने तयारी ठेवावी एवढेच नम्रपणे सुचवावेसे वाटते व या प्रयोगाकरितासुद्धा येणाऱ्या अफाट खर्चासाठी ग्रंथालय कराची तरतूद केल्याशिवाय मुळात ही योजनाच कितपत कार्यवाहीत येऊ शकेल याची फार मोठी शंका आहे.

**महाराष्ट्रातील विविध विभाग–मुंबई विभाग** ७ जिल्हे, ७६ तालुके, १० हजार-पेक्षा अधिक वस्तीची ९ शहरे व ५ हजार ते ९९९९ लोकसंख्या असलेली ७३ शहरे व त्याखालील दोन हजारपर्यंतची ६१२ गावे मिळून झाला आहे. या विभागामध्ये सात जिल्हा, सत्तर तालुका व सहासष्ट शहर ग्रंथालयेच फक्त आहेत. **पुणे विभागात** सहा जिल्हे, सदुसष्ठ तालुके, १० हजारपेक्षा अधिक वस्ती असलेली २१ शहरे, ५ हजार ते ९९९९ लोकसंख्या असलेली १५४ व त्याखालील २ हजार पर्यंतची ८४२ गावे आहेत आणि ५ जिल्हा, ५९ तालुका व ९२ शहर ग्रंथालयेच या विभागात आहेत. तर **मराठवाड्यात** ५ जिल्हे, ४६ तालुके, ५ हजार ते ९९९९ पर्यंतची २५ व त्याखालील २ हजारापर्यंतची ३६० गावे असून यात एकूण ५ जिल्हा, ३६ तालुका व ४० शहर ग्रंथालये आहेत. **महाराष्ट्रात नागपूरसह चारही विभागात** मिळून ५२५ सरकारमान्य सार्वजनिक ग्रंथालय मुक्तद्वार ग्रंथालये म्हणून कार्य करीत आहेत.

## नवीन कायदा

नवीन कायद्याच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाची वर्गवारी काढण्यात आली आहे व त्यानुसार मागील वर्षाच्या अनुदान पात्र पाऊणशे टक्केप्रमाणे जास्तीत जास्त ६०००, ४०००, २००० रु. पर्यंत अनुदान मिळणार आहे. तर साखळी योजने-तील जिल्हा व तालुका मध्यवर्ती वाचनालयांना १५०००, ६००० रु. ही अनु-दानाची कमाल मर्यादा आहे. त्याजबरोबर जिल्हा पातळीकरिता अ वर्ग व तालुका पातळीवरील या योजनेत समाविष्ट होणाऱ्या ग्रंथालयांचा किमान ब वर्ग असला पाहिजे अशीही अट घालण्यात आली आहे. आता या अटीप्रमाणे मुंबई व पुणे विभागातील सर्व जिल्हा ग्रंथालये अ वर्गात बसू शकणारी आहेत. तर मराठवाडा विभागातील एकही ग्रंथालय अ वर्गात आज तरी नाही. एकूण पाच ग्रंथालयांपैकी चार ब वर्गात व क वर्गात जिल्हा ग्रंथालये आहेत. आणि नागपूर विभागात सर्वच जिल्हा ग्रंथालये शासन स्वतःच चालवीत असल्यामुळे त्याचा येथे विचार करण्याची गरज नाही. तालुका ग्रंथालयासंबंधी विचार करता मुंबई विभागातील एकूण ६९ तालुका ग्रंथालयांपैकी फक्त २६ ग्रंथालये ब वर्गातील आहेत व ३८ क वर्गातील आणि ५ ड वर्गातील ग्रंथालये आहेत.

**सद्यः स्थिती :**–पुणे विभागात एकूण ६७ तालुक्यांपैकी फक्त ५९ तालुक्यांनाच ग्रंथालये असून त्यापैकी ३६ वाचनालयांना स्वतःच्या इमारती आहेत तर बाकीच

२३ वाचनालयांना तो प्रश्न सोडवावयाचा आहे. ग्रंथसंख्येची सरासरी लक्षात घेता नवीन नियमाप्रमाणे फक्त १३ च ग्रंथालयात ५ हजार ग्रंथसंख्या असलेली दिसून येते. त्यामुळे त्यांना ब वर्ग मिळतो तर ४३ क वर्गात व ३ ड वर्गात मोडणारी ग्रंथालये आहेत. व त्यांना अधिक ग्रंथांची भर करून ब वर्गात येणे अगत्याचे आहे. त्याकरिता सुमारे ४ लाख रु. खर्च येणार आहे. या सर्व वाचनालयांचा मिळून वार्षिक खर्च २००१४२१३ रु. असून सरासरीने प्रत्येकी ३६३० रु. इतका पडतो. यापुढील काळात त्यांना सरकारी अनुदान वाढवून मिळणार असून त्यामुळे वाचनालय सेवा (लायब्ररी सर्व्हिस) यात खूपच प्रगती होईल. मराठवाडा विभाग मात्र ग्रंथालय क्षेत्रात फारच मागासलेला दिसतो. जिल्हा, तालुका व शहर पातळीवरील या विभागातील एकही ग्रंथालय अ वर्गात बसू शकत नाही. ग्रथालय क्षेत्रातील अविकसित भाग म्हणून शासनाला त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल व केवळ ग्रंथसंख्या वाढविण्याकरिताच सुमारे ४ लाख रु. या विभागातील विद्यमान ग्रंथालयांना द्यावे लागतील. याशिवाय इमारतींचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. प्रशिक्षित ग्रंथपालही अपवादात्मकच असल्याचे आढळून येते. विदर्भ विभागात काही निराळीच परिस्थिती आहे. जिल्हा पातळीवर तेथें शासकीय ग्रंथालये काम करीत असून एका शहरात एकापेक्षा अधिक ग्रंथालयांना अनुदान मिळण्याची तरतूद आहे व नागपूरसारख्या एकाच शहरात १७ ग्रंथालये दिसून येत असली व एकूण १४५ सार्वजनिक ग्रंथालये जरी तेथे जरी असली तरी कित्येक तालुक्यांच्या ठिकाणी अद्याप एकही वाचनालय नाही. त्यांना मिळणारी अनुदानेही पूर्वीच्या मध्यप्रदेश शासनाच्या नियमानुसार फार अल्प आहेत. म्हणून संपूर्ण महाराष्ट्राकरिता एकच ग्रंथालयीन पद्धती सुरू करणे अगत्याचे आहे आणि ती अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्रात शहरी पातळीवर आज अस्तित्वात असलेल्या ३३४ ग्रंथालयांमध्ये आणखी व नवीन ३१० वाचनालयांची भर पडणार आहे. तर ग्रामीण विभागामध्ये योजनाबद्ध विकास साधण्याचा प्रयत्न केल्यास २ हजाराचेवर नवीन ग्रंथालये अस्तित्वात येऊ शकतील. अर्थात या कामी शासनाला फार मोठा आर्थिक बोजा उचलावा लागणार आहे व त्याकरिता नजिकच्या काळ त ग्रंथालय कराची तरतूद करणे अपरिहार्य आहे. ग्रंथालयीन क्षेत्रातील विविध स्तरावरील सर्व कार्यकर्ते व शासनातील अधिकारी यांच्यामध्येही खरेखुरे सामरस्य व सहकार्य असल्याशिवाय केवळ कायदा किंवा आर्थिक तरतुदी ग्रंथालय चळवळीचा विकास साधू शकणार नाहीत.

□ □ □

" परत येशील ?" कुजबुजच, पण हळवी नाही. कदाचित थोडी हुकमीच.

"नक्की येईन" ओठातून नकळत हरवलेली गुलामी कबूली.

"कॉजेस ऑफ लिव्हर एन्लार्जमेंट आर डिव्हायडेड इंटू टू ग्रूप्स. विच आर दे? येस यू..."

"परत येशील ?"...

"सिस्टर, चला लवकर डिगाक्सिन घ्या. ऑक्सिजन घ्या. द पेशंट इज इन फेल्युअर–कमऑन. बी क्विक"...

"परत येशील ?"...


# वीणा भार्गव

## अपॉइंटमेंट वन् टू थ्री....

उल्हास लुकतुके

"आलास? मला वाटलंच होतं ?" माझ्यापुढे वीस फुटावर ती–वीणा भार्गव–न दिसणारी–पडद्याआड लपलेली–अबोल. बोललीच तर रंगांच्या भाषेत बोलणारी. मल्या मोठ्या कॅनव्हासचा ताणलेला पडदा. त्यावर लाल हिरव्या रंगांचा जल्लोष. "कांपोझिशन थ्री" मी खिळून उभा. असे तीन वेळा घडले. तीन वेळा खेचला गेलो. बालगंधर्व रंगमंदिरात–आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात.

रंगाची दुनियाच वेगळी. हट्टी असतात बेटे. अन् रेषा? किती अवखळ. किती फसव्या. रंगाकडे झुकावे तर रेषा रुसतात. रेषांचे प्रियाराधन करावे तर रंग फुरंगटतात. मग बेटयांना पिंजऱ्यात डांबावे लागते. शगालचा लाल. कॉन्स्टेबलचा हिरवा अशा पिंजऱ्यात आणि क्लोच्या रेषांबरोबर फिरायला जावे लागते. पिकासोच्या रेषांना सुरी बनवून आजूबाजूचे भासमान वातावरण कापावे लागते. या प्रदर्शनात हो सगळी मंडळी भटली. आणखी कितीतरी मित्र, जुने जुने, कितीतरी दिवसात न भेटलेले, भेटले. पण बहुतेक सगळे पश्चिमी कपडे घातलेले. टाय सुटात वावरणारे. ब्रिलक्रीम लावून नीटनेटके, चुपचाप केलेले. रेषा तर कितीतरी चुण-चुणीत बनवलेल्या. लिपस्टिक लावून ओठांच्या कमानी केलेल्या. मस्कारा आयब्रो



कॉंपोझिशन थ्री ...

पेन्सिलने भुवया खेचलेल्या. चटपटीत, भिरभिरणाऱ्या चवीच्या. दिसला नाही तो पलाशाच्या आगीतून धगधगणारा आमचा लाल रंग-गुलमोहरातून भळभळणारा आमचा रक्तस्त्राव, आंब्याच्या मोहोरातून ओसंडणारा आमचा यलो ऑकर. झोपडपट्ट्यांच्या धुरात घुसमटलेली आमची रिॲलिटी. त्या घुसमटलेल्या वातावरणात एकमेकांना शह काटशह देणाऱ्या आमच्या रेषा. तिरप्या तिरक्या, वाकलेल्या खचलेल्या, दमलेल्या मेलेल्या, मरू घातलेल्या तरीपण जगणाऱ्या आमच्या रेषा.

मन विषण्ण झाले. तसाच पुढे घरंगळत होतो.

तेवढ्यात एक हसू. अभिमानाचे-जिकलेल्या उन्मादाचे. मी हे काय पाहतोय ? हा पांढरा रंग पांढराच आहे का ? इतका स्मार्ट ? इतका झणझणीत ? इतका बदललेला ? कायाकल्प केलेला. स्वतःचे अस्तित्व जाहीर करणारा. माझ्याकडे लक्ष द्याच नाही तर मराल असा दम देणारा. आणि या लाल रंगाला काय झाले आहे ? यानेही आपले गुणधर्म कसे सोडले ? हा या इथे असा निमूटपणे काय करतोय ? याचे व्यक्तिमत्व बदलण्याची ही किमया कोणाची ? हा जादूगार कोण?

वीणा भार्गव. डोळयात न ठरणारा जळता हा रंग आज हे काय करतोय? पाढऱ्या रंगाशी हातात हात घालून गुपचूप सीसाँ खेळत बसलाय? बात काढलेल्या घाघासारखा गुमान कसरती करतो? हा बा आदब बा मुलाहिजा रिंगमास्टर कोण? वीणा भार्गव.

रंगांचे बोट धरून चालू लागलो. अरे अरे मला वाचवा. बुडालो बुडालो. गेलो पार खोल तळाशी. तेवढयात झपकन् वर आलो. उलटासुलटा झालो. आडवातिडवा फिरलो. डाव्याउजव्या बाजूला हिंदकळलो, पुढे मागे चकरावलो. बस्‌बस्. आता नाही सहन होत. खोलपणाचा हा जीवघेणा अनुभव. हुशऽऽहाऽऽ आता किती बरे वाटत आहे. हा हिरवा गार रंग-च्. पुन्हा भ्रमंती सुरू. कमीकमी होणारी रंगांची तीव्रता. हिरवटपणा कधी संपला? निळसरपणा केव्हा सुरू झाला? हा गुणात्मक बदल माझ्या लक्षातही कसा आला नाही? डोळयातील काजळ चोरणारा हा शर्विलक चित्रकार कोण? वीणा भार्गव. म्हणता म्हणता हा निळा रंग मला...

"हे लँडस्केप आहे काहो?" कोणीतरी पुचकले. सगळी तंद्री मोडली. खूप धाईट वाटले. फक्त डोळयाना दिसणाऱ्या वस्तूंच्या कुबडया घेतल्याशिवाय आम्हाला चित्राची मजा अजूनही लुटता येऊ नये हं? बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी वेगळाच नजारा.


क्या क्या नजारे दिखाती है आँखियाँ? आज नुसती एक्सपान्सची गंमत. काळे हिरवे निळे पांढरे रंगांचे एक्सपान्सेस एकमेकांच्या हातात हात घालून खेळणारे. माझ्याभोवती रिंगण धरून फेर धरणारे चित्र कुठे सुरू झाले? या काळया विस्तीर्णतेचा निळयाशी संबंध काय? अरे तेवढयात या निळया एक्सपान्सने मैत्री जोडली का त्या पलीकडल्याशी, विस्तीर्णतेच्या संयोजनात हरवून गेलो. कोण हा चतुर संयोजक? वीणा भार्गव

तिसऱ्या दिवशी वेगळीच जादू. एकदम रेषांनी घेरले. धावत्या रेषा-पळत्या रेषा ठेंगण्या ठुमक्या रेषा. उंचाडया तन्वंगी रेषा. लाजऱ्या रेषा. कापऱ्या रेषा. धीट रेषा. भित्र्या रेषा. नाचऱ्या रेषा. थिल्लर रेषा. गंभीर रेषा. रेषांचा केवढा तरी घोळका. पार हलवून गेलो. कोणाबरोबर धावलो. कोणाबरोबर विसावलो. कोणा-बरोबर हितगुज. कोणाबरोबर भांडण एवढा व्यापर करता करता रेषांनी एवढे घेरले एवढे घेरले की दिशाच हरवून बसलो. जंतरमंतरमध्ये हरवल्यासारखे वाटले. रेषांचा चकवा टाकणारी कोण हा मांत्रिक? वीणा भार्गव.

खूप स्त्रिया पाहिल्या पण जाणिवेवर तीनतीन दिवस हुकमत गाजवणारी अशी स्वामिनी नव्हती पाहिली. खूप चित्रे पाहिली पण नेणीवेत पोहोचून तीनतीन स्पंदन करणारे, हृदयाचा ठोका अन् फुप्फुसांचे श्वसन बनलेले असे चित्र नव्हते पाहिले.

वीणा भार्गव. काँपोझिशन थ्री. अपॉइंटमेंट वन् टू थ्री....

□ □ □



शहरातला एक अविकसित, घाण, गलिच्छ, किळसवाणा भाग...पण तितकाच आवश्यक. रोग झालेल्या शरीरातला, तोडता न येणारा एक अवयव....

या घाणीत अनेक जीव, अनेक किडे वळवळताहेत...मी त्यांच्यातलाच एक... अनेकांप्रमाणे...मीही दररोज मरतोय् पण मरण येत नाही...प्राण असूनही निष्प्राण...ध्येय आहे पण ध्येयमार्ग नाही...जगतो आहे पण जिवंत नाही...

कोण मी? आलो कुठून? जाणार कुठे?...शेकडो वर्षांपूर्वी ऋषीमुनींना सतावणारे हे प्रश्न...आजही अनुत्तरित असलेले...आणि...कदाचित् पुढे देखिल उत्तर न गवसणारे...

त्या कोपऱ्यावर...जिथे उत्तम आणि नीच वस्तींचा संगम होतो... उष्ण आणि थंड प्रवाहांचे मीलन होते त्याप्रमाणे...आमच्यातही धुके दाटले...खूप दाट... आणि प्रेमवृद्धी झाली...मासे वाढतात त्याप्रमाणे...

अशीच सुप्रभात होती. आनंदी, उत्साही, तरुण. आमची भेट झाली.

आज वाटतं ही भेट व्हायला नको होती.

ती त्या माणसाची मुलगी शोभतच नव्हती. पण मनुष्य चुकतो, आणि देवही चुकला. चांगलाच चुकला. त्याच्या चुकीनच हे सगळं घडलं. जमलं आणि विस्कटलंही.

त्या आईबापाच्या पोटी ती जन्मली, तेच मुळात चुकलं. तिच्या बापाजवळ इतकी श्रीमंती...आली, तो तीन वेळ लागोपाठ निवडून आला...आणि...मंत्रीही झाला. हेही चुकलंच. मोजून चौदा-पंधरा वर्षे उपयोग घेतला. ओबडधोबड वृक्षावर ...काटेरी झाडावर उमललेलं हे फूल...ती उमललेलीनव्हतीच...कळीच होती आणि उष्णवाऱ्याने, उमलण्यापूर्वीच कोमेजून चालली होती.

त्या संपूर्ण वस्तीत मीच काय तो जास्त शिकलेला. चांगला अर्थशास्त्राचा एम्.

---

# मंत्र्याची मुलगी

**भास्कर दोडे**

---

ए.–विशेष श्रेणीतला. पण लिफ्ट? पडलो असाच! वाट बघत. वर खेचणाऱ्याची! हो जीवनात उच्च स्थानी नेऊन ठेवणाऱ्याची...नाहीतर त्या 'वर' नेणाऱ्याची हो! मान मोडेपर्यंत वर एकसारखा मी बघत होतो. आणि दैवच ते... फिरलं झालं. अनेक वर्षांची माझी तपश्चर्या फळाला आली.

मी खरोखरच वर गेलो. पण 'चढून' गेलो नाही!

कठोर व्यवहाराच्या उच्चस्थानी पोहोचलो, पण...नाजूक भावबंध तटातट तुटले...ते होणारच होते. अनपेक्षित नव्हते, तरी...अचानक झाले...पण धुंदावलो. धुंदीत कळलच नाही....



# घडीघडीला जमते रंगत, कोका-कोलाची जर संगत

मन लावून खेळण्यात केवढी गंमत असते पहा! शिवाय, कोका–कोलाची सोबत एक वेगळाच रंग भरते त्यात. कोका–कोलाचा स्वाद असा रुचकर नि उत्साहदायक असतो की, पुन्हा पुन्हा कोका–कोलाच प्यावासा वाटतो. जगभर कुठेहि पहा, केव्हाहि पहा, कोका–कोला पिणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. वाहवा! कोका–कोला, अशी लज्जत एरवी कुठून मिळणार?

कोका–कोला, हा कोका–कोला कंपनीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे

CMCC-13-162 MR

"एक काम करणार का ?" तो गोड, मधाळ, नम्र, सुसंस्कृत आवाज प्रथमच कानी पडला नि मी तरुण झाल्याचं मला कळलं. सबंध शरीरभर एक कळ सळसळून गेली ...!

"यस् प्लीज् "—मराठीचा अभिमानी मी, पण शिष्ट वातावरणाचा परिपाक. इंग्लिश शब्द तोंडातून नकळत निघून गेले.

"मी मला...माझं...ते...हे...!" छे, छे! तिला ते जमेना. आटोकाट प्रयत्न करूनही वाक्यरचना करता येईना. असं का व्हावं हे अजून कळलेलं नाही. कदाचित् ती बोलली असेलही नीट पण माझं नव्हतं लक्ष. लक्ष होतं ते तिच्या त्या डोळ्यांकडे ! गहिरे, निळे, बोलके डोळे ! मी डोळ्यातच वाचत होतो. माझ्या लक्षात आलं ते एवढंच – ती मंत्र्याची मुलगी होती !

नाव विचारलं. तिनं सांगितलं. मी विसरायला सांगितले ते अगदी लक्षात ठेवलं – तिचा बाप मंत्री होता. ती मंत्र्याची मुलगी होती.

मी, सध्याच्या वातावरणाचा बळी. शिक्षणाचे मूल्य शून्य असलेल्या जमान्यात जन्मलो. वाढलो. जगलो. शिकण्याबद्दल आग्रहाने सांगणारे, मदत करणारे...गेले सगळे नाहीतर त्यांना विचारलं असतं पण परिस्थिती पाहून त्यांनाच पश्चात्ताप झाला असता...विद्वान सर्वत्र पूज्यते ! वाक्य ठीक, पण त्याच्यापुढे प्रश्नचिन्हच ठेवलं पाहिजे. विद्वानांची किंमत. पूज्य !

याही परिस्थितीत मी समाधानी होतो म्हणूनच सुखी होतो. संपन्न जीवनाची हौस होती पण हाव नव्हती. शिकलो पण गर्व नव्हता. मोठा झालो होतो पण मोठेपणाचा सोस नव्हता. माझ्यावर नशिबाची कृपा होत नव्हती पण त्याच्यावर खूष होतो. साधुसंतांचा उपदेश मी मनात वागवीत होतो. रामदास माझे गुरू. प्रपंच करण्याचा त्यांचा आग्रह. तो मनाचा उपदेश...संतांचा उपदेश. चित्ती असो द्यावे समाधान !...

कमलपत्राप्रमाणे माझं वागणं. जगात राहूनही अलिप्त. पाण्यावर वाढून, जगूनही संबंध नसल्याचं दाखविण्याची वृत्ती !

बोलण, चालण, वागणं, कपडेलत्ते, सवयी, संस्कार...माझं सारं कसं वेगळं, अलिप्त ठेवणारं त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणारा मी...म्हणूनच वस्तीत माझ्याभोवती आदरमिश्रित कौतुकाचे, आदराचे वलय निर्माण झालेले होते. त्या वलयाला मी जपत होतो....

तर असा मी !

जवळ आलो, जाळ्यात अडकलो.

वयच वाईट.

मला बहीण नव्हती, पण मी तिला बहीण मानली नाही. तिला माझ्याविषयी भ्रातृभाव वाटत असेल, असं वाटत नाही...तेव्हा वाटत नव्हतं, आजही वाटत

नाही. आम्ही बहीण-भाऊ म्हणून जन्मलोच नव्हतो. इतकी तरुण, सुंदर, गोड मुलगी आपली बहीण ? छे छे ! इतका अरसिक मी नव्हतो....दोघांनी न सांगता एक दिशा ठरवली होती. जाणीवपूर्वक दुसऱ्याला जाणीव न होऊ देता...

पुढे सारे सुरळीत झाले.. जमले...गाठीभेटी...प्रेम-संवाद...हिंडणे फिरणे पण सिनेमा मात्र नाही.

मी स्वतःच भीत होतो. तो अंधार, शेजारी सळसळते तारुण्य, उसळते सौंदर्य, मन होतंच ...एखाद्या क्षणी ताबा सुटला तर ? तिलाही ते व्हायला नको होतं.

एक कळलं, तीव्रतेने जाणवलं – ती घरचा विषय अजिबात काढायला तयार नाही. 'मंत्र्याची मुलगी' असल्याचं तिनं मला सांगितलं, ते पहिल्याच भेटीत... केवळ सुरक्षितता म्हणून कदाचित्...स्वतःचा मोठेपणा दाखविण्याचा तिचा उद्देश नव्हता त्यात, हे नक्की...कारण...ती मंत्रिपदाचा भयंकर द्वेष करीत होती, नि मंत्र्याचा तर फारच !

ती त्या संपत्तीचा, श्रीमंतीचा, वैभवाचा द्वेष करायची. बापाचं नाव लावलंच पाहिजे, ही समाजरीत पाळण्यासाठीच केवळ ती मोठ्या नाराजीने मंत्रीबापाचं नाव लावायची.

स्वतः नोकरी करायची. कमवायची आणि शिकायची.

पण राहायची मंत्र्याच्या बंगल्यावरच. बापाचा संबंध तोडता येणार नव्हता. समाजव्यवस्था ही अशी सर्वांगाला जखडून टाकणारी ! बापाची नि तिची महिन्याकाठी गाठभेट झाली तर विशेष !

तर ती ही अशी. नंतरच्या भेटीत मला सारखी म्हणायची,–" विसरणार ना नक्की की मी मंत्र्याची मुलगी आहे म्हणून ?"

मी नेहमी 'हो हो' करायचा. एकदाच मी म्हटलं, "कसं विसरणार ग हे ?" आणि मग ती रडायलाच लागली. अगदी हुंदके द्यायला लागली. खूप समजूत केली. 'अशी चेष्टा पुन्हा करणार नाही' म्हणून माझ्या, तिच्याही गळ्यावर हात ठेवून मी शपथ घेतली. हसणारे रडू चेहऱ्यावर काय शोभून दिसत होते पण ! मान वेळावत लाडाने म्हणाली,–" खरं ? अगदी खररं ? विसरून जायचं हं मी मंत्र्याची मुलगी आहे म्हणून ! अं ?"

"हो ! हो ! हो !!" मी त्रिवार आश्वासलो नि ती उमलली.

पण...पण...विसरण्याची आश्वासनं देऊनही स्मरणपूर्वक विस्मरण होऊ न देण्याचे मी माझ्या मनाला पुन्हा पुन्हा बजावीत असायचो–लक्षात ठेव–

'ती मंत्र्याची मुलगी आहे !'

मंत्री असलेल्या बापाची ती घृणा करायची. त्याची प्रत्येक कृती तिला तिरस्करणीय वाटे.

आणि निवडणूक जवळ आली. तिचे वडील आमच्याच भागात नेहमी उभे रहात.

पैसे वाटत. चार गुंड हाताशी येत. सर्वांवर दबाव पडे. निवडणुकीत हमखास विजय !

तिला मात्र वाटे, आपल्या बापाचा कुणीतरी पराजय करावा. मंत्रीपद जावं. आणि पुन्हा गावाकडे जावं, नाहीतर शहरातच का होईना पण प्रामाणिकपणे उद्योग करून पोट भरावं–गरिबीतसुद्धा समाधानाने आणि सुखाने जगता येतं, ही तिची दृढ श्रद्धा.

निवडणुकीची धामधूम सुरू झाली आणि ती गायब झाली. मीही गर्दीत खेचला गेलो.

पण इतक्याही गर्दीत क्षणभर का होईना, तिची आठवण येई. शब्द कानात घुमत. मधु रक्षण आठवणीत येत. साधं सोज्वळ जगण्यावर तिचा भर. गरिबीत, सुखसमाधानाने, प्रेमळ पती आणि गोंडस आज्ञाधारक मुलांच्या संगतीत हा जन्म आनंदात काढण्याची तिला हौस होती....मला अशाच विचारांच्या पत्नीची आवश्यकता होती. पण...पण गरिबीला मी आंबलो होतो. दारिद्र्याचा तिटकारा वाटत नव्हता, पण आता नकोसं वाटत होतं. थोडं चांगलं राहावं, अशी क्वचित् का होईना पण इच्छा होई. त्या आशेनेच खरं मी जीवन जगत होतो. आशाशृंखलेने बद्ध झालेला मी...सामान्य प्राणी...गुणदोषांनी लिप्त.

अजून तिचा निरोप नव्हता की तिचं दर्शन नव्हतं.

निवडणूक निकाल जाहीर झाला. तिच्या मनाप्रमाणे घडलं होतं.

तिच्या वडिलांना आमच्या वस्तीने चांगलंच फसवलं होतं. पैसे घेतले पण मते दिलीं नाहीत. लोकशाहीचा काळ. सगळीच जनता जागृत झालेली. ' आपला ' प्रतिनिधी त्यांनी निवडला.

तिच्या बापाचा पराभव मीच केला. प्रचंड बहुमतं मलाच मिळाली. अलिप्त राहण्याचा मी प्रयत्नपूर्वक अट्टाहास करीत होतो, तरी त्यांना 'मी' आपलाच वाटत होतो.

वाटलं होतं ती येईल...आनंदाने, अभिमानाने मी तिला सांगेन...' तुझ्या मनाप्रमाणे मी केलं ना ? मग आता...'

त्यानंतरचे ते दिवस कसे झरझर गेले आणि काळाबरोबर, परिस्थितीमुळे मीही फरपटतच पुढे गेलो. सरसर वर चढलो. –

मला लिफ्ट मिळाला.

आणि मग ते मंत्री निवडणं...खाते वाटप...आणि काय काय !

अर्धांग सुखावलं पण...अर्धांग दुखावलं, नव्हे मी अर्धविकलांग बनलो !

हृदय रक्ताश्रू ढाळू लागलं. पण हृदयस्वामिनीने ढुंकूनही पाहिलं नाही.

त्या दुष्ट सायंकाळी आम्ही भेटलो. तिच्या हातात ' सायंदैनिका 'चा अंक होता !

माझा फोटो आणि मंत्री झाल्याची ती बातमी – दुष्ट, जीवघेणी, संबशोधी बातमी !

पदन्यास करीत आली नाही, पण पदाघात करून गेली !

हातात दैनिक अंकाची पताका संतापाने आवळीतच ती आली.

उभी राहिली. उभीच राहिली.

'बस, बस' म्हणून आग्रह केला, पण बसली नाही. तिच्या अंगाला हात लावण्याची हिंमतही होईना. संतापाने लालीलाल झालेली. डोळे? एकदाच पाहिलं डोळ्यात मी, आणि...आणि उभाच्या उभा तेथेच जळून खाक झालो – शरीराने, मनाने आणि अंतःकरणानेही !

मी सत्य लपविण्याचा प्रयत्न केला, पण जमलं नाही. असत्य बोललो. नावगाव लपविलं. धंदाही खोटाच सांगितला. शिक्षण मात्र लपवू शकलो नाही. कारण विद्वत्तेचं तेज वगैरे जरी माझ्या चेहऱ्यावर नव्हतं, तरी सुशिक्षित आणि सुसंस्कृत वर्तन मी लपवू शकलो नव्हतो – ते शक्यही झालं नसतं कधी. मी एम्. ए. आहे, याचा मला अभिमान होता. तिनं जसं 'मी मंत्र्याची मुलगी आहे' असं एक गुपित मला सांगून टाकलं होतं, तसंच, मीही शिक्षणाबाबत खरंखरं तेच सांगितलं होतं तिला. बाकी सारं बनावट...खोटं खोटं...पण खरं लपून किती दिवस राहणार? सत्यप्रकाश चकाकणारच !

माझ्या बाततीत तेच झालं. वडिलांचा पराभव झाला म्हणून अभिनंदन करणारी ती...माझी हृदयराणी...हातातले दैनिक तलवारीप्रमाणे फिरवीत आवेशाने काय काय बोलली, तिलाच माहीत. माझे सारे अवयवच निकामी, मूक आणि बधीर होऊन गेले होते.

मी मंत्री झालो म्हणून तोंडावर थुंकून गेली. अगदी खरोखर थुंकून गेली... माझा जिवंत खून करून गेली...तिला सांगणार होतो, अगदी पाया पडून... 'मंत्र्याची मुलगी होणं तू दुर्दैवाचं समजत होतीस ...पण..पण मंत्र्याची पत्नी होऊन सुदैवाचं दर्शन तरी तू घ्यायचं होतंस ग !,

पण नाही, ती थांबलीच नाही.

बोलबोल बोलली...नि निघून गेली. थांबलीच नाही. गेली ती गेलीच.

मी पुतळा झालो. ठिकाणीच गाडून उभा राहिलो.

'मंत्र्याची मुलगी'...आली नि गेली. आयुष्यातूनच निघून गेली. पुन्हा दिसली-सुद्धा नाही!

खोलवर कुठेतरी कळ निघते. आठवण येते.

अशीच एक सुप्रभात होती. आनंदी, उत्साही, तरुण...आणि भेट झाली. झाली नसती तर बरं झालं असतं. आज वाटतं, ही भेट व्हायला नको होती. माणसे चुकतात, देवही चुकला—तो चुकला पण त्याचं विषारी फळ भोगत मी जीवन जगतोय...पण मी जिवंत आहे का? का आहे?

त्या सुप्रभाती कथा घडली...एका क्षणात...आणि ही व्यथा जडली... जन्माची...

□ □ □

च्या रात्रीच आलेली होती.) रुईया कॉलेजच्या समोरील मैदानात या साऱ्या कष्टकरी बंधूंचे एकत्रीकरण होणार होते.

दादर स्थानकाबाहेर पडताच कॉलेजच्या दिशेने चालू लागलो. आज हवा अवघी स्वच्छ होती. वातावरण आल्हाददायक होते. वाटेतच पिवळे-भगवे साफे बांधलेल्या शेतमजुरांची चाललेली एक तुकडी दिसली. महाराष्ट्राच्या राजधानीत येऊन शासनाच्या कानांवर आपले गाऱ्हाणे घालण्याचा ठाम निश्चय त्यांच्या चेहऱ्यांवर दिसत होता...

माझ्याबरोबर लाल निशाण पटाचे एकदोन कार्यकर्ते होते. गप्पा मारीत मारीत आम्ही मैदानात दाखल झालो. भूमिहीन शेतकऱ्यांच्या एकेक तुकड्या मैदानात प्रवेश करीत होत्या. साऱ्यांचा उत्साह नुसता ओसंडत होता. अर्धपोटी असूनसुद्धा भरल्यापोटाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता....

मैदानाच्या एका कोपऱ्यात एक छोटेसे ऑफिस थाटण्यात आले होते. अर्थात ऑफिस साधेच होते. चार-सहा बांबू आणि त्याला तिन्ही बाजूंनी किन्तानं लावलेली होती. दोनचार कार्यकर्ते अन्नपाकिटे जमा करत होते. एकजण लाऊडस्पीकरवरून निरनिराळ्या सूचना देत होता. हजारो अन्नपाकिटांचा नुसता खच पडला होता. अन्नपाकिटांचे ढीग लावता लावता कार्यकर्त्यांच्या अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या! गरीब शेतमजुरांना आणि आदिवासींना मुंबईकरांनी मुक्तहस्ताने अन्नदान केले होते. पाव, भाजी, चपात्या, भाकरी इ. पदार्थांचे ढीगच्या ढीग जमा झाले होते. दुसरे दोन कार्यकर्ते लालबावटे, छोटे छोटे बॅजेस देण्यात गर्क होते....

तेथून मी सटकलो तो थेट बीड जिल्ह्याच्या श्री. गुंडाप्पा जिरगे यांच्या फडात शिरलो...' येऊ कशी तशी मी नांदायला?–'च्या चालीवर बसवलेल्या एका गीतानं माझा उत्साह द्विगुणित झाला. बीड जिल्ह्याची ही मंडळी दोन तारखेस सकाळी निघाली होती आणि ४ तारखेस सकाळी दादरला उतरली होती....

...हळू हळू सारं मैदान लाल झेंड्यांनी फुलून गेलं...जणू हजारो जास्वंदीची फुलं उमलली होती...मैदानात गुलमोहोराची अवघी चारच झाडं फुललेली होती. पण आज सारं मैदानच गुलमोहोरानं डवरल्यासारखं दिसत होतं....तुतारी, डफ, तुणतुणं, ढोलकी, रणशिंग, बिगुल, कर्णे इत्यादींच्या निनादाने सारे मैदान दणाणून गेले होते. आणि 'लालबावटा झिंदाबाद'च्या गगनभेदी गर्जना सारा परिसर दुमदुमून टाकीत होत्या. रस्त्यावरून जाणारा प्रत्येक इसम दोन मिनिटं उभं राहून या मंडळींकडे पाहिल्याशिवाय पुढे जात नव्हता.

...कोल्हापुराहून तीनशे ते चारशे शेतमजूर आले होते. त्यांच्यांतील दोघे एके ठिकाणी स्वस्थ बसले होते. त्यांच्या पुढ्यात मी एकदम मांडी ठोकून बसलो. एकाला विचारले,

" काय रे बाबा काय नाव तुझं ?"
" बाळू आबा लांबुरे." थोडंसं लाजत त्यानं उत्तर दिलं.
" आणि गाव कोणतं ?" माझा पुढला प्रश्न.
"उघतगाव आमचं. मलकापूर तालुक्यातलं." जरा धिटाईनं उत्तर मिळालं आणि मग मी त्याला काही प्रश्न विचारले त्यातून पुढील माहिती मिळाली.
'बाळू आबा लांबुरेचं कुटुंब एकूण आठ माणसांचं. आता त्यातले दोघे मुंबईला नोकरी करतात. त्याला रोजगार जेमतेम दोन रुपये मिळतो. खाडा झाला तर त्याचे पैसे कापले जातात. पोटभर असे जेवण त्याला क्वचितच मिळते. कोल्हापुराहून तो तीन तारखेस निघाला होता.'
...तिथून मी जरा पुढे गेलो तो उचगावच्या दत्तात्रेय रामचंद्र रेडकर यांच्या गटापात उभा राहिलो. माझ्या एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, "लाल निशाण गट आमच्यासाठी काही करून दाखवील असा मला विश्वास वाटतो." आणि पुढे त्यानं त्याच्याविषयी माहिती देण्यास सुरुवात केली.
" सकाळी नऊ वाजता आम्ही कामाला जातो आणि संध्याकाळी सातला परत येतो. मधे एक तासभर भोजनासाठी सुटी. आठवडयाचा पगार दर शनिवारी सकाळी नऊ वाजता मिळतो. आम्हांला काम नाही असं कधी होत नाही."
मी मध्येच त्याला विचारले, "तुमची मुलं शिकलेली आहेत का ?"
" अप पोटाला नाही तर शिक्षणाला पैसा कुठून आननार ?" तो उत्तरला.
"म्होरं शिकवाया ताकद हवी नव्हं !" त्याच्या शेजारीच बसलेल्या नाना मारोती जोन्हे यांनी दुजोरा दिला. पैसा नसल्यामुळे मुलांना शिक्षण देता येऊ नये ही गोष्ट आमच्या देशाला खचितच लाजिरवाणी आहे...
...आणि मग मी अहमदनगर जिल्ह्यातील बेलोंडी फॅक्टरीच्या मंडळींमध्ये घुसलो. बाबू राघू भवाने यांच्याशी माझं हितगुज सुरू झालं. माणूस मोठा उमदा वाटला. त्याने ठामपणे सांगितले की बड्या भांडवलदारांकडून जमिनी काढून त्या भूमिहीनांना द्याव्यात एवढेच आमचे मागणे आहे. त्याच्या या म्हणण्यावर बाजूलाच तंबाखू चोळणाऱ्या विष्णू जिजाबा पवार, लक्ष्मण तुकाराम भोसले इ. मंडळींनी माना डोलावल्या.
मोर्चासाठी प्रामुख्याने जमा झाले होते ते तलासरी, संजाणा, उंबरगाव भागातील वारली लोक. त्यांत ७००/८०० बायकापण आल्या होत्या. त्यांनी ठेवणीतले कपडे परिधान केले होते. एका तरुण वारली महिलेने आपल्या पाच महिन्याच्या पोराला घेऊन शेसव्वाशे मैलांची पायपीट केली होती. सत्तरीच्या घरांतील एकदोन म्हातारेसुद्धा होते. त्यांच्यातल्या रूपजी काकडे आणि रामजी कात्याळशी माझी बातचीतकं सुरू झाली. मी माझ्या पातळ हिंदीत प्रश्न विचारत होतो आणि वारली भाषेत रूपजी उत्तर देत होता. त्याने सांगितलेली माहिती अशी –
बाईमाणसाला फक्त बारा आणे रोजगार मिळतो आणि पुरुषाला दीड ते

दोन रुपयांपर्यंत पगार मिळतो. सावकार मंडळी एकदम गबर झाली आहेत. त्यांनी हेअऱ्या काढल्या आहेत. तबेले बसविले आहेत. तुटपुंज्या पगारामुळे रोज पोटभर जेवण मिळणे त्यांना मुष्कील होते. आजारी माणूस कामावर जाऊ शकला नाही म्हणजे त्याचा पगार कापला जातो आणि मग तो सावकाराचे कर्ज काढतो. कर्ज फेडण्यासाठी त्याला सावकाराकडे काम करावे लागते. सावकारापुढे काही गाऱ्हाणे मांडावे तर तो पोलीस आणतो आणि पोलीस 'दरवडा घातला' म्हणून तुरुंगात डांबतो...

रूपजीच्या या माहितीने माझे काळीज करपून गेले. या ग्रामीण कष्टकऱ्यांच्या दुर्दशेची कहाणी ऐकून माझ्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. पोटाची खळगी भरण्याएवढं अन्न आणि लज्जारक्षणापुरतेही वस्त्र न मिळणाऱ्या वारल्यांकडे पाहिल्यावर स्वातंत्र्याचे फळ हेच काय असा प्रश्न मी मनाशी विचारला. सत्ताधारी धनिक वर्गाने या आदिवासींना नुसते दारिद्र्य आणि गुलामीत ठेवले नाही तर माणूस म्हणून समाजात वावरण्याचा त्यांचा हक्कही हिरावून घेतला आहे. समोरचं कॉलेज पाहून एकाद्या वारल्याच्या मनात विचार आला असेल, 'माझा मुलगा कधी ह्या कॉलेजमध्ये जाईल काय?'...

...आता ऊन चांगलेच तापले होते. सगळ्यांना कडकडून भुका लागल्या होत्या. कार्यकर्ते अन्नपाकिटांचे वाटप करीत होते. मैदानात सारा महाराष्ट्र एकवटला होता आणि मुंबईकरांनी दिलेली चपाती–भाकरी मोठ्या आनंदाने खात होता. दोनचार मित्रांसह मीही चहापाणी करून आलो. येताना वाटेत एका कॉलेजकुमाराची मुक्ताफळे ऐकून मन विषण्ण झालं...

त्या शेतमजुरांकडे पाहून त्या कॉलेजकुमाराची मुक्ताफळं अशी होती–'चला, या शेतकऱ्यांचं दोन वेळचं जेवण सुटलं, आणि ह्यांचं जेवण जबरदस्त असतं बरं!'

...आता साडेबारा वाजले होते. मोर्चासाठी सारी मंडळी सिद्ध झाली होती. आणि बरोबर सव्वा वाजता मोर्चातील शेवटच्या माणसाने मैदान सोडले. मोर्चा आंबेडकर मार्ग, लालबाग, मदनपुरा, महंमदअली मार्ग, बोरीबंदरमार्गे काळाघोडयापाशी आला. वाटेत हजारो नव्हे लाखो लोकांनी हा विराट मोर्चा पाहिला. सोबत ५०० लाठीधारी पोलीस होते. मोर्चाच्या वतीने एक शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले व त्यांच्या कानांवर गरीब शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांचे निवेदन घातले. काळयाघोडयापाशी एका ट्रकचेच व्यासपीठ करण्यात आले होते. तिथे श्रीमती गोदावरी परुळेकर, कॉ डांगे, कॉ. यशवंत चव्हाण इ. इ. नेत्यांची भाषणे झाली...

शेतीप्रधान देशाच्या या शेतमजुरांच्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे साऱ्यांचे लक्ष वेधण्याचे कार्य या मोर्चाने निश्चित केले आहे. शासनाने याची योग्य ती दखल घ्यावी आणि हरित क्रांतीच्या गप्पा आणि समाजवादाचा नुसता जप न करता ग्रामीण महाराष्ट्रातील दारिद्र्य गाडण्याची कारवाई करावी.

**–शरद जोशी**

# इन्साफ

तो दिवस तर एकदाचा उगवला.

याच दिवशी मी बदनाम तरी ठरणार होतो. नाही तर त्याच दिवसाच्या मुहूर्तावर एक अव्वल दर्जाचा समाजसेवक तरी ठरला जाणार होतो. मी बदनाम ठरला जाणार नाही याची मला बालंबाल खात्री होती. तरीदेखील समाजकंटकांनी रचलेल्या कपटकारस्थानाचा एवढा प्रचंड खटाटोप होता की, त्यापुढं माझी काही मात्रा चालेल असं मला मुळीच वाटत नव्हतं. कारण त्या मोहोल्ल्यात राहणारी जी अश्राप माणसं होती त्यांच्या अश्रापपणाचा पुरेपूर फायदा घेऊन त्यांना मिंधे बनवण्याचा यशस्वी प्रयत्न तेथील काही समाजकंटकांनी आगाऊच करून ठेवलेला होता. त्या बळावर त्यांनी मजवर आरोप लादला होता. साधासुधा नव्हे, तर एका मुलीला फशी पाडल्याबद्दलचा. आणि या आरोपाची शाबिती त्याच मोहोल्ल्यात पुराव्यानिशी तेथील राहणाऱ्या लोकांसमोर ते करून दाखविणार होते.

आणि प्रकारही तसाच घडला होता. बघताक्षणी तिऱ्हाईत माणसाला जसं वाटेल तसंच या समाजकंटकांना वाटावं असाच प्रकार घडला होता. एके रात्री ठीक बाराच्या सुमारास माझ्यासारख्या सडचाफटिंगाच्या खोलीत भोसल्यांची तानी झोपलेली त्या मोहोल्ल्यातील बऱ्याचशा लोकांना साक्षीला ठेवून काही समाजकंटकांनी पाहिली होती. मी तरुण आणि तानीसुद्धा तरुण. मामला होता संशय येण्यासारखाच. तशात तिच्या बापाला बोलावून आणून काही जणांनी हा सर्व प्रकार त्याला प्रत्यक्ष दाखविला. आपली तरणीताठी पोर एका तिऱ्हाईत तरुणाच्या खोलीत झोपली, फार बरं झालं, असं वाटेल का कुणा बापाला ?

तानीचा बाप हातात काठी घेऊन माझ्या खोलीत शिरला. तानीच्या झिंज्या पकडून त्यानं तिला खोलीबाहेर फराफरा ओढीत नेलं. त्यात गैर काहीच नसल्याने तानीच्या बापाला मी काहीच बोलू शकलो नाही. "कार्टे, तुला करायचंच व्हतं आसं तर दुनव्या काय वस व्हवती पडली," असे म्हणून जेव्हा तानीचा बाप तिला मारायला लागला तेव्हा मात्र मला गप्प बसवेना. मी पुढे झालो आणि त्याच्या हातातून तानीला सोडवून घेत त्याला मी बजावलं –

"खबरदार फिरून तानीच्या अंगाला हात लावाल तर."

# नाथकवी गुनवडीकर

माझ्या आवाजातील धार तानीच्या बापाला समजली असावी कदाचित. तो मग तिथं थांबला नाही. न बोलताच निघून गेला. मी तानीला खोलीत नेलं आणि खोलीचं दार सर्वांच्या समक्ष लावून घेतलं. बघायला काहीच नसल्याने माझ्या खोलीसमोर जमलेले लोक आले तसे पांगले. निघून गेले. गेले ते आपापल्या घरी नाहीत. तिथंच एक प्रार्थनामंदिर होतं. त्या मंदिरात बसले जाऊन. मालमसाला पाहिजे तसा मिळालेला होता. आता रंगभरणी केली की शिजलं प्रकरण. तोच उद्योग चालला होता त्यांचा. बोलणं अस्पष्टसं ऐकू येतच होतं मला.

" बघितली का आजकालची 'कार्य्रं–कर्ती' मानसं. कसं घाऊत्यात दरावडं घरावनं–कळालं का आता."

" पन आसं कसं म्हंता इल एवडयावनं कारभारी ?"

" मंजी आजुनबी संकाच हाय व्हय ? आता मला सांगा, तानी कोन हाय त्यांची ? भन–का कोन ?"

" कुनीच न्हाय."

' आंगं आसं. मंग आता तिच्या बापाच्या हातातनं तानीला सोडवून आपल्या घरात न्हियाला कोन करील का धडा ? सांगा की–गप्प का ? कोन करील धडा ?"

" कोनच न्हाय."

" पन ह्यांनी तर तसा धडा केला. हे बगितलंना तुम्ही ?"

" व्हय, बगितलं की."

" मंग हे कोन तिचं ?" एकजण तावातावानं बोलत होता. या विचारलेल्या प्रश्नाला मात्र कुणीच उत्तर द्यायला तयार होईना. कुणी तरी उत्तर द्यावं अशी त्याची अपेक्षा. म्हणून त्यानं हातवारे करून पुन्हा तोच सवाल सोडला –

" गप का ? सांगा की राव, हे कोन तिचं ?"

" आसं कसं भलतंच एकदम म्हनावं आम्ही."

" मंग करा आसं आता. आज भोसल्याची लेक तैनातीला पाटावली, उंद्यापासनं रोज एकेकाची पाटवत चला."

एवढं राग येण्यासारखं तो बोलला तरी कुणी चकार शब्द तोंडावाटे बाहेर

काढला नाही. मग मात्र त्या शिरा ताणून बोलणाराचं मार्ग चांगलंच भडकलं.

" च्यायला ! काय न्याय हाय का इन्साफ हय ! खुशाल एक मोहोल्ल्यातली तरनीताटी पोर योक तरनाजवान पोरगा घरात घालतुय; तरी कुनाला राग येयना ? आरं, आरं-आरं ! तुम्ही समदी मंजी मुर्दाड झाल्याली मानसं."

" मंग आतां काय करावं आम्ही आसं तुम्हाला वाटतं ?"

" तानी माझ्याच घरांतली आसती, तर नरडीचा घोटच घितला असता म्या. हो-कवाच."

तरीदेखील कुणीच काही बोललं नाही.

मी आपला माझ्या खोलीत तोंडावरून पांघरूण घेऊन निपचित पडलो होतो नि ऐकत होतो. इतक्यात –

" भावसायेब !"

" काय ग ताने ?"

" मला बया म्या वाटतंय बघा."

" कशाचं ? तुला मारायला कुणी तरी येईल त्याचं ?"

" पेटलो मी ! मला मारलं कुनी तर मारू द्या. पन तुम्ही का ह्यो बटा लाऊन घेताय हाकनाक ?"

तानीचं म्हणणं रास्त होतं. कोण होती तानी माझी ? मी कुठला. तानी कुठली. तिचा माझा नात्याचा असा काहीच संबंध नव्हता. त्या मोहोल्ल्यात राहणारे सर्वच बारा गावचे बारा. पोटासाठी तिथं राहावयास आलेले. कुणी कुणाच्या नात्यातलं नव्हतं. इतर खोल्यांतून पाच-दहा माणसांची बिऱ्हाडं होती माझ्या खोलीत मात्र मी एकटाच. खासगी कंपनीत नोकरी करून अडून राहिलेलं शिक्षण मी पूर्ण करण्याच्या विचारानं तिथं राहिलो होतो. रोज नेमानं खोलीत झाडलोट करणं, आंघोळीसाठी व पिण्यासाठी पाणी भरून ठेवणं, तसेच कपडे धुणं हा असला प्रकार हाताळण्यास मला पुरेसा वेळ नव्हता म्हणून मी मोलकरीण शोधत होतो.

तानीचा बापच म्हणाला मला, " कुठं नगं मोलकरीन सोदायला. हे इवडुसं काम तुमचं, करील माझी तानी."

पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी तानीला हे काम दिलं. त्या वेळेला तानी असेल आठ-दहा वर्षांची. दिसायला गोरी-गोमटी. पण तिच्या रूपाची कदर तानीच्या बापाचं दारिद्र्य पाहिजे तशी करू देत नव्हतं.

तानी अंग झाडून माझ्याकडचं काम करायची. मी बाहेर पडलो की माझ्या खोलीची चावी तानीच्या कमरेवर रुळायची. मी सकाळी खोलीबाहेर पडलो म्हणजे दिवे लागणीला परत येत असे. खोलीत पाय ठेवला की खोली आरशासारखी झळकायची. भांडीकुंडी चमकायची. तानीच्या या कष्टावर मी फार खूष असायचो. रविवार आला म्हणजे सबंध दिवसभर मी खोलीवर अभ्यास करीत

बसत असे. माझ्याकडचं सगळं काम आटोपलं की तानी जीं निघून जायची ती पुन्हा परत येत नसे. मी कधीकाळी तिला छानसं परकर-पोलकं घेऊन देत असे. पुढं पुढं तर तिला मी सांगूनच टाकलं, "ताने, स्वच्छ राहावं. तुझे कपडे खराब झाले तर माझ्या कपड्यांना लावतेस तोच साबण तुझ्या कपड्यांना लावीत जा. आणि हे बघ केसांना तेलही लावीत जा या बाटलीतलं. नाही तरी तूच आणतेस ना तेल ?"

यावर तानी काही बोलत नसे. 'भाऊसायेबा'चं आपण कसं तेल लावायचं ? असा बुजरेपणा तिचं मन व्यापून टाकीत असावा.

पण मग मीच दरडावून सांगे,

"हे बघ ! उद्या जर मला तुझे कपडे मळके दिसले आणि या झिज्या बिन-तेलाच्या झुऱ्या दिसल्या, तर मी कामावरून काढून टाकणार तुला. समजलं ?" तानी मान हलवीत असे. एवढ्या कामासाठी मी तिच्या बापाला दहा रुपये देत असे महिन्याला. तीच रक्कम तानीच्या बापाला फार मोठी वाटे. ती घेताना थर-थर हात कापायचा त्याचा. शिवाय अधूनमधून मी तानीला खाऊला पैसे देई, सणासुदीला कपडे देई, हे वेगळंच. आपल्याला जर कामावरून काढून टाकलं तर दहा रुपये हकनाक बुडतील अशी तानीला धास्ती वाटायची. घरी गरिबी. बाप कमवून आणायचा तेच ओलं कोरडं खायला मिळेल इतपत. तेव्हा तानीला घरून तेल मिळणं कठीणच. पण माझ्या दरडावण्यानं तानी रोज माझं तेल लावून डोकं विंचरू लागली. माझा साबण वापरून कपडे धुऊ लागली.

दिवसांमागून दिवस गेले. तानीच्या अंगप्रत्यंगात फार बदल झाला. परकरावरून पातळावर आली तानी. तरीसुद्धा माझ्या खोलीची वारतपुस्त तीच करी. कधी मजबद्दल तिच्या मनात भीती निर्माण झाली नाही की कधी पुसट शंका तिच्या बापाला चाटून गेली नाही.

माझ्या सांगण्यावरून टापटिपीची राहणी तानीच्या चांगलीच अंगवळणी पडली. यौवनाचा पुरता बहर तशात तानीच्या अंगाखांद्यावर लगडलेला. त्या सबंध मोहोल्ल्यात तानी लावण्यानं उठून दिसायची. रस्त्यानं ती चालली की तिची शोभसवाणी हालचाल बघायला टग्यांच्या माना इकडच्या तिकडं वळत.

आमच्या मोहोल्ल्यातलं बडं प्रस्थ म्हणजे लक्षीमन गायकवाड. दारूगोळ्याच्या फॅक्ट्रीत काम करायचा. पोटी मूलबाळ नसल्याने राजाराणीच्या संसाराला पगार भरपेट होऊन उरायचा. उरलेले हे पैसे मोहोल्ल्यातील अडलेल्या लोकांना तो व्याजानं द्यायचा. बरेचसे संसार रुटुखुटूनं चालणारे. त्यांना पावलोपावली भासायची लक्षीमन गायकवाडाची गरज. तोही त्यांना व्याजानं पैसे द्यायचा. व्याजाचं व्याज झालं तरी मुद्दल फिटत नसे कुणाकुणाचं. पण लक्षीमन गायकवाड भारी दमाचा माणूस. कधी तो पैसे मागण्याचा तगादा लावीत नसे कुणाला. व्याज

देण्याचा दिवस कुणाकडून चुकला की तो त्याच्या घरी जायचा व व्याजाची मागणी करायचा. पण व्याज काही मिळण्याची शक्यता नसायची. बसलेल्या सतरंजीवरून तो खिसे चाचपल्यासारखं करायचा आणि म्हणायचा—

"बरं नको देऊस व्याज किस्ना, न्हाय मागत मो. पण मर्दा एक काम कर."

"काय करू म्हंता." किस्ना अजीजीनं म्हणायचा.

"बिड्या न्हाईत. हे पैसं घी आन् जाऊन आन बंडल."

किस्ना पैसे घेऊन घराबाहेर पडायचा. मग लक्षीमनाची नजर चुलीकडे वळायची.

"आजून न्हाय झाला सैपाक?"

"न्हाय की." हलक्यानेच आवाज यायचा तिकडून. मग पाच रुपयाच्या नोटांचा चुरगळून केलेला बोळा तो रखमाकडे फेकायचा. म्हणायचा—

"चोळी घी उद्या."

गरिबी फार वाईट असते. अंगावरची लक्तरं झालेली चोळी घालण्यापेक्षा नवी चोळी घालायला मिळतेय. रखमा लक्षीमनाकडं बघायची.

लक्षीमन डोळा मारून मोकळा व्हायचा नि इशारा करायचा. गरिबी रखमाच्या अब्रूचं ताबडतोब खोबरं करायची. लांब कोपऱ्यावरच्या दुकानावरून किस्ना परत फिरेपर्यंत खोबरं होऊन तयार असायचं. लक्षीमन गायकवाडानं बऱ्याच घरातल्या अब्रूचं खोबरं केलेलं होतं. आता तो तानीवर टपला होता. त्याला तानी लेकीसारखी शोभत होती. पण कामातुर माणसाला जसं भय नसतं तशीच लज्जासुद्धा नसते.

त्यानं तानीच्या बापाच्या दुबळ्या संसाराचा फायदा घ्यायचं ठरवलं. तानीच्या बापाला त्यानं पैसे दिले. ते का फिटणार होते थोडेच? पैसे देऊन सहा महिने लोटले तरी तानीचा बाप लक्षीमनाला व्याजही देईना व मुद्दलही देतो म्हणेना. लक्षीमन सारखा तानीच्या घरी जायचा. बसायचा. बोलायचा. तानीला खुणवायचा. हे तानीच्या लक्षात आलं होतं. मग पुढे लक्षीमन जेव्हा जेव्हा तानीच्या घरी जाई तेव्हा तेव्हा तानी घरातून सटकून माझ्या खोलीत यायची.

एकदा काय झालं, माझ्या खोलीत तानी काम करीत असताना लक्षीमन आला आणि त्याने तानीला करकचून मिठी मारली. मोठ्या शिताफीनं तानीनं सुटका करून घेतली. धुणं-भांड्यांचं काम संपलं होतं. तानी म्हणाली— "एकच घागर पान्याची आनते की मंग..." लक्षीमनाला गुदगुल्या झाल्या. एक घागर काय आता घेऊन येईल तानी. भावसायेब लांब सवंसांचं घरी येणार तोपर्यंत जिकडच्या तिकडं व्हईल. त्यानं तानीला सोडलं. तानीनं बिगीबिगी कळशी उचलली व ती घराबाहेर पडली. बाहेर पडता पडता तिनं खोलीचं दार लावून घेतलं. कुलपाचा खटकासुद्धा दाबला. लक्षीमनाला वाटलं पोरगी हुशार हाय बरं का!

परंतु मी येईपर्यंत तानी माझ्या खोलीकडे फिरकलीच नाही. मी आलो की तानीच्या घरी जाऊन खोलीची किल्ली मागत असे. तानी नाही तर तानीची आई घछा किल्ली द्यायची. ती घेऊनच मी खोलीवर येत असे. मी किल्ली मागण्यासाठी येतो तशी तानी किल्ली घेऊन आली व म्हणाली,

" भावसायेब !"

" काय ग ताने ?"

" तुमच्या खोलीत मोटा उंदीर शिरलाया. तुम्ही घ्या चावी मी घेते खंदील."

खोलीचं दार उघडताना तानीनं पुढं कंदील धरला होता. मी तानीच्या पाठोपाठ खोलीत शिरलो. धरून आणल्यासारखा नि तोंडात मारल्यासारखा चेहरा करून लक्षीमन कोपऱ्यांत बसला होता. माझ्या डोक्यात लख्खकन् उजेड पडला. लक्षीमनाने मी काही बोलायच्या आतच माझे पाय धरले आणि दीनवाणी मुद्रा करून तो म्हणाला–" भावसायेब मोटच्या दिलाची मानसं तुम्ही. करूं न्हाय ते करायला धजलू खरा. पन हेवडा आनेव गाजावाजा न करता पोटांत घाला मंजी झालं."

तानीच्या कळीला स्पर्श झाला नव्हता म्हणूनच ती खुलली होती. तेवढं तरी बरं झालं होतं. मी लक्षीमनाला क्षमा केली. त्याचा गुन्हा मी कानाआड टाकला. शाबूत आहे ना सगळं; मग व्यर्थ कशाला त्याला बदनाम करू मी. या घटनेला आज दोन वर्षं झाली.

तोच लक्षीमन मला व तानीला बदनाम करावयास पुढं सरसावला होता. आता तानी आपल्याला काही मिळाली नाही अशी रुखरुख ज्यांना ज्यांना लागली होती अशा सर्व बुभुक्षित मंडळींच्या मनी बिंबवून आमच्याविरुद्ध काहूर उठवायचा लक्षीमनानं कपटकारस्थानी व्यूह रचले. मोहोल्ल्यातल्या मोहोल्ल्यातच माणसं जमवून भावसायबाला जाब विचारायचा की, तानी रातच्या बाराला तुमच्या घरात कशी? आणि मग त्याचा इन्साफ करायचा.

तो इन्साफाचा दिवस एकदाचा उगवला.

मोहोल्ल्यातली झाडून सारी माणसं जमा झाली. मधल्या पटांगणावर ' जमात बसावी ' तशी बसली. मला बोलावणं धाडलं. मीही गेलो.

विडीचा अखेरचा झुरका लक्षीमनानं घेतला नी मोठ्या ऐंटीत नाकातोंडातून धूर सोडीत तो म्हणाला,

" हे बघा बाबांनो ! तुमची, आमची समद्या पिरतीमीची आबरू हितून तिथून येक हाय का येगळी हाय ?"

" येकच. येगळी कशी ?"

" मग ह्या भोसल्याची तरनीताटी पोर भावसायबासारख्या चिकन्या–सवारख्या मानसानं रातच्या बाराला घरात न्यावी, ह्याचा आरथं काय ?"

कुणीच काही बोलेना. तरीपण एकादोघांनी ताणून धरलंच.

" ह्याचा इन्साफ जर आज झाला तर ह्या गोष्टीला आळा बसंल. न्हाय तर आज माझी आबरू लुटली उंद्या ह्याची, परवा त्याची आसं झाल्याशिवाय ऱ्हानार न्हाय."

लक्षिमनानं आपला प्रस्ताव मांडायचा तो मांडला. मी आपला गप्पच होतो. किस्ना मला म्हणाला–

" भावसायेब, काय म्हंत्यात करभारी ?"

" मला तर काहीच कळेना त्यांचं म्हणणं."

" कसं कळंल आमचं आनाड्याचं बोलनं."

" तुम्हाला स्पष्ट काय म्हणायचं असेल ते म्हणा."

" तुम्ही भोसल्याच्या पोरीला ठिवलंय असा आमचा आरोप हाय तुमच्यावर. गोष्ट खरी का खोटी ? बोला."

लक्षिमनाचं बोलणं ऐकून माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोहोचली. परंतु माझ्या या उग्रतेला शक्य तो प्रकट न करता कार्यभाग साधायचा असं ठरवून तानी भरलेल्या पंचायतीत आली आणि गरजली–

" भावसायबांना नका इचारू, मला इचारा मला."

" आगं मंग सांग की रातच्या बाराला भावसायबाच्या खोलीत तू कशी गेलीस आन् कशासाठी."


" सांगू ? तर मंग ऐका–

" ह्यो नाकानं वांगी सोलनारा लक्ष्या का फक्ष्या त्या दिवशी माझ्या बाकडं दिवंलागनीला आला. म्हंगाला, भोसले, म्हात्मा फुले मार्किटाजवळच्या थेटरात लंबरी ख्योळ लागलाय. माझा बा म्हंगाला काय त्याचा उपेग. त्यावर माझ्या बाच्या हातात तिकटीला योक आन् गाडी खरसाला योक आसं दोन रुपय ठिऊन ह्योच लख्या म्हंगाला–जा आन याच बगून ख्योळ. हे दिल्यालं पैसं न्हाय मागायचा मी. माझा बा सिनिमाला गेला. घरात मी, माझी आय, धाकटी भावंडं फुड्यात घेऊन झोपलू व्हतू इकट्यात ह्योच लक्ष्या माझ्या हातरूनावर आला. मला जाग आली. दचकून मी उटून बसले. दार मोकळं होतं. पळाले तशी भावसायबांच्या खोलीत शिरले. भावसायेब अभ्यास करत व्हतं. मी घडल्याला समदा परकार त्यानला सांगितला. ते म्हंगालं, तिथं एका बाजूला हातरून टाकून झोप तुझा बाप येस्तवर. मी निर्धास्त झोपले. बाप आला तसा ह्योच लक्ष्या मानसं, माझा बा घेऊन हितं आला. माझ्या बानं तरी ऐकून घियाचं माझं म्हननं. पन उटला आन् फराफरा वढीत माला खोलीभाईर आनुन माराय लागला. भावसायेब मंदी पडलं. दोन वर्सा मागं त्यांनी तुला संबळुन घितलं हे इसारलास वाटतं. आता मंडळी, कसा करनार ह्याचा इन्साफ ?"

" आमच्या टाळक्यात जोडं हान बया आता–चांगलं मोजून."

जमलेल्यापैकी एकजण म्हणाला आणि पंचायतच मोडली–कारण पितळंच उघडं पडलं होतं.

□ □ □



# धूपदान

## वाचनीय पण....

कुंभोजकरांचा हा संग्रह वाचीत असताना काही कथा पूर्वी वाचल्याची जाणीव सतत होत होती. अर्थातच नाव लक्षात राहिले नव्हते. या प्रतिक्रियेची नोंद अशासाठी की पूर्वी खूप चांगलं असं काही मासिकातून वाचलं तर माझ्या मनात ती नोंद बरेच दिवस राहते. अगदीच सामान्य काही वाचलं तर स्मृतीही राहत नाही. या कथांच्या बाबतीत अंधुक स्मृती राहिली होती. अशा सामान्य वाटणाऱ्या प्रतिक्रियातूनही साहित्यविषयक एक सुसूत्र प्रतिक्रिया व्यक्त होत असते असा माझा विश्वास आहे. म्हणून ही नोंद.

स्वतंत्रपणे एक कथा वाचीत असताना होणारी प्रतिक्रिया आणि कथासंग्रहासंबंधीची प्रतिक्रिया यांत फरक असतो. कारण कथासंग्रह ही एक कलाकृती नसून कलाकृतींचा गुच्छ असतो. साहजिकच प्रतिक्रिया काहीशी संमिश्र असण्याची शक्यता असते. म्हणूनच कथासंग्रहाचा एकत्र विचार करणं अनेक वेळा अवघड होतं. पण यामध्येच एक फायदाही असतो. लेखकाचे सामर्थ्य व मर्यादा, त्याचे अनुभवविश्व, त्याचा दृष्टिकोण इ. विविध गोष्टींचा शोध घेणे त्यामुळे शक्य होते. आता प्रस्तुत संग्रहातील अकरा कथा समोर आहेत.

या सर्व कथा डोळ्यासमोर आणल्या तर असं दिसतं की त्यातील अनुभवाच्या स्वरूपावरून त्यांचं वर्गीकरण सहज शक्य आहे. ‘ झपाटलेली ’, ‘ पीळ ’ या कथा अनुक्रमे ‘ मी ’ची आत्या व चिरमुले मास्तर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणाऱ्या आहेत. तर ‘ हरवलेली डायमेन्शन्स ’, ‘ रोझ मार्व्हेल ’, ‘ धूपदान ’ या कथांची निर्मिती प्रेमविषयक अनुभवातून झाली आहे. ‘ शीळ ’, ‘ अभिसारिका ’ या कथा अंतर्मनातील वादळाचं काहीस चित्रण करणाऱ्या आहेत तर ‘ धिंडवडे ’, ‘ जळवा ’ यांसारख्या कथांच्या मागे सामाजिक प्रश्नांची पार्श्वभूमी आहे.

कथांतर्गत अनुभवांचे हे स्वरूप डोळ्यांसमोर आणले तर जीवनातील वेगवेगळ्या स्वरूपाच्या अनुभवांचे आकार शोधण्याचा लेखकाचा प्रयत्न लक्षात येतो. एका मर्यादित अर्थाने याला विविधताही म्हणता येईल. परंतु साहित्याच्या संदर्भात या प्राथमिक विविधतेला फारसा अर्थ नसतो. या विविधतेहून वेगळेपणाची लेखनात

अपेक्षा असते. एखादा अनुभव लेखकाला किती अंगाने जाणवतो आणि सर्व गुंतागुंतीसह जाणवलेला अनुभव लेखक काय सामर्थ्याने व्यक्त करतो यावर प्रामुख्याने लेखनाच्या कलात्मक गुणांचा विचार करता येतो. लेखकाचे सामर्थ्य आणि मर्यादा जाणवतात त्या असा विचार करीत असतानाच. कुंभोजकरांच्या कथांत अशा सामर्थ्याचे दर्शन घडत नाही. उदाहरण द्यायचे तर त्यांच्या तीन प्रेमविषयक कथा पाहिल्या तर प्रेमभंगाने येणारी भग्नता हा एकच अनुभव ते तीन कथातून एकाच पद्धतीने रंगवीत आहेत असं लक्षात येईल. याचा अर्थच तो अनुभव एकाच पातळीवरून लेखकाला जाणवतो असा आहे. ही लेखकाच्या सामर्थ्याची मर्यादा आहे असं मला वाटतं.

## मर्यादा

या मर्यादेमुळेच ज्या कथांना सामाजिक प्रश्नांची पार्श्वभूमी आहे अशा कथा काहीशा melodramatic झालेल्या दिसतील. उदाहरणार्थ 'जळवा' कथेतील रामदास गुप्ता हा रिक्शा ओढण्याचा व्यवसाय करून महाविद्यालयीन शिक्षण घेतो ही काहीशी melodramatic घटना गृहीत धरलं, की ती कथा त्याच मार्गाने पुढे जाते. हा महाविद्यालयात शिक्षण घेणारा रिक्शावाला आपली पैशाची अडचण भागावी म्हणून गरजू लोकांना व्यावसायिक मुलीकडे नेण्याचे काम करतो. कथेच्या शेवटी त्याला दुरून परिचित असणारी त्याच्याच महाविद्यालयातील मुलगी स्वतःचा पत्ता त्याला देते. आता या घटना असंभाव्य आहेत असं मला मुळीच म्हणायचं नाही. परन्तु या घटना घडण्यात मध्ये कितीतरी मानसिक आंदोलनं अपेक्षित आहेत. या मानसिक आंदोलनांतून तो अनुभव त्यातील अंगभूत दाहकतेसह व्यक्त होईल. पण इथे तसे न घडता केवळ घटनांना महत्त्व देऊन तो अनुभव व्यक्त होतो. एका अर्थाने अनुभव व्यक्त करण्याची ही सोपी पद्धत आहे असे म्हणता येईल. हीच पद्धत धिडवडे, कोंडी, सेक्रेटरी या कथांतून दिसते.

'शीळ,' 'अभिसारिका' या कथा अतर्मनातील दडपलेल्या भावना व्यक्त करणाऱ्या आहेत. 'शीळ'मधील आचार्य इंदूरकरांच्या नकळत त्यांना नव्या विद्यार्थिनीविषयी वाटणारे आकर्षण चांगल्या प्रकारे व्यक्त होते. परंतु पतीने पुरेसे लक्ष न दिल्याने पत्नीचे लक्ष बाहेर जाण्याची शक्यता असते हा अनुभव व्यक्त करणारी 'अभिसारिका' ही कथा, अनुभवच जुना परिचित झाल्यामुळे अगदी सेट पॅटर्नमधील वाटते.

संग्रहातील या इतर कथांचा असा विचार केला की राहतात सुरुवातीच्या दोन कथा. 'झपाटलेली' आणि 'पीळ' या दोन्ही कथा मला लक्षणीय वाटतात. स्वतःच्या वडिलांना मर्यादापुरुषोत्तम मानणारी आत्या आपल्याभोवतीच्या इतर माणसांना त्याच मापाने कशी तोलते आणि त्यातून तिच्या संसाराची कशी वाताहत होते हे व्यक्त करीत असतानाच माणसाच्या एका वेगळेपणाचा आविष्कार कुंभोजकर

करताना दिसतात. मळा विकल्यानंतर आत्याचा होणारा मृत्यू आत्याची व्यक्तिरेखा अधिक अर्थपूर्ण करतो. अशाच प्रकारची 'पीळ' ही कथा म्हणता येईल. चिरमुले मास्तरांची आडमुठी वागणूक हे कोडं न उलगडण्यातच कुंभोजकरांनी ती व्यक्तिरेखा अर्थपूर्ण केली आहे.

या दोन कथा यशस्वी आहेत, असा उल्लेख केला तरी इतर कथाही वाचनीय आहेतच. कलात्मक यश आणि वाचनीयता यांचे निकष वेगळे असतात असं मला अनेक वेळा वाटतं. ज्या कथांचा यशस्वी म्हणून उल्लेख केला नाही त्या कथांच्या संदर्भात कुंभोजकर कथा मांडण्याचा प्रयत्न करतात असं वाटतं. कथांसाठी स्वीकारलेल्या अनुभवाचे पूर्ण रूप जाणण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. म्हणूनच मांडलेल्या कथा वाचनीय असूनही लेखकाची मर्यादा दाखविणाऱ्या आहेत असं वाटतं.

एकूण संग्रह वाचनीय आहे पण त्याव्यतिरिक्त फारसे काही देणारा नाही.

—दिगंबर पाध्ये

[ धूपदान : वसंत कुंभोजकर          किर्लोस्कर प्रेस
प्रकाशन : मूल्य चार रुपये ; पृष्ठसंख्या ११६. ]

□

# विरतं धुकं !

सौ. सुलभा वऱ्हाडपांडे

'विरतं धुकं' हा काव्यसंग्रह प्राचार्य 'सुगंधाबाई शेंडे' यांचा आहे. अत्यंत मागासलेल्या समाजातील त्या कवयित्री आहेत. समाजातील विषमतेचे, जातिभेदाचे जे दाहक चटके त्यांना बसले त्या दुःखातून, दाहकतेतून हा काव्यसंग्रह जन्माला आला.

समाजातील विषमतेचे, जातिभेदाचे काळेकभिन्न ढग हळूहळू नाश पावत असून समतेचे, मानवतेचे उद्घोष ऐकू येऊ लागले आहेत, ह्या कल्पनेतून कवयित्रीने 'विरतं धुकं' हे सार्थ नाव काव्यसंग्रहाला दिले आहे.

ग्रामीण भाषेतील हे काव्य अत्यंत जिवंत, रसरशीत आहे. थोर साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या काव्यात शालीन, सौंदर्यप्रेमी, सौम्य वृत्तीचे मोठे हृद्य प्रतिबिंब पडलेले आढळते. त्यांच्या काही गीतांतून मनाची कोवळीक आणि कणखरपणा, हिंमत या दोहोंचाही प्रत्यय येतो. त्यांच्या काव्यात एक प्रकारची आर्तता भरलेली आढळते. काव्यातील ग्रामीण भाषा आणि उत्कट भावभावना मनाला मोहून टाकतात.

काव्याचे चार विभाग पाडता येतील. सामाजिक, राजकीय, नैसर्गिक, आध्यात्मिक. संग्रह छोटा परंतु मोलाचा आहे. सामाजिक कविता समाजातील जातिभेदांवर, विषमतेवर आधारलेल्या आहेत. 'तुझिया आठावे' या काव्यात...

तुझिया आठावे, आज येतसे भरती ।
चंद्र होऊनिया चुंबाया का न येशीरे खालती ।
हृदयाला पडे पीळ, गळा दाटतो सारखा ।
हीन दीन दलितांना कसा झालासी पारखा ॥

'अजूनही दूर' या काव्यात अस्पृश्यतेचा उल्लेख करून त्या म्हणतात...

विठ्ठलाचे पायरीला, अवघे नाचती रंगती ।
चोखा भुकेला दर्शना, अजूनही दूर किती ॥

त्यांच्या नैसर्गिक कवितात कल्पनारम्यता अधिक आढळते. अगदी कोमल अशा त्या कविता फुलांप्रमाणे सुगंध दरवळतात.

'आला मिरग' या काव्यातील निसर्गनिरीक्षण तर मन वेडे करते...

आला मिरग मिरग, मिरगावानी गा धावत ।
कंठ सोकल्या धरतीच्या, हाकेले हुंकारीत
माता बसली गा होती, तपनी वारवत केस
मिरग घाली वेणी, भरे मोती केसोकेस...

ग्रामीण भाषा आणि उत्कट भावभावना यांचा सुरेख संगम त्यांच्या गीतातून व्यक्त होतो. त्यांच्या साऱ्या काव्याचे मर्म त्यांच्या आध्यात्मिक काव्यातच सामावलेले आढळते. आपल्या एकाकी परंतु कार्यमग्न अशा जीवनाविषयी 'मनीषा' या काव्यात त्या उद्‌गारतात...

दोहो नयनीचे दीप, तेवताती रातदिन ।
मम देहीची ज्योत, होत चालली क्षीण ।
लांबसडक ही वाट, आभाळाशी भिडलेली ।
चिटपाखरू न दिसे, नाही वृक्षाची सावली ।

त्या पुढे म्हणतात...

दोहो नयनीचे दीप, तेवताती रातदिन ।
नियतीच्या ज्योतीशी, कधी होईल मीलन ।

मनातील भावभावना, सुखदुःख त्यांच्या काव्यातून उत्स्फूर्तपणे बाहेर पडले आहे! वैदर्भीय ग्रामीण भाषेतील ह्या काव्यबगिच्यात निरनिराळ्या भावभावनांची पुष्पे विकसित झाली आहेत. 'विदर्भाच्या ग्रामीण भाषेतील' हे एक सुगंधित, प्रफुल्ल असे पुष्प आहे.

[ विरतं धुकं : प्रा. सुगंधाबाई शेंडे ]

□ □ □

रंगभूमी

# हृदयस्वामिनी

## एक सामान्य प्रयोग

यशापयशाचे अनेक चढउतार अनुभवूनही आज नाटयव्यवसायामध्ये टिकून असलेल्या संस्थेमध्ये मो. ग. रांगणेकर यांच्या 'नाटय निकेतन'चा समावेश करावा लागेल. 'आले देवाजीच्या मना'चे अपयश पचवून रांगणेकर पुन्हा उभे राहिले आहेत वसंत सबनीस यांचे नवीन नाटक 'हृदयस्वामिनी' घेऊन.

वसंत सबनीस यांचे हे नवीन नाटक खरोखरच सामान्य प्रतीचे आहे. धड ना करमणूक, धड ना एखाद्या गंभीर विषयाची प्रामाणिक हाताळणी. – बरं, या दोन्हींची सांगड घालून 'चालणारे' नाटक द्यावे, तर त्याही दृष्टीने पदरी निराशाच. असे हे नाटक मो. ग. रांगणेकर यांनी आता कालबाह्य ठरलेल्या 'नाटय निकेतन' पद्धतीने बसवले आहे.

शंकर टेंबे हा नावारूपाला आलेला नाटककार नवीन नाटक सुचत नाही म्हणून अस्वस्थ आहे. नवीन नाटकासाठी कंपनीने त्याच्यामागे तगादा लावला आहे. नवऱ्याला नाटक सुचत नाही म्हणून पत्नी–पार्वती–अस्वस्थ आहे. म्हातारी मावशीही असमाधानी आहे. शंकरचा मित्र अविनाश आपल्या संसारामध्ये पूर्ण असमाधानी आहे. पत्नीच्या बेताल वागण्याला कंटाळून तो दारूच्या बाटलीमध्ये स्वतःला बुडवून घेत आहे. अशा या अविनाशला लॉटरीचे बक्षीस मिळते. हे बक्षीस तो शंकरला देऊन टाकतो. शंकरवर त्याचा विश्वास असतोच आणि त्यातून शंकरने पैसा खर्च केला तरी त्याची हरकत नसते.–शंकरचे नवीन नाटक, त्यासाठी चाललेली सर्वांची धडपड, कंपनीच्या मंडळींनी लावलेला तगादा या गोष्टी एकदम बाजूला पडून लॉटरी प्रकरणाला एकदम महत्त्व प्राप्त होते. अविनाशची पत्नी नंदिनी लॉटरीचे तिकीट मागण्यासाठी येते. शंकर तिकीट अविनाशचे असल्याची वस्तुस्थिती मान्य करूनही तिकीट देण्याचे साफ नाकारतो. शंकरवर शिव्याशापांची लाखोली वाहून नंदिनी निघून जाते.

दुसऱ्या अंकामध्ये शंकरला मिळालेल्या लॉटरीच्या पैशाचा लोभ धरून आलेली मंडळी आहेत. – ही चारही मंडळी एकापेक्षा एक नग आहेत. जगातील सर्व चौरस्त्यांवर भेळ विक्रीची केंद्रे निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा (?) बाळगणारा

तरुण, भारतीय संस्कृतीचे जतन करण्यासाठी जीर्णोद्धाराच्या निमित्ताने लॉटरीच्या सर्व एकमेची मागणी करणारा हिरवट, वृद्ध संघटनेसाठी पाच हजार रुपयांची मागणी करून राईसप्लेटचे पैसे घेऊन पाय काढणारा वृद्ध आणि उंदीर मारण्याच्या मोहिमेवर निघालेला प्रो. मांजरेकर, अशी ही चौकडी लॉटरीचा पैसा बळकावू पाहते. या सर्व भागाचा नाटकाच्या मुख्य विषयाशी सुतराम संबंध नाही. प्रयोगाच्या दृष्टीनेही याचक मंडळींचा हा पॅच अतिशय कंटाळवाणा होतो.

अरविंद आपल्या मित्राकडे–शंकरकडे–काही पैसे मागण्यासाठी येतो. शंकर घरात नसतो. अरविंद वाट बघत बसला असताना नंदिनी अरविंदकडे किल्ली मागण्यासाठी येते. दोघांचे कडाक्याचे भांडण होऊन संतापाच्या भरात बाहेर पडलेली नंदिनी मोटर अपघातात मरण पावते. (वागणुकीचे सर्व ताळतंत्र सोडलेली महिन्यातून एकदाच – केवळ पगाराचे वेळी–पतीशी बोलणारी नंदिनी घराच्या किल्लीच्या क्षुल्लक कारणासाठी एवढे रण माजवेल हे पटत नाही. अन्य मार्गांनी हा फिरकोळ प्रश्न सोडवणे तिला सहज शक्य असते.)

शंकरच्या पत्नीचे–पार्वतीचे–हृदय कमकुवत असते. हृदयबदल शस्त्रक्रियेचे उच्च शिक्षण घेऊन आलेल्या आपल्या एका डॉक्टर मित्राच्या हॉस्पिटलमध्ये शंकर आपल्या पत्नीवर ही शस्त्रक्रिया करतो. शस्त्रक्रियेनंतर पार्वतीच्या वागण्यात एकदम बदल होतो. नंदिनीचे हृदय बसवलेली पार्वती थेट नंदिनीप्रमाणे वागू लागते. स्वतः डॉक्टरही या बदलाने अवाक् होऊन जातात. कोण्या साधू महाराजांच्या पन्नासाव्या वाढदिवसाला हैद्राबादला जाण्यासाठी निघालेल्या पार्वतीला शंकर प्रखर विरोध करतो. विरोध सहन न होऊन तिच्या हृदयावर ताण पडतो. डॉक्टर तिला कसले तरी औषध, इंजेक्शन देतात आणि पार्वतीचा मूळ स्वभाव परत येतो.

## फसलेले नाटक

खरे म्हणाल तर या नाटकाला विषय असा नाहीच. पहिल्या अंकात नाटककाराची कथा असलेले हे नाटक दुसऱ्या अंकात लॉटरीच्या फिरकीने एकदम कुठच्या कुठे वाहवत जाते. तिसऱ्या अंकामध्ये हृदय-बदलाच्या शस्त्रक्रियेनंतर तिच्यामध्ये झालेला बदल आणि त्याच्या आधारे नंदिनीच्या वागणुकीचे काही विश्लेषण, निदान लेखकाचे मनोगत स्पष्ट होईल अशी अपेक्षा असते. पण त्याऐवजी स्वभावबदलाचा चमत्कार पाहावयास मिळतो आणि नाटक संपते. एक अतिशय फसलेले नाटक असा या नाटकाचा उल्लेख करावा लागेल.


नाटकाचा प्रयोग रांगणेकरांनी अनेक नवीन कलाकारांना घेऊन बसवला आहे. या कलाकारांना मिळालेली संधी आणि त्यामुळे रविकान्त पटवर्धन (अरविंद) व विभाकर विवलकर (शंकर) यांच्या अभिनयकौशल्याचे प्रेक्षकांना झालेले दर्शन व मंगला संझगिरीची पार्वतीची उत्कृष्ट भूमिका या नाटकाच्या जमेच्या बाजू. तांत्रिक बाबींपैकी रघुवीर तळाशीलकरांचे नेपथ्य ठीक वाटले.

नाटक हातात पडल्यावर दिग्दर्शक प्रयोगाच्या दृष्टीने त्यात अनेक बारकावे भरतो. लिखाणातील दोष प्रयोगांत दूर करण्याचा प्रयत्न करतो. प्रयोग बसवत असताना लेखनातील अनेक गोष्टी खटकतात. त्यात हळुवारपणे बदल केला जातो. या दृष्टीने श्री. रांगणेकर यांनी मुळीच मेहनत घेतलेली नाही. अन्यथा शंकरच्या छोटया मुलीला इतके प्राधान्य मुळीच मिळाले नसते पैशाच्या लोभाने आलेल्या याचक मंडळींच्या प्रवेशाची हाताळणी योग्य ती काटछाट करून कल्पकतेने झालेली दिसली असती. आणि नाटक कंपनीच्या मंडळीवरही योग्य नियंत्रण ठेवले गेले असते आणि कदाचित् नाटकाचा ' चमत्कार ' वाटणारा शेवट बदलला गेला असता.

लेखनाची फसलेली बैठक, सुधारण्याचे तर राहोच, परंतु ठाकठीक करण्याचे प्रयत्नही दिग्दर्शकाकडून न झाल्याने प्रयोग बेचव ठरतो. एक गोष्ट अर्थात कबूल केली पाहिजे की बालकलाकारांच्या प्रसंगात रांगणेकरांनी रंगत आणली आहे, तथापि नाटयविषयाच्या दृष्टीने त्या प्रसंगांना महत्व नसल्याने प्रेक्षकांना त्या प्रसंगांत फारसे स्वारस्य वाटत नाही.

या नवीन नाटकाचे अपयश ' नाटय-निकेतन 'च्या पदरी आले नसते तर जास्त बरे झाले असते असे मनापासून वाटते.

—शरद मोसले




हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, बाजीराव रोड, पुणे ३०.

# आधार

प्रभावी चित्रपटासाठी आवश्यक असलेले कथाबीज नसूनही राजा परांजपे यांच्या-सारख्या मातब्बर माणसानं ' चांदणे शिंपीत जा 'सारखी कादंबरी आपल्या चित्र-पटासाठी का निवडावी हे समजू शकत नाही. त्यात कथासूत्रामध्ये जे थोडेफार बदल केले आहेत त्यामुळे चित्रपटाची अवस्था आणखीनच केविलवाणी झाली आहे.

' एकटी ' या गाजलेल्या चित्रपटाचे निर्माते जी. चौगुले यांनी कारसाज चित्र या आपल्या संस्थेमार्फत या नवीन चित्रपटाची निर्मिती केली आहे. उदंड लोकप्रियता आणि भरपूर आर्थिक यश मिळवलेले परांजपे–माडगूळकर–फडके त्रिकूट या चित्र-पटासाठी एकत्र येऊनही या मंडळींच्या लौकिकाला साजेशी कलाकृती पाहिल्याचे समाधान ' आधार ' हा नवीन चित्रपट देऊ शकत नाही.

गीता ही एक दुर्दैवी मुलगी. प्रेमविवाहाचा अतिशय कटू अनुभव आल्याने दुर्दै-वाच्या फेऱ्यात सापडली आहे. वाटचाला आलेलं आयुष्य एकाकीपणे चालवण्याची तिची तयारी आहे. अशा या गीताच्या आयुष्यामध्ये एक तरुण येतो. आपल्या भावना तिच्याजवळ व्यक्त करतो. गीताच्या निर्जीव भावनांना चैतन्य देण्याचे सामर्थ्य या तरुणाकडे नसते.

योगायोगाने गीताची बॅरीस्टर प्रभाकर यांच्याशी गाठ पडते. बॅरीस्टर प्रभाकरही एकाकीपणे जगत असतात. पत्नीने अर्ध्यावर सोडलेला संसार पुन्हा मांडण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही. प्रभाकर यांची प्रथम पत्नी आणि गीता यांच्या चेहऱ्या मोहऱ्यात विलक्षण साम्य असते. मृतपत्नीशी एकनिष्ठ राहून वीस वर्षे एकाकी आयुष्य जगणाऱ्या बॅरीस्टर साहेबांचाही या घटनेने तोल जातो. गैर-समज लवकर दूर होतात. बॅरीस्टर प्रभाकर यांच्या मूळ कल्पनेला प्रखर विरोध करून प्रभाकरांची द्वितीय पत्नी म्हणून गीता प्रभाकरांच्या घरात प्रवेश करते. गीताकडून दुखावला गेलेला तरुण दोघांच्या वैवाहिक आयुष्यात अनेक संकटे निर्माण करतो. बॅरीस्टर साहेबांना सर्व घटनांचा खुलासा होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होईपर्यंत एका छोट्या बालकाचा ' आधार ' ठेऊन गीताने जगाचा निरोप घेतलेला असतो.

राजाभाऊंनी जास्तीतजास्त प्रामाणिकपणे कथा हाताळण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. कथेच्या पूर्वार्धापर्यंत ठीक वाटणारा चित्रपट मध्यंतरानंतर एकदम तोल गेल्यासारखा फरफटत जातो. मूळ कथेतील प्रारंभीच्या घटनांना फाटा देऊन गीताचा विवाह झाल्यानंतर चित्रपटाला सुरुवात केली आहे.गीता आणि तिचा प्रियकर पती यांचे द्वंद्वगीत हिन्दी फिल्मसारखे वाटते. सारस बागेच्या परिसरात असे आणि इतक्या उघड काही होईल हे पटत नाही. पण फिल्ममध्ये सर्व चालते हे मान्य केल्यावर राजाभाऊंनी लोकेशन चांगले Exploit केले आहे हे मान्य करावे लागेल.


गीताच्या चेहऱ्यावर उडणाऱ्या कारंजाचा डिझॉल्व्ह वापरून भावना व्यक्त करण्याची युक्ती खुबीने योजलेली आहे. गीताच्या तोंडी असलेल्या एका गीतातील ' माझ्यासाठी आठ दिशांचा उघडा दरवाजा ' या ओळीबरोबर दरवाजा उघडण्याचा चमत्कार न पटणारा आहे. गीताच्या आजाराच्यावेळी आणलेला डॉक्टरही अक्षरशः पकडून आणल्यासारखा वाटतो.

राजाभाऊंचा स्वतःचा अपवाद वगळता अन्य कलाकारांची निवडही योग्य वाटते. बॅरीस्टर प्रभाकरची भूमिका राजाभाऊंनी केली आहे. कॅरेक्टरचे वय, राजाभाऊंशी मिळते जुळते असले तरी नट म्हणून राजाभाऊ प्रभाव पाडू शकत नाहीत. वय चोरण्यासाठी केलेल्या मेकअपमुळे ते कॉन्शस झाल्यासारखे वाटतात. चित्रपट प्रेक्षणीय करण्यात सगळ्यात मोठा वाटा अनुपमा या नवीन अभिनेत्रीचा आहे. घरची राणी, धर्मकन्या आणि तांबडी माती या तिच्या आधीच्या तीन चित्रपटातून तिने आपल्या अभिनय कौशल्याची चुणूक दाखवली होती तथापी अभिनय गुणांचे सुंदर दर्शन घडवण्याची संधी तिला या चित्रपटाद्वारे मिळाली. राजाभाऊंसारखा कसबी मार्गदर्शक लाभल्याने अभिव्यक्तीच्या सामर्थ्याला एक वेगळीच धार आली आहे. महाराष्ट्र शासनाने चालू वर्षीच्या चित्रपट महोत्सवामध्ये अभिनयाचे पारितोषिक देऊन तिच्या कलागुणांचा यथायोग गौरव केला आहे. गीताचा अपवाद वगळता एकही व्यक्तीरेखा सुसंबद्ध वाटत नाही. त्यामुळे अनुपमा विशेष प्रभावी ठरते. प्रभाकर आणि गीताच्या आयुष्यात आलेला दुसरा तरुण, या दोन अन्य प्रमुख व्यक्तिरेखा. प्रभाकरांसारख्या समंजस, उदात्त विचारसरणीचा आणि व्यवसायाने यशस्वी बॅरीस्टर असलेला मनुष्य, गीताच्या आयुष्यात बळेच प्रवेश करू पहाणाऱ्या सामान्य तरुणांच्या सामान्य कारस्थानाला बळी पडेल हे पटू शकत नाही. या तरुणाचे प्रारंभीचे वर्तन आणि नंतर त्याने केलेले वेडाचार यांचाही ताळमेळ जमत नाही. एखादी व्यक्ती विशिष्ट पद्धतीनेच वागते असे मला सुचवायचे नाही, तथापी चित्रपटामधील व्यक्तीरेखा उभ्या करताना त्यांच्या वर्तणुकीत होणारे बदल पटणारे नसतील तर प्रेक्षकांची गोडी कमी होत जाते.
अन्य कलाकारांपैकी विवेक, ललिता देसाई, बाळ कोल्हटकर यांचा उल्लेख करावा लागेल.

प्रभावी कथा, ही मराठी चित्रपटांची आजची गरज आहे मराठी प्रेक्षक चित्रपटांना जातो तो प्रामुख्याने कथा पहाण्यासाठी. त्या दृष्टीने ' आधार ' काहीसा वेगळा वाटला तरी समाधानकारक वाटत नाही.

चित्रपटाचा तांत्रिक अंगे बेताचीच आहेत. सुधीर फडके यांनी गीतांना दिलेल्या चाली चित्रपट पाहताना गोड वाटतात लक्षात राहील असे मात्र त्यात काही आढळत नाही.

—प्रतिनिधी



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१४ ते २० मार्च १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला सुखकारक आहे. रवी बारावा, बुध बारावा (१८।३।७० नंतर), शुक्र बारावा, मंगळ-शनी पहिले, गुरू सातवा व राहू अकरावा असे ग्रह शुभाशुभ मिश्रफळ देणारे आहेत. चंद्राचे भ्रमण मात्र ३।४।५ या स्थानातून आहे ते चांगले आहे. विद्येत अपयश, सरकारी कामे पुढे ढकलावी. पत्नी व भागीदारांकडन मनःस्ताप होणाऱ्या गोष्टी घडतील. ता. १५।१६ त्यातल्या त्यात गुरू-चंद्र-बुध त्रिकोण पराक्रम घडवून आणील. सार्वजनिक कामात यश. वाहातुकीच्या धंद्यात फायदा होईल. ता. २० ला मानसिक त्रास फार होईल. च, ल, र, त, अ या अक्षरांनी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६।१७।१८.

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला सौख्यदायक आहे. बारावे शनी-मंगळ, अकरावा रवी-बुध (१८।३।७० नंतर), शुक्र अकरावा, गुरू सहावा व राहू दहावा असे शनी-मंगळाशिवाय सर्व शुभस्थानी आहेत. वडील आजारी पडतील. पत कमी होईल. विद्येत यश येईल. धनलाभ चांगला होईल. मित्रांकडून व वडील भावंडाकडून मदत होईल. भागीदारीच्या व्यवहारात विशेषेकरून मेडिकल, मेकॅनिकल अगर बिल्डिंग कंत्राटाच्या व्यवहारात घोटाळे होतील. चंद्राचे भ्रमण २।३।४ स्थानातून आहे ते चांगले आहे. १५।१६ तारखांना धनलाभ होईल. १९।२० तारखांना थोडा मानसिक त्रास होईल. घरासंबंधीचे व्यवहार यशस्वी होतील. ज्या व्यक्तींची अगर संस्थाची नावे व, ब, आ, इ, उ, ओ या स्वरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६।१९।२०.

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला यशदायक आहे. अकरावे शनी-मंगळ, दहावे रवी-शुक्र-बुध (१८।३ नंतर) नववा राहू आणि पाचवा गुरू असे सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. सरकारी कामात संपूर्ण यश. स्थावराची कामे नीट पार पडतील. उद्योगधंद्यात संपूर्ण यश. मेडिकल व्यवसायात हातून अत्यंत अवघड अशा रोगावर मात करता येईल. विद्याभ्यासात यश. चंद्राचे भ्रमण १।२।३ या घरातून आहे ते चांगले आहे. १५।१६ ला अचानक भरपूर धनप्राप्ती १९।२० थोडेसे मनःस्वास्थ्य बिघडण्याचा योग आहे. भावंडाकडून त्रास होईल.

संततीकडून भरपूर मदत होईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे क, प, द, घ च, फ, झ ज्ञ, भ, ध, छ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सर्व सप्ताहच शुभ आहे.

**कर्क** : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला धनप्राप्ती करून देणारे आहे. शनी-मंगळ दशमात, रवी-शुक्र-बुध (१८।३ नंतर) नवमात, अष्टमात राहू व चतुर्थात गुरू असे राहूशिवाय सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे ते चांगले आहे. रवी-चंद्राना ६।८।१२ च्या स्थानांचा दोष नाही. सरकारी व सहकारी कामात यश मिळेल. धनलाभात थोडे अडथळे येतील. धंदा व्यवसाय चांगला चालेल. वडील माणसांना अर्धांगासारखा रोग होण्याचा संभव आहे. संतती आजारी पडण्याचा योग आहे. प्रवासात अडचणी येतील. मोठाले नवीन धंदे हाती घेऊ नयेत. चतुर्थातील गुरू सर्व अडचणी निवारण करील. ज, स, ख, ह, ड या अक्षरानी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६।१७।१८.

**सिंह** : या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला यशप्राप्ती मिळवून देणारे आहे. सप्तमात राहू, रवी-शुक्र-बुध (१८।३ नंतर) अष्टमात, नवमात शनी-मंगळ, गुरू तृतीयात असे ग्रहमान शुभाशुभ फल देणारे आहे. अचानक धनलाभ भरपूर होईल. मानमान्यतेला थोडासा कमीपणा येईल. प्रवासयोग येईल. त्यामुळे महत्त्वाच्या कामाना चालना मिळेल. संततीकडून त्रास होईल. ३६–४२ वयाची मुले वाईट कामात सापडून त्यांचेकरता कष्ट उपसावे लागतील. भागीदारांकडून मदत होईल. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे ते चांगले आहे. ता. २० ला पत्नीशी थोडासा मतभेद होईल. मनस्वास्थ्य बिघडेल. ता. १५।१६ धनलाभ चांगलाच होईल. ग, श, म, ट, ठ, या अक्षरानी ज्या व्यक्तींची अगर संस्थाची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६।१८।१९.

**कन्या** : या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला पीडादायक आहे. रवी-शुक्र-बुध (१८।३ नंतर) सातवे, आठवे शनी-मंगळ, सहावा राहू व दुसरा गुरू शुभाशुभ स्थानातून ग्रहांचे भ्रमण आहे. विद्याभ्यासात अपयश. संततीकडून मनस्ताप. सुखनाश. घराबद्दल नसत्या अडचणी उत्पन्न होतील. चंद्राचे भ्रमण १०।११।१२ घरांतून होत आहे ते चांगले आहे. ता. १५।१६ ला येणे असलेली रक्कम अचानक हातात पडेल. मित्रांकडून मदत होईल. स्त्रियांकडून जास्त मदत होईल. वाहनाचा अपघात होण्याचा योग आहे या दृष्टीने शनिवार-मंगळवार फार वाईट आहेत. बुधवार-गुरुवार संततीकडून त्रास होईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे क, प, द, घ, च, फ, झ, ज्ञ, भ, ध, छ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६।१७।१८

तूळ : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला सौख्यकारक आहे. पाचवा राहू सहावे रवी-शुक्र-बुध (१८।३ नंतर), सातवे शनी-मंगळ व लग्नात गुरु असे सर्व ग्रह शुभफलदायक आहेत. उच्चीचा लग्नेश शुक्र सहाव्या घरात हा अत्यंत यशदायी योग असतो. त्याचे जवळ एकादशेश, व्ययेश व नवमेश बुध-रवी आहेत. अचानक धनलाभ. मित्रांची मदत. सरकारी कामात यश. विद्याभ्यासात अपयश. संततीकरता त्रास सोसावा लागेल. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ घरातून आहे ते चांगले आहे. १५।१६ तारखांना प्रत्येक कामात यश येईल, मानमरातब मिळेल. ता. २० ला मनस्ताप होईल. दिवस विचारमग्न स्थितीत जाईल. मंगळवार व शनिवार गोष्टी थोड्या मनाविरुद्ध जातील. सर्व सप्ताहच एकंदरीत चांगला आहे. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ, या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

वृश्चिक : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला सौख्यकारक आहेत. चवथा राहू, रवी-शुक्र-बुध (१८।३ नंतर) पाचवे, शनी-मंगळ सहावे व व्ययात गुरू असे गुरूखेरीज सर्व ग्रह चांगलेच आहेत. शत्रूचा नाश होईल. हातून मोठी कार्ये पार पडतील. खर्च अफाट होईल. वित्तत अडथळे. संततीकरता धन खर्च होईल. इंडिकेटच्या कार्यकर्त्यांना फारच यशदायी आठवडा आहे. मंगळवार व शुक्रवार या बाबत फार चांगले आहेत. चंद्राचे भ्रमण ८।९।१० व्या घरातून आहे ते फारच चांगले आहे. १५।१६ तारखांना अचानक धनलाभ होईल. १८।१९ ला सार्वजनिक कामाकरता प्रवास घडेल त्यात यश येईल. २० तारखेला मानमरातब मिळेल. सार्वजनिक कामाला चांगला दिवस आहे. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे न, य, व, ब, आ, इ, उ, ओ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सबंध आठवडा शुभफलदायी आहे.

धनू : या सप्ताहातील ग्रहमान धन राशीला उत्कर्षदायक आहे. तिसरा राहू-रवी-शुक्र-बुध (१८।३ नंतर) चवथे, शनी-मंगळ पाचवे व अकरावा गुरु असे सर्वच ग्रह शुभस्थानात आहेत. हातून पराक्रम घडेल. भावंडांशी मतभेद होईल. पण वडील भावंडाकडून व मित्रांकडून मदत चांगली होईल. संततीकडून त्रास होईल. विद्याभ्यासात दुर्लक्ष होईल. बुध-शुक्र युती. विवाहाबद्दल चर्चा होऊन विवाह जमण्याचा योग आहे. २७ ते ३२ वयाच्या व्यक्तींना हा योग जास्त फलदायक आहे. व्यापारात भरपूर फायदा होईल. बुद्धिजीवी व्यक्तींना नवीन कार्यक्षेत्रे मिळतील. चंद्राचे भ्रमण सात, आठ व नवव्या घरातून आहे ते चांगले आहे. १५।१६ लग्नाचे व्यवहार करण्यास चांगले आहेत. सरकारी कामाकरता १९।२० ला प्रवास घडेल. त्यात यश येईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, फ, झ, ज्ञ, घ, छ, थ, भ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६।१८।१९

**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला भोगदायक आहे. दुसरा राहू, तिसरे रवी–शुक्र–बुध (१८।३ नंतर)–चवथे शनी–मंगळ व दहावा गुरू असे सर्व ग्रह शुभस्थानात आहे. अचानक धनलाभ होईल. भावंडांकडून मदत होईल. मान मरातब मिळेल. उद्योगधंद्यात उत्कर्ष होईल. चैनीच्या वस्तूंच्या व्यवहारात नफा होईल. मंगळवार ता. १७ ला घराबद्दल थोडासा त्रास उत्पन्न होईल. विद्याभ्यासात भरघोस यश मिळेल. शास्त्रीय लिखाणामुळे प्रसिद्धी मिळेल. हे फळ ४२ वयाचे पुढील व्यक्तींना खास मिळेल. वाणीत थोडासा उद्धटपणा येईल तो टाळावा. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानांतून आहे. ते मिश्रफलदायी आहे. ता. १९।२० मनस्तापात जातील. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे ज, स, ख, ह, ड या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १५।१६.

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला भोगदायक आहे. पहिला राहू, दुसरे रवी–शुक्र–बुध (१८।३ नंतर)–तिसरे शनी-मंगळ, नववा गुरू असे सर्वच ग्रह शुभस्थानातून भ्रमण करीत आहेत. धनलाभ भरघोस होईल. विद्येच्या बळावर पैसा मिळेल. धनस्थानातील रवी–बुध–शुक्र सर्व बाबतीत धनलाभ घडवून आणतील. संततीकडून सुख प्राप्त होईल. विद्याभ्यासात भरघोस यश येईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे ते फार चांगले आहे. १५।१६ तारखांना धनलाभ होईल. १९।२० तारखांना थोडासा मनस्ताप होईल. भागीदार अगर पत्नी मनाविरुद्ध वागतील. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. कुंभ राशीला एकच अशुभ योग राहू लग्नी. राग अनावर होईल. संयम राखणे. उपाय–चंद्रदर्शन करणे. शुभ तारखा १५।१६।१७

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला सौख्यदायक आहे. बारावा राहू, पहिले रवी–शुक्र–बुध (१८।३ नंतर) दुसरे शनी-मंगळ व आठवा गुरु असे सर्व ग्रह शुभाशुभ स्थानात आहेत. धनस्थानातील शनी-मंगळ धननाश करतील. परंतु अष्टमातील शुक्र व धनेश मगळ यांच्या शुभ योगाने धननाश टाळला जाईल. शत्रूनाश निश्चित होईल. लग्नातील बुध–शुक्र–रवी सर्व कामात यश देतील. विवाह जमण्याचा योग आहे. प्रेम विवाहात अडथळे निर्माण होतील. आय-व्यय बरोबर होईल. अफाट खर्चाला पुरेल इतका पैसापण मिळेल. पुस्तककर्ते–विक्रेते यांना दिवस फार चांगले आहेत. चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे ते अत्यंत चांगले आहे. १५।१६ घराबद्दलचे प्रश्न यशस्वी रीतीने सुटतील. ता. २० थोडेसे मनःस्वास्थ्य बिघडेल. बाकी सर्व आठवडा शुभफलदायी आहे. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे द, ध, फ, झ, ज्ञ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रलाणेच फळे मिळतील.

□ □ □



छाया । एस. डी. डिवे

एका
कसोटीच्या कालखंडातून
यशवंतरावांचे नेतृत्व
आज जात आहे.

त्यांची
लोकसंग्राहक वृत्ती
प्रागतिक दृष्टी
मुत्सद्दे़गिरी
संघटनेवरील मजबूत पकड
याव्यतिरिक्त
हा कालखंड
काहीतरी अधिक मागत आहे...

भाई माधवराव बागल

# यशवंतरावजी

## व्यक्ती
## विचार
## नेतृत्व

१० मार्च १९१४ हा यशवंतरावजींचा जन्मदिन.

शिवकाळापासून ते या कालापर्यंत अखिल भारतीय राजकारणात महाराष्ट्राला एवढं मानाचं स्थान मिळालं नव्हतं. महाराष्ट्रातल्या कोणाही व्यक्तीला एवढं स्थान, एवढं महत्त्व व एवढी लोकप्रियता मिळाली नव्हती. जगाची दृष्टी, अशी आपल्याकडे कोणी खेचून घेतली नव्हती.

यशवंतराव काय बोलले, यशवंतरावांनी पाउल कसं टाकलं, उद्या कसं टाकतील याचा खल महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतात चालला आहे. समाजवादी राष्ट्रे आणि समाजवाद विरोधी राष्ट्रे, पंतप्रधान इंदिरा गांधीजी व त्यांचे एकनिष्ठ सहकारी-भारताचे गृहमंत्री व महाराष्ट्राचे एकमेव नेते-यशवंतरावजी यांच्या उक्तीकडे व कृतीकडे निव्वळ कुतूहलाने नव्हे तर बारकाईने व आतुरतेने पाहत आहेत. भारतीय राजकारणाला आपल्या अनुकूल अशी दिशा लागावी, भारताचा आपल्याला पाठिंबा असावा, निदान भारत आपल्याविरोधी नसावा, असं जगातील दोन राष्ट्रांना वगळलं तर सर्वच राष्ट्रांना वाटत आहे.

त्या भारताचं धोरण ठरवणं हे आज इंदिरा गांधी व यशवंतरावजी चव्हाण यांच्या हाती आहे. या दोन व्यक्ती परस्परपूरक आहेत. यातुन कोणीही एक वगळली गेली, तर ते नेतृत्व अपुरं ठरेल. या दोघांच्या सहकार्याने ध्येयवादी प्रचंड शक्ती उभी राहिली आहे.

तो ध्येयवाद म्हणजे लोकशाही समाजवाद होय.

सामान्य शेतकऱ्याचा मुलगा. सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी त्यांचा जन्म झाला. जणू त्या गावाने एक चालता बोलता देव राष्ट्राच्या पदरी टाकला! शेतकऱ्याच्या पोटी शेतकऱ्यांचा उद्धार करणारा, सावकार, जमीनदार अन् राजे यांच्या गुलामगिरीतून मुक्त करणारा बळिराजा, त्यांच्या सेवेसाठी बद्धपरिकर होऊन जन्माला आला. गरीबांचा उद्धार करणारा, स्वतः गरीबीत जन्मला. विद्यार्थी दशेपासून संकटं, अपमान व विरोध यातून वाट काढावी लागली. थोर घराण्यातील एका व्यक्तीने त्यांच्या ज्ञानलालसेची कुचेष्टा केली! फीला पैसे मिळायचे नाहीत! अंगातले कपडे करणेही जमायचे नाही. अशा अवस्थेतून वाट काढीत, स्वतःच्या कर्तृत्वावर व निश्चयावर अवलंबून त्यांनी एल्. एल्. बी. पर्यंत मजल मारली.

लहानपणापासून येतील त्या संकटांवर मात करून भावी यशोमंदिराकडे वाटचाल केली. सुरुवातीपासूनच टाकीचे घाव, टीका व निर्भर्त्सना सहन केली! अद्यापही, ते घाव सहन करीत आहेतच.

यशवंतरावांचं जीवन म्हणजे विरोधी शक्तींशी सतत दिलेली झुंज होय—ती अद्यापही चाललीच आहे.

या प्रवृत्तीतूनच शिक्षण चालू असतानाच १७ व्या वर्षी त्यांनी राजकीय चळवळीत उडी घेतली. शालेय जीवनात फडावर कुस्ती मारली. आता राजकीय आखाड्यात अनेकांना चितपट करून समाजवादाचा, समतेचा व लोकशाहीचा झेंडा हाती धरला आहे. त्याचं नेतृत्व ही त्यांची कष्टाची, त्यागाची व बुद्धीची कमाई आहे. ते स्वयंभू पुढारी आहेत. कोणाच्या मेहेरबानीने चढले नाहीत.

ध्येयाशी इमानी राहून बुद्धी, भावना, प्रामाणिकपणा व मुत्सद्देगिरीच्या जोरावर ते आता महाराष्ट्राचे एकमेव नेते व राष्ट्राचे पुढारी झाले आहेत.

जनतेचा, तसं राष्ट्रनेत्या इंदिराजींचा, लोभ व विश्वास त्यांनी संपादन केला आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजाचं ते आता पूजास्थान झालं आहे.

'आमचे यशवंतराव' असे म्हणताना महाराष्ट्रीयांची मान ताठ होते. ते आता आधुनिक शिवाजी बनले आहेत.

पूर्वी एकाहून एक अशी मोठी माणसे होऊन गेली. पण त्यांच्याहून मोठी माणसे पुन्हा जन्माला येणारच नाहीत, असे विधान करणे हा माझ्या मते मानवजातीचा अपमान होय. अगदी 'डिटो' एकछापी नमुना निर्माण होणार नाही. पण त्याहून सरस निर्माण होणार नाही असं कसं म्हणता येईल?

आमच्याच डोळ्यासमोर या पिढीच्याच ह्यातीत रानडे झाले, गोखले झाले, टिळक झाले, आगरकर झाले, फुले झाले, छ. शाहू झाले अन् सर्व जगाला वंदनीय असे गांधी जन्मले! नेहरूंनी तो लौकिक खाली पडू दिला नाही. अन् काही बाबतीत तर इंदिराजींनी बापापेक्षाही अधिक धडाडी, अधिक निर्भयता अन् पुरुषाला लाजवणार!

कणखरपणा दाखवून जगाला थक्क केले आणि भारतातल्या दलित समाजाचं नेतृत्व संपादन केलं. जागतिक मान्यता मिळवली—जगातील दलितांचं लक्ष वेधून घेतलं.

आमचे यशवंतराव राष्ट्राच्या बिकट प्रसंगी काही कमी ठरले नाहीत. ते इंदिराजींच्या शेजारी येऊन बसले आहेत. महाराष्ट्राचे एकमेव नेते व बहुजनसमाजाचं दैवत बनले आहेत. ते बुवाबाजीने नव्हेत, दैवी चमत्काराचे सोंग करून नव्हे तर कर्तृत्वाचा चमत्कार दाखवून. मराठा बहुजनसमाजाचे ते आधुनिक शिवाजी बनले आहेत. त्यांना तशा अनुकल परिस्थितीचा लाभ झाला आहे—जो पूर्वीच्या पुढाऱ्यांना व थोरांना मिळ शकला नाही.

जगाची प्रगती एवढी अचाट झाली आहे की कर्तृत्वानं पुरुषाला लगेच जागतिक प्रसिद्धी मिळू शकते. त्याचे विचार एकाच दिवसात जगाच्या एका टोकापासून त्या टोकापर्यंत पोचतात. तो स्वत: १०–१५ दिवसात जगपर्यटन करून परत येऊ शकतो. जगभर त्याचे चहाते निर्माण होऊ शकतात.

शिवछत्रपतींच्या काळी, त्यांच्या कर्तृत्वाला ही अनुकूलता नव्हती ! त्यांच्या संचाराला मर्यादा पडली ! त्यातही भारत तसा महाराष्ट्र, अनेक राज्यांत विभागलेला होता. त्याचा प्रत्येक ठिकाणी त्यांना विरोध झाला. ' अटकेपार झेंडा ' ही त्या वेळच्या लोकांची मुलुखगिरीची कल्पना. यामुळे त्यांच्या थोरवीची महाराष्ट्राबाही जाणीव होऊ शकली नाही. अन् त्यांच्या विरोधकांनी त्यांची बदनामी केली. त्यांना चोर, भुरटचा ही संज्ञा दिली.

शिवछत्रपती अचाट कर्तृत्वाचे, अचाट धडाडीचे, धैर्याचे रणपटू—राजकीय मुत्सद्दी


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

ध्येयनिष्ठ, त्यागी व राजकारणधुरंधर पण ! परिस्थितीमुळं त्याचं मोठेपण जगाला कळू शकलं नाही—या दृष्टीने विचार करता यशवंतरावांना फार अनुकूल परिस्थितीचा लाभ झाला. कार्याला वाव मिळाला.

रानडे व गोखले यांचं नेतृत्व व कार्य मर्यादित होतं. विद्वत्ता, अभ्यास, वैचारिक तळमळ व स्वदेशनिष्ठा त्यांनी कायदे मंडळाच्या द्वारे साम्राज्य सरकारच्या पुढे मांडली. सनदशीर मार्ग ओलांडला नाही. जनतेत मिसळले नाहीत, विधायक कार्याला चालना दिली नाही. यामुळे त्यांचे नेतृत्व वरच्या थरापुरतं राहिलं. त्या वेळचं नेतृत्व हे स्पष्टवक्त्या विद्वानांचं होतं ते खाली पोचू शकलं नाही.

टिळकांनी राजकारणाला चढाईचं त्यागाचं व लढ्याचं स्वरूप दिलं. त्यांची देशभक्ती जाज्वल्य होती देशासाठी म्हणजे मुख्यत: स्वातंत्र्यासाठी मरण्याची तयारी होती. त्याचबरोबर त्यांचा विद्याव्यासंग, संशोधक वृत्ती असामान्य होती. पण त्यांनी बहुजनसमाजावर होणाऱ्या सामाजिक व धार्मिक अन्यायांकडे लक्ष दिलं नाही. इतकंच नव्हे तर जाणून बुजून दुर्लक्ष केलं. त्यामुळे त्यांची चळवळ व उद्दिष्ट वरच्या वर्गाला सत्ता मिळवून देण्याचं होतं, अशी बहुजनसमाजाने व बहुजन समाज्यातील नेत्यांनी समजूत करून घेतली. त्यामुळे त्यांना महाराष्ट्राचं एकमुखी नेतृत्व मिळू शकले नाही.

आगरकरांनी सामाजिक व धार्मिक प्रश्न हाती घेतले. देवा—धर्माविषयीची अंधश्रद्धा काढून टाकण्याचा प्रयत्न, अप्रियता पत्करून अत्यंत निष्ठेने केला. पण अस्पृश्य व बहुजनसमाज यांचे प्रश्न हाती घेतले नाहीत. त्यामुळे त्यांनाही बहुजनसमाजाचं नेतृत्व मिळू शकलं नाही.

फुले ही व्यक्ती मात्र तितकी विद्वान नसूनही असामान्य होती. तेथे भेदाभेदाला जागा नव्हती. रंजले गांजले कोणीही असोत, कोणत्याही धर्माचे अन् जातीचे असोत, त्यांनी सर्वांकडे समदृष्टीने पाहून करता येईल तेवढे कार्य केले. अंधश्रद्धा, देवाधर्माचा पगडा काढून टाकण्यासाठी जीव धोक्यात घालून कार्य केले. राजकारण, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण, कोणतेही त्यांच्या कक्षेतून सुटले नाही, पण अंधश्रद्धेवर जगणारा वरचा वर्ग त्यांना शत्रुवत लेखत असल्यामुळे, त्यांनी त्यांच्याविषयी गैरसमज पसरवण्याची शिकस्त केली. प्रसिद्धीची सर्व साधने त्यांच्या हाती असल्यामुळे महाराष्ट्रालासुद्धा त्यांची ओळख होऊ शकली नाही. आधुनिक विचारांचे ते भारतातील जनक होत.

या सर्व थोर पुरुषांच्या कार्याचा, विचारांचा, तसंच कार्ल मार्क्स व एम्. एन्. रॉय यांच्या आधुनिक तत्वज्ञानाचा यशवंतरावांनी अभ्यास करून आपली वैचारिक बैठक बनवली. ते कोणत्याही इझम्चे सांप्रदायिक बनले नाहीत. सर्वांचं ऋण घेऊन त्यांनी आपलं स्वतंत्र अस्तित्व कायम राखलं व पूर्ण विचारांती लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते बनले.

१४ मार्च १९७०

महाराष्ट्र व देशनिष्ठा कायम राखून जवाहरलाल नेहरूंचं नेतृत्व पत्करलं व स्तुतिनिंदेची पर्वा न करता ते त्यांच्या मागे राहिले. संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावेळी त्यांची महाराष्ट्रनिष्ठा तशीच नेहरूनिष्ठा कसाला लागली.

यशवंतरावजींना संयुक्त महाराष्ट्र नको होता असं नव्हे, पण त्यांना संयुक्त महाराष्ट्र समितीचा मार्ग पसंत नव्हता. नेहरूंच्याकडून आपण संयुक्त महाराष्ट्र मिळवू अशी त्यांची श्रद्धा होती. सं. म. समितीचा नेहरूंच्यावर विश्वास नव्हता. लढ्याच्या मार्गानेच तो मिळेल असं समितीला वाटत होतं. मी समितीत होतो. मी लढ्याचा मार्ग पसंत केला व चळवळीत वहात गेलो. नेहरूनिष्ठा ही त्यांनी व्यक्तिस्वार्थापायी स्वीकारली आहे असा आम्ही प्रचार केला. मी समितीतल्या पुढारी व्यक्तींत मोजला जात होतो. मी यशवंतरावजींच्यावर टीका करण्यात अन्यांच्या पुढे मजल मारली! शिष्टाचार व सभ्यतेला फाटा दिला. उच्चारू नयेत ते शब्द उच्चारले. नेहरू महाराष्ट्राचे शत्रू आहेत असं म्हणण्यापर्यंत, काहींची मजल गेली.

भकलेल्या आमच्या डोक्याला यशवंतराव समजू शकले नाहीत. लोकांना आम्ही भडकवले. यशवंतरावांच्या सभेवर व यशवंतरावांचेवर दगडांचा व चपलांचा वर्षाव झाला. शिव्यांची लाखोली वाहिली गेली. मी त्या पापापासून अलिप्त नव्हतो.

यशवंतराव डगमगले नाहीत. आपल्या निष्ठेला जागले. 'मुंबईबद्दल मला खरीखुरी आत्मीयता आहे. परंतु त्यापेक्षाही भारताचे ऐक्य टिकावे याबद्दल मला तीव्र आस आहे...आम्ही महाराष्ट्रीय असे मानतो की आमचे म्हणून जे आहे, आमच्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या भारताच्या सेवेसाठी आहेत. आम्ही प्रथम भारतीय आहोत नंतर महाराष्ट्रीय आहोत.'

यशवंतरावजींनी ही निष्ठा विद्यार्थिदशेपासून बाळगली होती. १९३० सालच्या असहकारितेच्या चळवळीत वयाच्या १७ व्या वर्षी जो भाग घेतला होता तो काही कराड, सातारा अगर नुसत्या महाराष्ट्रासाठी नव्हता. तो देशासाठी होता.

तीच राष्ट्रनिष्ठा त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडवताना शाबूत ठेवली होती. म्हणून उद्दिष्ट मान्य असूनही ते चळवळीत सामील झाले नाहीत. नेहरूंचं मतपरिवर्तन करीन ही त्यांची श्रद्धा खरी ठरली व संयुक्त महाराष्ट्राला नेहरूंची मान्यता मिळवली.

त्याच निष्ठेमुळे आजच्या बिकट प्रसंगी त्यांनी आपली निष्ठा काँग्रेस व लोकशाही समाजवाद यांवर नितांत निष्ठा बाळगणाऱ्या इंदिराजींच्या पाठीशी उभी केली आहे. त्यांच्या आचारात, विचारात व कृतीत विसंगती नाही. व्यक्तिस्वार्थासाठी पत्करलेला संधिसाधपणा नाही. पूर्वी नव्हता, आज नाही. जे स्वतःच संधिसाधू आहेत त्यांच्या दृष्टीला त्यांची ध्येयनिष्ठा उमगणार नाही. यशवंतराव आपल्या निष्ठेशी खंबीर राहिले आहेत.

त्यांनी गांधीवाद, रॉयवाद, तसेच फुल्यांचे विचार पचवले आहेत—'शत्रूवरही प्रेम

करायला शीक ' ही गांधीजींची शिकवण त्यांनी आपल्या आचरणात आणल्याचा अनुभव मला स्वत:लाच मिळाला आहे.

ज्या मी सं. म. चळवळीचे वेळी त्यांच्यावर लाखोली वाहिली त्या माझ्याबद्दल बोलताना यशवंतरावांनी मागेसुद्धा कधी वाईट उद्‌गार काढले नाहीत.

माझा प्रश्न निघाला असता ते बाळासाहेब देसाई यांच्याजवळ म्हणाले – तसं बाळासाहेबांचं मला पत्र आलं. त्यावरून यशवंतराव किती थोर मनाचा माणूस आहे याची प्रचीती पटली व हाती पत्र असतानाच त्यावर भरल्या अंत:करणाची टिपे गळू लागली ! बाळासाहेब लिहितात—

'आज मी माननीय मुख्य मंत्री श्री. यशवंतरावजींच्याकडे तास दीड तास बसलो. बोललो. कोल्हापूर हा अनेक विषयापैकी एक विषय होता. आपल्यासंबंधीचे त्यांनी खालील उद्‌गार काढले.

' माधवरावजींनी पूर्वी ज्या समाजासाठी जे कार्य केले आहे, जी हाडे झिजवली त्यामुळेच आज त्या चळवळीचा तुम्हा-आम्हांस या स्थानाप्रत येऊन पोचण्यास मदतीचा हात मिळाला आहे...आज ते आपल्या पाठीशी आपल्या पुण्याईसह उभे आहेत हे आपले भाग्य आहे ! '

माझ्यासंबंधीच्या या भावना एका जाहीर समारंभातही प्रकटपणे मांडल्या गेल्या, अन् हे उद्‌गार ते मुख्यमंत्रिपदावर असताना काढले. १८ जून १९६१ ची ती सभा – त्या समारंभाच्या अध्यक्षपदावरून यशवंतरावजी म्हणतात,

' माधवरावजींनी आताच सांगितले की त्यांचा आणि माझा परिचय अगदी अलीकडचा आहे. पण माधवरावजींना मी फार दिवसांपासून ओळखतो. १९३१ साली माझ्या तालुक्यात एक राजकीय परिषद झाली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष होते बापुजी अणे. त्या परिषदेत मी स्वयंसेवक होतो. ३० सालची चळवळ संपली होती. आर्यविन करारामुळे थोडेफार यश पदरात पडले होते. त्यामुळे परिषदेचे वातावरण मोठे उत्साही होते. या परिषदेच्या व्यासपीठावर माधवरावजी बसले होते. या परिषदेतील एका ठरावास माधवरावजींनी एक उपसूचना मांडली होती आणि ती पास करून घेतली. ती उपसूचना सावकारीचे व्याज कमी करावे अशी होती. जबरदस्त व्याजामुळे गोरगरीब आणि शेतकरी नाडले जातात असा मुद्दा त्यांनी प्रभावीपणे मांडला. यामुळे व्यासपीठावर एकच खळबळ उडाली. मात्र माझ्यासारख्या शेतकरी मुलांच्या मनावर मोठा परिणाम केला. राजकीय पक्षाला आर्थिक कार्यक्रम असू शकतो याची त्यावेळी जाणीव झाली. माधवरावांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा आणि गोरगरीब जनतेच्या हिताविषयी त्यांच्या ठिकाणी असलेल्या तळमळीचा माझ्या मनावर त्या वेळी जो खोल ठसा उमटला आहे तो अजनही कायम आहे. '

स्वत:ला कमीपणा पत्करून दुसऱ्याला मोठे करण्याचा स्वभाव खऱ्या मोठ्या

माणसाखेरीज असू शकत नाही.

मुख्यमंत्रिपदावर असताना यशवंतरावजी हे बोलतात आणि मलाच त्या आठवणीची जाणीव देतात व आपण स्वत: एक सैनिक होतो व राजकीय पक्षाला आर्थिक कार्यक्रम असतो हे त्या वेळेपर्यंत आपल्यास माहीत नव्हतं याची कबुली देतात!!

मी तर त्यांच्यावर शिव्याशापांचा वर्षाव केला होता. माझ्या तोंडून किती अभद्र शिव्या गेल्या याची जाणीव झाली म्हणजे माझी मान शरमेने खाली होते, याची जाणीव मात्र त्यांनी मला कधी दिली नाही. ते माझा अगदी मोकळ्या मनाने गौरव करतात – ते म्हणतात,

'ज्यांनी निरपेक्षपणे जनसेवा केली आहे, कसल्याही व्यक्तिगत फायद्याची, जागेची अपेक्षा न करता केवळ दुसऱ्याचे भले व्हावे म्हणून काम केले आहे, जनतेचे हित हाच एक मोठा आनंद मानला आहे, अशा व्यक्ती महाराष्ट्रात अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या थोड्या आहेत. त्यात माधवरावजी बागल हे एक आहेत. हे मी आत्ताच बोलतो आहे असे नाही. फार दिवसांपासून माझ्या अंत:करणात ही भावना आहे. ज्यांच्यावर कधीही टीका करायची नाही अशी मी खूणगाठ बांधून ठेवली आहे अशा दोन व्यक्ती होत्या. त्यांपैकी माधवराव बागल हे एक आहेत. दुसरे कै. केशवराव जेधे. या दोघांनी महाराष्ट्रात फार मोठी कामगिरी केली आहे. त्यांची नोंद इतिहासाला घ्यावी लागेल.'

यशवंतरावजी केवळ शिष्टाचार म्हणून हे बोलले नाहीत. ते नाटकी आहेत असा कोणीही कितीही आरोप केला तर तो मी खरा मानणार नाही. मला त्यांचा तसा कधीही अनुभव आलेला नाही.

माणसाच्या सार्वजनिक जीवनाहून खासगी जीवनात आणि व्यवहारात त्याचा खरा स्वभाव समजतो. तो मी बारकाईने निरीक्षण केला आहे. त्यांच्या स्वभावातील खरी थोरवी, त्यांच्या निगर्वी व नम्र स्वभावात कितीवेळा तरी मला पाहता आली.

आम्रवृक्ष फलभाराने नम्र होतो. जितकी फळे येतील तितकी त्याच्यात अधिक नम्रता येते. – यशवंतरावजी यशाची, सत्तेची व लोकप्रियतेची पायरी जशी चढत जातील तसे ते अधिकच नम्र होतात.

खेडुताशी बरोबरीच्या नात्याने बोलतील. त्यांच्या खांद्यावर हात टाकून घरगुती गोष्टींची विचारपूस करतील. ते दिल्लीच्या उच्च आसनावर जाऊन बसले तरी आपल्या जुन्या संबंधितांशी घोंगडीवर बसून गप्पा मारत बसतील – त्यांच्या सुखदु:खांशी समरस होतील. म्हणूनच त्यांनी मोठा लोकसंग्रह केला आहे.

यशवंतरावजींच्या या गुणामुळे मला राजर्षी शाहू महाराजांची आठवण होते. त्यांच्या अंतर्मनाची ओळख चरित्राहूनही आठवणीतून बरोबर अजमावता येते.

यामुळेच त्यांनी हजारोंच्या मनावर आपली छाप बसवली. राजपदावर राहूनही लोकांपासून अलिप्त राहिले नाहीत. मी एक शेतकरीच आहे असं म्हणण्यात त्यांना अभिमान वाटत होता.

शेतकऱ्याच्या पोटी ते जन्मले हे त्यांचं खरं वैभव आहे. आमचा यशवंत भारताच्या घरचा कारभार पाहतो हे सांगण्यात महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना किती अभिमान वाटतो. जणू काय तेच गृहमंत्रीपदावर आहेत.

तेच यशवंतराव मला मानतात याबद्दल मला तरी का अभिमान वाटू नये? मी वयाने मोठा असेन पण वय म्हणजे मोठेपणा नव्हे! त्याच्या गुणाशी तुलना करता मी किती लहान माणूस याची जाणीव मला झाल्याखेरीज रहात नाही. जणु मी हिमालयाच्या पायथ्याशीच बसलो आहे. त्याची उंची कितीतरी वाढली आहे.

ते राजकारणी आहेत, तसे विद्याव्यासंगी आहेत. सुसंस्कृत आहेत. एकाच माणसाच्या अंगी किती गुण असावेत! त्यांना काव्याची आवड आहे. साहित्यात रंगतात. गाण्याच्या बैठकीत गुंग होतात. नाटकात रस घेतात. त्यांचे वक्तृत्व मैदानी नाही पण मुद्देसूद, संयमी अभ्यासू असतं. त्यात चढउतार असतो. हसवतील, खेळवतील आणि खेळवता खेळवता मर्मी घाव घालून हतबुद्ध करतील. केव्हा केव्हा त्यांच्या भाषेत तरवारीचा खणखणाट व लढाईतील बेदरकारपणा येई – परवाच महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या मेळाव्यातलं त्यांचं भाषण हे ऐतिहासिक ठरले. त्यांनी आपली भूमिका तितक्याच ठाम शब्दात प्रकट केली. सारे म्हणत बाहेर आले. वा: वा: आज यशवंतरावनी कमाल केली.

आम्हांला खरा नेता लाभला!

त्याच आमच्या नेत्याने पाकिस्तानला साताऱ्च्या मराठ्याचा पीळ दाखवला! अन् आक्रमण करणाऱ्यांचा धुव्वा उडवला!

शालेय जीवनात यशवंतराव कवी होते. त्या वेळी त्यांनी मेळाव्याची पदे तयार केली होती. कथाही लिहिल्या. वक्तृत्वकलेतही नाव मिळवले. बक्षीस मिळवले.

याहून आम्हासारख्यांच्या मनावर त्यांनी जी पकड बसवली ती त्यांच्या माणुसकीमुळं. ही माणुसकी नसती तर आम्हांला त्यांचा राजकीय मोठेपणाच तेवढा जाणवला असता. पण जिव्हाळा, प्रेम व भक्ती निर्माण झाली नसती. ती त्यांनी दाखवलेल्या खासगी वागणुकीमुळे. माणसे कायमची बांधली जातात ती स्वभावातील गोडव्यामळे! त्यामुळे ते दिल्लीत असूनही जवळचे वाटतात – म्हणूनच अनेकांच्या तोंडातून शब्द बाहेर पडतात आमचे यशवंतराव.

या शब्दांत अभिमान आहे तसा जिव्हाळा आहे. प्रेमाने माणस बंदा होतो. पैशाने नाही.

ते कराडला आले होते. माझी गाडी नसल्यामुळे मी एका कारखानदाराबरोबर

कराडला गेलो होतो. त्या वेळी ते मुख्य मंत्री होते. माधराव बागल शहरातलाही बस प्रवासी. बड्यामंडळी बरोबर गेलो होतो—यशवंतराव कराड सर्किट हाऊसवर व्हरांडघात इझीचेअरवर बसले होते. त्यांच्या दोन्ही बाजूंस किर्लोस्करी लोखंडी फोल्डिंग खुर्च्यांवर बरेच लोक रांकेने बसले होते. मला पाहताच यशवंतरावजी उठले व आपली खुर्ची मोकळी करून मला म्हणाले, 'बसा माधवराव'

मी गुदमरून गेलो. मला हा मान झेपण्याजोगा नव्हता. मी म्हणालो, 'काय म्हणायचं हे यशवंतराव. ती तुमची खुर्ची. मी कसा बसू तिच्यावर?'

'अहो मला ती कंफर्टबल वाटेना म्हणून म्हणतो तुम्ही बसा त्या खुर्चीवर'

तसं म्हटलं गोष्ट किती लहान पण आयुष्यभर आठवण राहण्याजोगी. मला तर विसरतो म्हटलं तरी विसरता येणार नाही. स्वभावातला हा बारकावा, ही नम्रता, व्यासपीठावरचे यशवंतराव पाहून अगर ऑफिसमध्ये काम करीत असलेले पाहून कसा समजणार!

मी प्रोस्टेट ग्लॅंडचं ऑपरेशन करून घेण्यासाठी मुंबईस गेलो होतो. एम्. एल. ए. क्वार्टर्समध्ये उतरलो होतो. सहजी यशवंतरावना फोन केला. 'यशवंतराव मी आलो आहे. तुम्हाचा भेटू इच्छितो.' लगेच उत्तर आलं: 'तुम्ही येऊ नका मी गाडी पाठवतो' थोडक्याच वेळात गाडी आली. ती खुद्द चीफ् मिनिस्टर वापरत असलेली स्वतःची. गाडी सर्व नाकेवाल्या पोलिसांच्या आळखीची. शोफर त्यांचा— आम्ही रुबाबात बसला. प्रत्येक नाक्यावरचा पोलीस कंबर ताठ करून सलामी देत होता!

मी ऑपरेशनसाठी आलो आहे असं समजताच बाँबे हास्पिटलच्या रजिस्ट्रारला लवकर खोली द्यायला सांगितली व ऑपरेशन झाल्यावर माझ्या प्रकृतीची सारखी चौकशी करीत व भेटायलाही येत. यामुळे हॉस्पिलमध्येही आमचा भाव खूप वाढला. इतर मंत्रीही भेटायला येऊ लागले. मला सुदाम्याची आठवण झाली.

दिल्लीस गेल्यानंतर त्यांची माझी भेट होईना. पण भेटीची ओढ लागली होती. प्रकृती ढासळत चालली होती. वयामुळे नोटीसही लागू झाली होती. तेव्हा तसं काही होण्या अगोदर भेटून याव म्हणून कराडला गेलो. तेथून ते लगेच कोयनेला जाणार होते. कोल्हापूरची एक दोन मंडळी माझे अगोदर येऊन खोलीत बसली होती. मी बाहेर वाट पाहत बसलो होतो. तोच ती मंडळी बाहेर पडली. मागोमाग यशवंतरावही होते. वाटले आता ही स्वारी कोयनेला निघाली मग माझी कशी गाठ पडणार. मी चटकन् पुढे झालो व यशवंतरावांच्या हाताला धरलं-म्हटलं 'यशवंतराव मी आलो आहे ना. मला भेटल्याशिवाय निघाला काय?'

'अहो नाही माधवराव त्या मंडळींना पोचवण्यापुरतं बाहेर आलो होतो. चला-आत.'

मी म्हटलं 'यशवंतराव, मी वेळ घेत नाही. निव्वळ पाहण्याकरता, भेटण्याकरता

व म्हाताऱ्या माणसाचा आशीर्वाद देण्यापुरता आलो आहे. कोणाबद्दल काहीही चांगल वाईट सांगायला आलो नाही व सांगणार नाही. आणि यापुढे माझ्या काहीही तक्रारी मांडणार नाही.'

यशवंतराव म्हणाले–' बसा. अशी घाई करू नका तुम्ही. मला नेहमी लिहीत जा. तुमचे विचार कळवत जा. मला स्तुतिपाठक नको आहेत. तुमच्या सारख्यांनी आपले विचार कळवले नाहीत तर मला समजणार कसे ?'

कोण म्हणेल ही वृत्ती हुकुमशाहीची म्हणून ?

याच आश्वासनाचा फायदा घेऊन मी नुकताच कराडला निघालो होतो. गाडी नक्की केली होती पण त्याचवेळी ब्लडप्रेशर वाढलं–डॉक्टरनी सल्ला दिला जाऊ नका म्हणून–

तेव्हा आता केव्हा भेट पडणार ! म्हणून मी माझे काही विचार मांडणार आहे. माझं गुप्त काहीच नसतं. विचार मनात येतात ते खासगी पत्रात लिहितो तेच खासगी बैठकीत बोलतो अन् वर्तमानपत्रांत व व्यासपीठावरही तेच प्रकट करतो.

अखेरच्या नोटीसीची अंमलबजावणी होण्यापूर्वीच लिहिलेलं बरं म्हणून लिहीत आहे–

महिनाभर सरस्वती हॉस्पिटलमध्ये अंथरुणावर जखडून होतो. उठता बसता हलता येत नव्हतं अशावेळी गिरी निवडून आल्याची बातमी वाचली. कोण आनंद झाला म्हणून सांगू ?

–गिरींना यश म्हणजे, इंदिराजींना यश, इंदिराजींना यश म्हणजे समाजवादाला यश.

समाजवाद हे तर माझ्या जीवनाचं ध्येय.

१९३० सालापासून त्या ध्येयाशी इमानी राहून सत्तेशी झगडत आलो. खडतर कारावास सहन केला. आजारात काही होण्याअगोदर नवयुगाची पहाट पाहिली. मी लगेच पेढे आणवले व दवाखान्यातील सर्व स्टाफला वाटले. व अभिनंदनाचे पत्र लिहून घेतले व प्रसिद्धीस दिले.

महाराष्ट्र प्र. कॉंग्रेसने उघड पाठिंबा देण्यापूर्वी मी हे पत्रक छापले. अन् ज्या वेळी यशवंतरावजींच्या मुखाने महाराष्ट्र प्र. कॉंग्रेसची लोकशाही समाजवादावरची निष्ठा निश्चयाने व कणखरपणे जाहीर केल्याचे ऐकलं त्या वेळी जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

पर्यायी नेतृत्वाच्या कल्पनेचा मी जाहीर विरोध केला. ती गोष्ट महाराष्ट्राचा घात करणारी ठरेल. असे प्रतिपादन केले.

कॉंग्रेस फुटली बरे झाले. या संघर्षात आम्हीच खरे समाजवादी म्हणण्याचा प्रयत्न होणार. पण कृतीशिवाय लोकांचा विश्वास बसणार नाही.

तशी कृती आमच्या इंडिकेट बाजूच्या मंत्र्यांकडून व्हायला पाहिजे. घोषणेप्रमाणे अंमल व बोलीप्रमाणे कृती झाली तरच इंडिकेट ग्रुपचं बळ वाढेल.

सिंडिकेटमधील बरेच मंत्री बदनाम झाले आहेत. त्यांच्या दोषास्पद चारित्र्यामुळे त्यांचं वजन नष्ट झालं आहे. नाव घेतलं की लोकांच्या कपाळाला आठ्या पडतात म्हणून यशवंतराव आपले मंत्री हे टीकेचा विषय होऊ नयेत अशी दक्षता घेतली पाहिजे. काही मंत्री असा टीकेचा विषय होऊन बसले आहेत. लोक त्यांच्या तोंडावर बोलून अपमान करीत नाहीत एवढेच. म्हणून--

सर्व मंत्र्यांनी, खासदार, आमदार, सहकारी संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी व अंमलदारांनी अधिकारावर येण्यापूर्वी आपली इस्टेट किती होती. आज किती आहे, त्यांच्या गाड्या इमले कसे उठतात याची चौकशी केली पाहिजे. आदेश देऊन त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, गरीबी - श्रीमंती गेली पाहिजे असा इशारा व्यासपीठावरून द्यायचा व स्वत: कोट्याधीश होण्याचा प्रयत्न करायचा ही ढोंगबाजी थांबली पाहिजे. कारण मंत्र्याच्या चारित्र्याकडे सर्वांचे लक्ष असते. त्याचा चांगला वाईट परिणाम राज्यावर होतो.

तशीच दुसरी अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेची.

हे ऐक्य सर्व धर्मांना व धर्मियांना उत्तेजन देण्याने कधीही निर्माण होणार नाही. धर्मसंस्थापकांनी मानवतेच्या उद्धारासाठी काही उच्च तत्त्वे सांगितली असली तर धर्मसंघटनेने ती गाडून टाकून संप्रदायाला महत्त्व दिले, आपआपल्या धर्मातला कळप वाढवण्याचा प्रयत्न केला अन् अन्य धर्मीय आत आले नाहीत त्यांची कत्तल केली. जगात रक्ताचे पाट वाहवले--

निव्वळ तत्त्वाचा प्रचार करून कोणी स्वस्थ बसले नाही.

ख्रिस्त प्रभूंनी अहिंसा तत्त्वासाठी स्वत:चा बळी दिला. त्याच धर्माच्या अनुयायांनी आपला कळप वाढावा म्हणून हिंसेचा अतिरेक केला--

महंमद पैगंबरनी विश्वबंधुत्वाची दीक्षा दिली तर त्यांच्या अनुयायी इस्लाम धर्मीयांची संख्या वाढावी म्हणून एका हातात कुराण व दुसऱ्या हातात तरवार धरून असंख्यांची कत्तल केली--

सर्वधर्म सहिष्णुतेची महती गाणाऱ्या हिंदु धर्मीयांनी बुद्ध धर्मीयांचा छळ केला व आज तर अस्पृश्यांवर राक्षसी अत्याचार आमच्याचकडून केले जात आहेत--

आणि बुद्ध धर्म स्वीकारलेल्या राष्ट्राने साम्राज्याच्या महत्त्वाकांक्षेने वेडे होऊन तसाच रक्तपात केला--

म्हणून भारताने निव्वळ निधर्मी राज्याचा पुकारा करून चालणार नाही ते धर्मविरहित राज्य होईल असे धोरण आखले पाहिजे. सर्वधर्म सहिष्णुता याचा अर्थ प्रत्येक धर्मीयांच्यात धर्मभावना जागी करणे नव्हे.

अशा या, मानवतेत फूट पाडणाऱ्या धर्मांची या नव्या समाजवादी युगातून

कायमची हकालपट्टी केली पाहिजे व एकाच मानवधर्माची–निव्वळ नीतीवर आधारलेल्या मानव धर्माची वाढ केली पाहिजे.

यांत्रिक–युगाच्या प्रगतीने सर्व जगच एक होत चाललं आहे. अशा वेळी–गावा गावांचेच अनेक तुकडे करणारे हे धर्म नष्ट झाले पाहिजेत.

अंधश्रद्धा नष्ट होऊन तत्त्वश्रद्धा निर्माण केली पाहिजे. देव हा या सर्व धर्मांचा आधार मग तो सगुण असो निर्गुण असो, साकार असो निराकार असो. या देवाच्या कल्पनाच नष्ट केल्या पाहिजेत.

या देवाच्या कल्पनेवर व आधारावर सर्व परोपजीवी वर्ग पुष्ट झाले. भट–पुरोहित, सावकार, सरंजामदार व भांडवलवाले वाढले. देव म्हणजे विषमता ! तू थोर कर्ता करविता, मी पामर ! त्या देवाची आज्ञा म्हणून डोकेबाजांनी वर्गस्वार्थासाठी ग्रंथ तयार केले. व देवाची आज्ञा म्हणून अज्ञानी लोकांच्या टाळक्याला मारली. देव म्हणजे हुकूमशहा त्याचं अस्तित्व म्हणजे लाचारी ! त्याला प्रार्थना म्हणजे भीक ! स्वाभिमानशून्यता.

याच अंधश्रद्धेवर जनसंघ अन् मुस्लीम संघटना पोसली जाते– जोपर्यंत ही


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोडा ! फोडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो पुरंदरे
किंमत साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

अंधश्रद्धा आहे तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मतेच्या वल्गना निरर्थक आहेत. जातिवाद जावा हा प्रचार निरर्थक आहे.

आमचेच मंत्री या अंधश्रद्धेला पोसतात. हा अंधश्रद्धाळू समाज बहुसंख्य आहे. त्याची मते मिळविण्याकरता त्याच्या अंधश्रद्धेला कोणी दुखवत नाही. कोणीही पुढारी मग तो कोणत्याही पक्षाचा असो. याविरुद्ध तोंड उघडत नाही— लोकांना जागं करण्याऐवजी त्यांना त्या अंधश्रद्धेत ठेवून त्यांना मते मिळवायची असतात. त्यांना फक्त स्वार्थ दिसतो— समाजजागृती नको बहुजनसमाजाला बरं वाटावं म्हणून फुल्यांचं नाव घ्यायचं व भाविकांची मते मिळवण्याकरता आपल्या देव-भक्तीचं प्रदर्शन यात्रेत आणि जत्रेत जाऊन करायचं.

दिल्लीच्या एका मुसलमान मंत्र्याने पुण्यात येऊन–रस्त्यातला पीर कोणी काढण्याचा प्रयत्न केला तर काढू देऊ नका. तुम्हाला विरोध करण्याची शक्ती कोणात नाही म्हणून चेतवायचे तर हिन्दू मंत्र्याने निसर्गाने देवळे पाडली तर आम्ही पुनः देऊ म्हणून आश्वासन द्यायचे अन् अंधश्रद्धेच्या डबक्यात पुन: ढकलायचे.

सकाळी उठल्याबरोबर रेडिओ ऐकावा तर देवाला आळवण्याशिवाय काही ऐकू येणार नाही.

जनसंघाला हे खाद्य तुम्ही देत आहात. तुम्हीच तुमचा डबरा खणीत आहात.

माझे हे विचार आज कितीही कटू वाटले तरी त्याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आल्याखेरीज राहणार नाही. अस्पृश्यावर आम्ही जे अन्याय करतो ते काय आम्ही राक्षस आहोत म्हणून ! त्या मागे धर्मभावनाच आहे.

अनेक पाकिस्ताने निर्माण व्हायची नसतील तर अंधश्रद्धा मुळातून निपटून काढली पाहिजे.

कोणाही मंत्र्याने अधिकारावर असेपर्यंत अंधश्रद्धेचं प्रदर्शन करू नये. कसल्याही प्रकारच्या कार्यक्रमात–मग ती संस्था शैक्षणिक का असेना–भाग घेऊ नये. घरी प्रार्थना करावी, देवासमोर थोबाडीत मारून घ्यावी, कपाळ बडवून घ्यावे, पण त्याचे बाहेर प्रदर्शन करू नये.

हा दंडक घातला नाही तर आणखी अनेक पाकिस्ताने निर्माण होऊन देशाचे तुकडे तुकडे होतील.

यशवंतरावजी, तुम्ही याचा शांत डोक्याने विचार करा. मी आकसाने लिहिले नाही. 'माझे यशवंतराव' या भावनेने, आत्मीयतेने–लिहिले आहे. या खेरीज बहुजनसमाज गुलामगिरीतून मुक्त होणार नाही. निव्वळ आर्थिक सुधारणेवर भर देऊन ऐक्य साधणार नाही.

□ □ □

वि. शं. पारगावकर

# सह्याद्रि आणि हिमालय

१९५७ साली यशवंतराव चव्हाण द्वैभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा ते कोणी लोकप्रिय नेते नव्हते. उलट जनतेच्या चिडीला कारण झालेली ती एक व्यक्ती होती. कारण राष्ट्राच्या सुरक्षिततेकरिता काँग्रेस ही बलशाली राहिलीच पाहिजे आणि काँग्रेसचे बळ म्हणजे नेहरूंचे नेतृत्व अशी त्यांची विचारसरणी होती. वास्तविक एक व्यक्ति, एक राष्ट्र आणि एक संघटना अशा विचारसरणीला वाव मिळावा असे भारत काही हुकूमशाही राष्ट्र नव्हते !

छप्पन्न साल महाराष्ट्राच्या दृष्टीने फार वाईट होते. मोरारजी मुख्यमंत्री होते आणि नेता म्हणून ते महाराष्ट्रात बदनाम झालेले होते. गुजरात देखील तेव्हा त्यांना नेता मानीत होते किंवा नाही याची शंकाच होती. कारण गुजराती जनतेने निवडणुकीत त्यांचा पराभव देखील केला होता. काँग्रेसने, म्हणजेच चव्हाणांच्या भाषेत नेहरूंनी भाषावार प्रांतरचनेचे तत्व मान्य केले होते. भारतात भाषिक तत्वावर राज्ये निर्माणदेखील झाली होती. आंध्रचा प्रश्न तर 'रामलू' यांच्या आत्मयज्ञाने उजळून निघालेलाच होता. भाषिक तत्वावर आंध्रची नवी भाषिक सीमा अस्तित्वात आलेली होती. मात्र महाराष्ट्र आणि गुजरात यांचा प्रश्न काही केल्या सुटत नव्हता.

संयुक्त महाराष्ट्र समितीचे बळ वाढत होते. त्यांच्या नेत्यांच्या शब्दांना, चळवळीला भरती आलेली होती. त्यांचा मराठा गर्जत होता. चहूकडे असंतोष होता, धमाल उडालेली होती. म्हणजे चव्हाण राजकीय मंचावर नेते म्हणून येण्यापूर्वीचे

हे वर्ष अशा प्रचंड गदारोळांनी धुरळून गेले होते. पुण्याला नगरपालिकेच्या एका समारंभास श्री. चव्हाण मुख्य पाहुणे म्हणून आले असताना पुण्याच्या नागरिकांतर्फे त्यांचा उत्स्फूर्त निषेध झाला होता. त्यांना 'सूर्याजी पिसाळ' ही अपमानास्पद बिरुदावली बहाल केली गेली होती. तेव्हाची महाराष्ट्राची मन:स्थिती आणि खुद्द चव्हाणांची मन:स्थिति काय असेल ?

मोरारजींसारखा मुरलेला श्रेष्ठ नेतादेखील जनतेच्या आशाआकांक्षातून निर्माण झालेल्या होळीत जळून खाक झालेला होता. मुख्यमंत्री म्हणून नेतृत्व करणे त्यांना शक्यच नव्हते. त्यावेळच्या काळात दुसरा नेता कोण होता? भाऊसाहेब हिरे आणि नंतर श्री. यशवंतराव चव्हाण. तिसऱ्या क्रमांकाचे हे नाव होते. परंतु दैवाची कळ फिरली आणि चव्हाण मुख्यमंत्री झाले. नेतृत्वात हा बदल झाला म्हणून महाराष्ट्रीय जनतेतील असंतोष मावळला असे झाले नाही. तेव्हा नेहरूंवर महाराष्ट्रीय जनतेचा फार राग होता. (तसा उत्तरेकडील नेतृत्वावर या जनतेचा कायमच राग आहे!) नेहरू घराण्याविषयीच महाराष्ट्रात बऱ्यापैकी मत नाही. सदाशिवपेठी संस्कृतीला, तिच्या विशिष्ट विचारसरणीनुसार हे नेतृत्व पचणे शक्यही नाही नि नव्हते. परंतु त्या वेळेचा नेहरूंवरचा राग अगदी वेगळा होता आणि रास्तही होता. अर्थात या रागाचे स्वरूपही प्रातिनिधिक होते.

इतरांना भाषिक प्रांत देऊ करून महाराष्ट्राला मात्र त्याने द्वैभाषिक राज्य चालवावे व इतरांना धडा घालून द्यावा अशी तेव्हा नेहरूंची भोंगळ इच्छा होती! तसे पाहिले असता गुजराती लोकांचे आणि मराठी लोकांचे वाकडे मुळीच नव्हते. कानडी माणसापेक्षा गुजराती माणूस अनंत पटींनी सभ्य आणि मनमिळावू आहे. परवा एका कानडी हळ्ळीकेरीने जी एक विषारी हळी दिली—भिकारड्या महा- राष्ट्राला राजकन्या (बेळगाव) कशाला हवा?—अशी भाषा ऐन संग्रामाच्या धाम-धुमीतही कोणा गुजरात्याने अथवा मराठी माणसाने तेव्हा काढल्याचे ऐकीवात नाही!

परंतु एवढे मात्र खरे द्वैभाषिक राबविण्यास दोन्ही प्रांतांची मानसिक तयारी नव्हती. गुजरातमधील एका विद्यापीठात त्या वेळी नेहरूंचे एक व्याख्यान होते पण गुजराती विद्यार्थ्यांनी ते होऊ दिले नाही. नव्वद मिनिटे नेहरू बोलण्याचा प्रयत्न करीत होते आणि विद्यार्थी त्यांना विरोध करीत होते. नेहरूंच्या आयुष्यातला तो एक काळाकुट्ट दिवस म्हणता येईल. हा विरोध जसा गुजरातमधून झाला तसाच तो महाराष्ट्रातही प्रतापगडच्या उद्घाटनाच्या वेळी झाला. तेव्हा नेहरूंना बंद मोटारीतून प्रवास करावा लागलेला होता.

ही एवढी वस्तुस्थिति एवढ्यासाठी सांगितली की एका जागतिक कीर्तीच्या नेत्याला देखील एवढा प्रचंड विरोध झाला त्यापुढे चव्हाणांची काय मातब्बरी होती ?

पण असंतोषातच का होईना चव्हाणांनी द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्रीपद

स्वीकारले आणि त्यांची एक नवीच प्रतिमा जनतेपुढे हळू हळू साकार होत गली. तसे पाहिले असता चव्हाण तेव्हा स्वयंभू नेते नव्हते. मुख्यमंत्री या नात्याने त्यांच्याकडे नेतृत्व आले होते एवढेच. बरे तशातही 'देशापेक्षा नेहरू मोठे' मानणाऱ्यांपैकी ते होते आणि महाराष्ट्रात नेहरू देखील त्या वेळी अप्रिय झालेले होते. अशा वेळी चव्हाणांचा मार्ग किती कठीण होता याची कल्पना येईल. परंतु चव्हाण तेव्हा जरी स्वयंभू नेता नव्हते तरी त्यांच्या व्यक्तित्वात नेतृत्वाचे गुण होते हे पुढे १९६० पर्यंत त्यांनी मुख्यमंत्री म्हणून जी कारकीर्द केली त्यावरून सिद्ध झालेले आहे.

१ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले. त्या निमित्त एक प्रचंड मिरवणूक पुण्यात निघाली होती. लाख दोन लाखांच्या वर जमाव या मिरवणुकीत सामील झालेला होता. यशवंतराव तेव्हा मिरवणुकीतील मुख्य लक्ष्य होते. जनतेचा आनंद, उत्साह शीगेला पोहोचलेला होता. दारू उडत होती, बँड वाजत होता, जयघोषांचे नारे झडत होते. त्यामध्ये 'यशवंतराव की जय' आणि 'पंडित नेहरूकी जय' अशी घोषवाक्ये होती. म्हणजे अवघ्या चार वर्षांत चव्हाणांनी मराठी मन जिंकले होते.

यांचे इंगित काय होते ?

तसे पाहिले तर यशवंतराव भाऊक मनोवृत्तीचे मुळीच नाहीत. स्वतःही नाहीत आणि दुसऱ्यांच्या भावनांना चेतवून आपले लक्ष्य साधणाऱ्या पुढाऱ्यांपैकीही ते नाहीत. अशा पुढाऱ्यांचे प्रतिक म्हणून जी. एल. नंदांचे उदाहरण देता येईल. त्यांच्या ऐन तारुण्यातील काळाचा आणि त्यामधील त्यांच्या राजकीय भूमिकेचा इतिहास मला माहीत नाही. परंतु तेव्हाचीही त्यांची राजकीय भूमिका नेभळी अथवा भावबळावर आधारलेली नसावी असे मानण्यास भरपूर पुरावा आहे. त्यांनी तीन वर्षांत द्वैभाषिक राबविले यावरूनही त्यांच्या मानसिक पिंडाची पूर्ण कल्पना येण्यासारखी आहे. त्या काळात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन भरात होती. नेहमीप्रमाणेच राज्यकर्ती काँग्रेस बदनाम झालेली होतीच. अशा वेळी यशवंतरावांची राजकीय शिष्टाई म्हणजे अक्षरशः तारेवरची कसरत होती. तिथे एखादे वेळी भावनांचा उद्रेक करून काही फायदे चव्हाणांना सहज पदरात पाडून घेता आले असते. परंतु चव्हाणांनी तौलनिक विचारसरणीची कास कधीही सोडली नाही.

शेवटी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळाला. तो काँग्रेसने मिळविला किंवा चव्हाणांनी मिळविला असे समजण्याचे मुळीच कारण नाही. स्वतः यशवंतरावही तसे काही समजत नाहीत. परंतु एवढे मात्र खरे की संयुक्त महाराष्ट्र-समिती एवढेच महत्त्वाचे कार्य या चळवळीत राजकीय पातळीवरून चव्हाणांनी केलेले आहे; याविषयी मात्र दुमत असू नये. शिवाय मुंबई महाराष्ट्राला जोडून जशी राजकीय पातळीवरून त्यांनी स. का. पाटलांना सणसणीत चपराक ठेऊन दिली

तशीच गुजराथी लोकांचाही त्यांनी रोष ओढवून घेतला नाही. नेतृत्वाच्या दृष्टीने मी या गोष्टीला फार महत्त्व देतो.

याला‌च पूरक एक ताजे उदाहरण देता येण्यासारखे आहे. मी सिंडिकेट काँग्रेसच्या अधिवेशनाला 'माणूस'चा प्रतिनिधि म्हणून गेलो होतो तेव्हा गुजरातच्या प्रवासात मला जो अनुभव आला तो बोलका आहे. गुजराती माणसाचे मत चव्हाणांविषयी फार चांगले आहे. अगदी वरच्या पातळीवरून विचार करणारी गुजराती माणसे देखील म्हणतात की इंदिरा गांधी जर पंतप्रधान म्हणून राहिल्या नाहीत तर ते पद चव्हाणांना मिळावे. आजच्या काळात आपल्याला चव्हाणांसारखे तौलनिक आणि समंजस नेतृत्व हवे आहे. अहमदाबादमध्ये देखील अगदी मोरारजींच्या तुलनेचा प्रश्न आला तेव्हा देखील गुजराती माणसाने बिनदिक्कत चव्हाणांचे नाव पंतप्रधान-पदासाठी घेतले.

ही गोष्ट फार बोलकी आहे.

तसेच ऐन अधिवेशन चालू असताना देखील, इंडिकेट काँग्रेसचे प्रतिस्पर्धी रथी-महारथी जेव्हा इंदिराजींवर आणि त्यांच्या सहप्रवाशांवर कडाडून हल्ला करीत तेव्हाही चव्हाणांचा उल्लेख त्या नावात आणि टीकेत होत नव्हता. हे आम्ही प्रत्यक्ष ऐकलेले आहे. क्वचित एखाद्या संदर्भात उल्लेख होत होता तो देखील 'चव्हाण-साहेब' अशा आदरार्थी नामाभिधानाने.

कित्येक विचारवंतांचा असा समज आहे की चव्हाणांचे नेतृत्व हे मिळमिळीत, टोक नसलेले नेतृत्व आहे. पण अशी टीका करणारे लोक हे विसरतात की मिळ-मिळीत आणि टोक नसणारे जे काही असते त्याला नेतृत्व म्हणताच येणार नाही! म्हणजे एकीकडे त्यांना नेतृत्व बहाल करावयाचे आणि दुसरीकडे नेतृत्वाला शून्यवत बनविणारी विधाने करावयाची.

चव्हाणांचे नेतृत्व हे जहाल जातीच्या नेतृत्वाच्या जातीचे नाही ही गोष्ट खरी आहे, परंतु त्याला मिळमिळीत आणि टोक नसलेले म्हणणे मूर्खपणाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याकडे बुद्धीजीवी वर्गात एक प्रकारचे राजकीय नैराश्य पसरलेले आढळते. लोकांच्या आशा आकांक्षांची तीव्रता आणि देशातील प्रगतीचा वेग यांमध्ये जेव्हा तफावत पडते तेव्हा असे नैराश्य येणे साहजिकच असते. लोकशाही मार्गाने चालणाऱ्या देशाची गाडी, लोकशाहीच्या पहिल्या अवस्थेत पॅसिंजरच्या वेगानेच जाणारी असते. त्या तिच्या चालीवर आणि वेगावर चिडण्यात काहीच अर्थ नसतो. परंतु लोक चिडतात, निराश होतात, राज्यकर्त्यांना नावे ठेवतात, प्रसंगी त्यांची निर्भत्सना करतात आणि या साऱ्यांचा परिपाक म्हणजे लोकांना वाटते 'नको ही लोकशाही!' त्यापेक्षा जहाल हुकुमशाही बरी! परंतु हा आत्मघाताचा विचार आहे ही गोष्ट अशा बेभान झालेल्या मनाला कळत नाही.

चव्हाणांच्या नेतृत्वावर जी टीका होते तिचा उगम अशा मनोवृत्तीतून झालेला असतो असे मला वाटते.

चव्हाण मुख्यमंत्री असताना तर सोडाच पण ते संरक्षण मंत्री असताना आणि भारत-पाक युद्धाच्या धामधूमीतदेखील त्यांचे वागणे अथवा बोलणे कधीही बेताल झालेले नाही! त्यावेळच्या पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांची वक्तव्ये ऐकण्या-सारखी होती. बोलणे आणि कृति यामधील फरक चव्हाणांना उत्तम कळतो हेच त्यांच्या व्यक्तित्वाचे सार आहे असे म्हणावे लागले. भारताचे गृहमंत्री असताना नंदाजी जे बोलत होते आणि करीत नव्हते ते चव्हाण बोलत नाहीत आणि करून दाखवतात हाच तो मी म्हणतो त्या व्यक्तित्वात असलेला फरक आहे.

आणखी एक गोष्ट चव्हाणांच्या बाबतीत लक्षात घेण्यासारखी आहे. आणि ती मी फार महत्त्वाचीही समजतो. ती म्हणजे चव्हाण व्यक्तिपूजक नाहीत. ज्या टिळक-गांधींची छाप काँग्रेस संघटनेवर पडलेली आहे त्या संघटनेचेच चव्हाण सभासद आहेत. परंतु वारसांची व्यक्तिपूजा आणि त्यांच्या नावाचे भांडवल करून स्वतःचा मार्ग सुकर करायची जी एक दुष्ट खोड आपल्या नेत्यांच्या अंगी जडलेली आहे तिचा मागमूसही चव्हाणांच्या आचरणात दिसत नाही. एवढे कर्तृत्ववान नेहरू पण त्यांच्याही तोंडी महात्मा गांधींचे नाव उठल्याबसल्या होते, कठीण प्रसंगी तर ते विनोबांचा आशीर्वाद घ्यायला जात असत. हे सर्वश्रुतच आहे. पण चव्हाणांच्या तोंडी कधी गांधी अथवा विनोबा हे नाव तशा अर्थाने ऐकू येत नाही! एके काळी त्यांच्या विचारसरणीत नेहरूंना नको एवढे स्थान होते पण त्याच्याही मागे राजकीय शहाणपण होते, व्यावहारिक तडजोड नव्हती.

चव्हाण हे कुशल संघटक आहेत आणि नेतृत्वाला जे गुण लागतात त्यांपैकी बरेच त्यांच्याजवळ आहेत. तरीही पण अजून ते भारतीय पातळीवरचे नेते म्हणून ओळखले जात नाहीत, ही जशी त्यांना रुखरुख असेल तशीच ती महाराष्ट्रीय मनाचीही रुखरुख आहे.

तसे पाहता एकमेव नेता होण्याच्या किती तरी संधी त्यांच्या आयुष्यात चालून आल्या होत्या. या लेखाच्या सुरुवातीलाच मी उल्लेख केला ती मुख्यमंत्रीपदाची संधी त्यांच्या आयुष्यात किती तरी लवकर चालून आली होती आणि तीही आणीबाणीच्या वेळी. पाया म्हणून तिचा उपयोग त्यांना चांगला करून घेता आला असता. इतकेच नव्हे तर चीनच्या आक्रमणाच्या वेळी नेहरूंनी चव्हाणांना हाक दिली आणि तळहातावरची भाग्यरेषा उजळीत चव्हाण दिल्लीला गेले. 'हिमा-लयाच्या मदतीला सह्याद्री गेला' अशा रीतीची भावना तेव्हा चहूकडे प्रसृत झाली होती!

एक जागतिक कीर्तीचे व्यक्तित्व मेननच्या रूपाने पदभ्रष्ट झाले होते आणि त्यांच्या जागेवर चव्हाणांची नियुक्ति नेहरूंसारख्या पंतप्रधानांच्या हातून झाली होती. ही गोष्ट फार बोलकी होती, अर्थपूर्ण होती. १९६२ साली नालायक, विश्वासघातकी म्हणून पदभ्रष्ट झालेल्या संरक्षण-मंत्र्यांची जागा चव्हाणांनी घेतली

आणि त्यानंतर १९६५ साली झालेल्या भारत-पाक युद्धाला त्यांना तोंड द्यावे लागलेले होते. तेथेही त्यांची कार्यकुशलता, संघटना चातुर्य आणि मुत्सद्देगिरीचे दर्शन लोकांना चांगले घडले होते. वास्तविक नेहरू वारले होते. भारतीय विकासाच्या सर्व आघाड्यावर सतत १८ वर्षे नेतृत्व करणारे विशाल नेतृत्व नाहीसे झाले होते. त्या मानाने लाल बहादूरशास्त्री अगदीच सामान्य माणूस म्हणून प्रधान मंत्री-पदावर आलेले होते. परंतु हाच लहान माणूस एक वर्षात महान झाला. आलेल्या संधींचा त्यांनी चांगला आणि पुरेपूर उपयोग करून घेतला. भारताचा दुसरा पंत-प्रधान म्हणून त्यांची छोटीशी कारकीर्द देखील अविस्मरणीय होऊन बसलेली आहे.

## गाडी चुकली

तीच संधी भारत-पाक युद्धाच्या निमित्ताने चव्हाणांच्याकडेही चालून आलेली होती. लोकप्रियतेच्या प्रचंड लाटेवर तेव्हा चव्हाण उभे होते आणि एकमेव नेतृत्वाची सत्ता लालबहादूर शास्त्रींच्या निधनाने त्यांना चालूनही आलेली होती. परंतु तिचा फायदा काही चव्हाणांना करून घेता आला नाही. मोरारजींचा पराभव करून इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या आणि चव्हाणांचे नावदेखील त्या रांगेत कुठे उमटले नाही ! ती गाडी चुकली. पण पुढे जी. एल्. नंदांचे गृहमंत्रीपद जाऊन तेथे चव्हाण आले. मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकाची जागा त्यांना मिळाली. परंतु तिचाही त्यांना म्हणावा असा उपयोग करून घेता आला नाही. या पर्वातली शेवटची संधी पंतप्रधानपदासाठी त्यांच्याकडे चालून आलेली होती ती म्हणजे सिंडिकेटकडून. ही बातमी ऐकीव असली आणि तिला काही पुरावा नसला तरी अशी बातमी फुटण्याला किंवा तयार होण्याला देखील महत्त्व असते ! ही बातमी खरी होती असे गृहीत धरून चालले तरी सिंडिकेटच्या विचारसरणीशी चव्हाणांचे पटले असते किंवा नाही याची शंकाच आहे ! तडजोड आणि अगतिकता म्हणून सिंडिकेटच्या लोकांनी चव्हाणांचे नाव घेतले असणेही शक्य आहे.

तसे पाहिले असता वर वर विचार करणाऱ्याला साहजिकच असे वाटेल की अशोक मेहता, कामराज, तारकेश्वरी सिन्हा सारख्या पुरोगामी विचारसरणींच्या व्यक्ति सिंडिकेटमध्ये जातात तिथे चव्हाणांचा समावेश आणि तोही पंतप्रधान म्हणून व्हायला काहीच हरकत नव्हती ! परंतु या विचारसरणीचा धागा हा वरवर वाटतो तितका सरळ आणि सोपा नाही. त्यात खूप गुंतागुंत आहे.

एक तर राजकीय तडजोड आणि त्यातही असहाय्यता म्हणून हे लोक एकत्र आले आहेत. ज्यांचे आपसात क्षणभरही पटत नव्हते ते मोरारजी आणि कामराज एरवी एकत्र येतेच ना ! ज्या कामराजांनी इंदिराविरुद्ध मोरारजींना पंतप्रधान-पदापासून दूर भिरकावून दिले होते ते दोन ग्रह एरवी एकत्र कसे येतात ? तीच गोष्ट चव्हाणांच्याही बाबतीत आहे. स. का. पाटील आणि चव्हाण ही खिलार आणि सुरती बैलांची जोडी आहे. (एकत्र न येऊ शकणाऱ्या) तसेच बेळगावच्या

प्रश्नावरून चव्हाण आणि निजलिंगप्पा यांचेही सूत नाही. आणि तिसरी गोष्ट म्हणजे भारताच्या प्रगतीच्या कार्यक्रमापासून अनंत योजने दूर गेलेली ही मंडळी आहेत याची खूण गाठ स्वतः चव्हाणांनी मनाशी पक्की बांधून ठेवलेली असली पाहिजे. अशोक मेहता आणि कामराज हे जरी विरुद्ध पक्षाच्या पारड्यात बसलेले दिसतात ते देखील तत्व म्हणून नाही तर व्यक्तिद्वेष म्हणून हे समजून घेण्यास कोणा राजकीय भविष्य वर्तविणाऱ्या ज्योतिषाची गरज नक्कीच नाही.

परंतु एक गोष्ट खरी की या महान विभाजन प्रसंगी चव्हाणांच्या मुत्सद्देगिरीचा पल्ला वाढला असता तर चित्रच बदलून गेले असते असे सिद्ध करण्यास खूपच वाव आहे !

## बाईंचा विलक्षण प्रभाव

नेता म्हणून बाईंचे व्यक्तिमत्व प्रभावी असले तरी ते इतके प्रखर आणि एककल्ली आहे की आजच्या भारताच्या लोकशाहीला ते कितपत मानवेल हा प्रश्नच आहे ! परंतु आज तरी बाईंनी रान ढवळून काढलेले आहे. साऱ्या देशात एक राजकीय हवा निर्माण केली आहे. त्यांनी समाजवादी कार्यक्रम हाती घेतले आहेत आणि मी मी म्हणविणाऱ्या राजकारणातील अतिरथी महारथींना त्यांनी निष्प्रभ करून टाकलेले आहे ही गोष्ट आपल्याला कितीही अप्रिय वाटत असली तरी बाईंची नेतृत्व म्हणून कर्तबगारी आपल्याला नाकबूल करताच येणार नाही !

या संदर्भात चव्हाणांच्या व्यक्तिमत्वावर काही प्रकाश पडतो का ते पाहिले पाहिजे. चव्हाणांना आता केंद्रीय मंत्रिमंडळात जाऊन आठ वर्षे होऊन गेली तरी अजून देखील केंद्रीय मंत्रिमंडळावर प्रभाव पाडण्याइतके त्यांचे व्यक्तिमत्व उमलले नाही असे म्हणावे लागते. मंत्रिमंडळात अथवा लोकसभेत सर्वात कमी टीकेचे लक्ष्य बनणारा मंत्री म्हणून त्यांचे नाव घेता आले तरी नेतृत्व म्हणून त्यांच्या मागे काही बळ आहे असे अजून तरी दिसून आलेले नाही. सद्यस्थितीत तर केवळ एक महाराष्ट्र प्रांत त्यांच्या पाठीशी उभा आहे म्हणून त्यांचे मंत्रिमंडळातील स्थान तरी कायम आहे नाहीतर ते केव्हाच गेले असते असे त्यांच्या संदर्भात गेल्या सप्टेंबरपासून जे बोलले जात आहे त्यावरून दिसते !

असे का व्हावे ?

याचे कारण मला वाटते ते असे की चव्हाणांचे नेतृत्व अजून भारतीय पातळीवर जाऊ शकलेले नाही. त्यांच्या महाराष्ट्रात जेवढ्या चकरा होतात तेवढ्या गृहमंत्री म्हणून देशाच्या इतर प्रांतात क्वचितच होतात. गेल्या वर्षी तर काही वेळ अक्षरशः दर आठवड्याला त्यांची खेप महाराष्ट्रात व्हायची ! एखाद्याची न नांदणारी लेक जशी सारखी माहेरी चकरा मारते तसे हे वाटते. शिवाय त्यांनी हे यावं तरी कशासाठी ? तर अगदी क्षुल्लक कारणासाठी. साध्या साध्या उद्घाटन समारंभासाठी. साध्या माणसालादेखील ज्याच्या उद्घाटनात रस वाटणार नाही अशा समारंभास

ते हजर राहिलेले आहेत. मला वाटते पक्ष बांधणीसाठी, एकमुखी नेतृत्वाच्या रक्षणासाठी आणि क्वचित् केंद्र आणि महाराष्ट्र यांच्यामध्ये सुसंवाद साधण्यासाठीदेखील या वाऱ्या उपयोगी पडत असतीलही; परंतु त्यामध्ये तारतम्य राहिलेले नाही हे सहज लक्ष्यात येण्यासारखे आहे.

मी तर असे म्हणेन की एवढा मोठा महाराष्ट्र प्रांत आणि त्याचे एकमेव नेते यशवंतरावजी चव्हाण असताना त्यांच्या पाठीशी ही केवढी मोठी शक्ती उभी आहे! परंतु त्या शक्तीचा योग्य उपयोग करून घेण्याचे कसब त्यांच्या नेतृत्वात अजून तरी दिसून येत नाही असे नाईलाजाने म्हणावे लागते. एखाद्या पुतळ्याच्या अनावरणासाठी, एखाद्या व्यक्तीच्या पुस्तक प्रकाशनासाठी अथवा पहेलवानांच्या मेळाव्यात भाषण करण्यासाठी यशवंतराव जेव्हा महाराष्ट्रात वारंवार येतात तेव्हा भारताचे गृहमंत्री म्हणूनदेखील त्या पदाची शान बिघडते, तिथे राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाची प्रतिमादेखील डागळते हे सांगण्याची गरज काय?

एकमेव नेतृत्वाची पातळी गाठण्यासाठी, कोणी म्हणेल की लोकशाही पद्धतीनुसार व्यक्तीला वरीलप्रमाणे अवधाने राखावी लागतात. त्यावर माझे म्हणणे असे की आज भारताच्या पंतप्रधानपदी आणि पक्षसंघटनेच्या नेतृत्वपदी इंदिरा गांधी विराजमान आहेत. त्यांनीदेखील हे नेतृत्व संपादन केलेलं आहे. त्यांनाही त्यांच्या प्रांतात उत्तरप्रदेशात बहुमत नाही. पहिल्या वेळी पक्षनेत्याच्या निवडणुकीसाठी मोरारजी उभे राहिले तेव्हादेखील त्यांच्या विरुद्ध उभे राहून त्यांनी बहुमतांनी आपले नेतृत्व सिद्ध केलेले आहे; आणि दुसऱ्या वेळीदेखील पुन्हा त्यांच्याच विरुद्ध उभे राहण्याची तयारी दाखविलेली होती. इतकेच नाहीतर तडजोड म्हणून कामराज यांची शिष्टाई पुढे आली ती तेव्हा त्यांनी पत्करली आणि काही काळातच




खुद्द कामराज यांचेच महत्त्व त्यांनी कमी केले. इतकेच नव्हेतर मोरारजींचे नेतृत्व जे त्यांना जाचक होत होते, त्या मोरारजींना एका रात्री मंत्रीमंडळातून बाजूला सारून आपल्या एकमेव नेतृत्वाला 'एकमेव' सिद्ध करण्यासाठी पहिले पाऊल उचलले!

त्यानंतर कॉंग्रेसमधील विरोधी शक्तींविरूद्धच्या प्रत्येक डावपेचात त्यांनी आतापर्यंत जय मिळविलेला आहे. आपण हे कबूल करतो की बाईपेक्षा उजव्यांची मुत्सद्देगिरी कमी ठरते पण आपण याचा विचार करीत नाही की बाईपेक्षा चव्हाणांची मुत्सद्देगिरीदेखील कमी ठरलेली आहे. राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारीपासून आपण प्रत्येक घटनांचा बारकाईने अभ्यास करीत गेलो तर हेच दिसून येते की यशवंतराव यांची शिष्टाई निष्प्रभ ठरत गेलेली आहे. गेल्या सहा महिन्यापूर्वी यशवंतरावांची जी एक प्रतिमा होती ती आज राहिलेली नाही. आज केवळ भारताचे एक गृहमंत्री म्हणून ते ओळखले जातात. १९६२ साली मला आठवते की जेव्हा पंडित नेहरूंच्या आमंत्रणावरून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री चव्हाण हे भारताचे संरक्षणमंत्री म्हणून गेले तेव्हा त्यांचा दबदबा फार मोठा होता. तेव्हा त्यांना लोकसभेतील महत्त्वाकांक्षी लोकांना सांगावे लागले होते की, 'कुठलीही महत्त्वाकांक्षा (पंतप्रधानपदाची) बाळगून मी केंद्रात आलो नाहीं. कॉंग्रेसचा पाईक आणि देशाचा शिपायी म्हणून मी येथे आलो आहे. ज्यावेळी मी हे काम करू शकणार नाही तेव्हा मी शेतकरी म्हणून कऱ्हाडला जाईन!'

यशवंतरावांचा तो दबदबा तेव्हा होता इतकेच नव्हे तर नंदाजींनी गृहमंत्रीपदाची साधुबैराग्यांकडून जी विटंबना केलेली होती, त्या गृहमंत्रीपदावर जाताक्षणीच आपली चमक चव्हाणांनी तिथेही दाखविली होती.

पण पुढे महाराष्ट्राच्या या चेंडूमधील हवाच कमी होत गेली आणि वरवर उसळचा मारण्याची ताकद नाहीशी झाली असे वाटू लागले आहे. मी वर नमूद केलेल्या अनेक संधी चव्हाणांच्या आयुष्यात येऊन गेल्या पण देशाच्या नेतृत्वपदाच्या अश्वावर आरूढ होण्याची संधी काही अजून त्यांना साधता आलेली नाही. आता तर चव्हाणांनी जो मार्ग स्वीकारला आहे त्यामुळे हा पल्ला फारच दूरचा झालेला आहे.

तडजोडवादी नेतृत्व हे सर्वंकश नेतृत्व होऊ शकते काय? आजच्या भारताला तरी असे नेतृत्व मानवेल किंवा नाही याची शंका वाटते!

□ □ □

दादूमिया

# यशवंतराव चव्हाण

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे दैवत आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत, गरीबांपर्यंत, श्रीमंतांपर्यंत ह्या व्यक्तीने आपल्याकडे सर्वांना आकर्षून घेतले आहे. महाराष्ट्रात सर्वांत जास्त ज्याविषयी बोलले जाते, लिहिले जाते अशी एकच व्यक्ती आज हयात आहे. त्या व्यक्तीचे नाव यशवंतराव चव्हाण.

असंख्य यशवंतभक्तांप्रमाणे मीही त्यांचा एक चाहता आहे. यशवंतरावांच्या चुका मला माहीत नाहीत असे नाही. पण चुकत कोण नाही ? मला विजयालक्ष्मींनी सांगितलेले शब्द नीट आठवतात, "चुका करण्याचा अधिकार या लोकशाहीत प्रत्येकास आहे व तो कबूल करण्याचा ! हुकूमशाहीची गोष्ट वेगळी असते. हुकूमशहा सत्तेवर असताना त्याची चूक कधीच होत नसते. आणि तो सत्तेवरून खाली येताच त्याच्या साऱ्या हालचाली चुका ठरविल्या जातात !"

राजकीय भक्तांचे दोन प्रकार असतात. काही भगत फक्त त्यांच्या स्तुतीची आरती गातात. कोणा बाळकरामाने अति-मिस्कील विनोदी किंचित काव्यात ते सत्य सांगितले आहे.

स्वये श्री छत्रपति ऐकती ।
× × × × यशवंतायन गाती ।'

दुसरे विरोधी भगत फक्त शिव्यांची लाखोली वाहून पादपूजा करण्याचे जाणतात. आपल्याला आवडणारा देव असा चुकला का ही प्रेमापोटी निर्माण झालेली चीड त्यांना असे बोलावयास वा लिहावयास लावीत असली पाहिजे. पण देवाने असे का

केले असावे असे जाणण्याची त्यांची इच्छा असूनही संशोधन करणे, विचार करणे त्यांना जमत नाही. कलुषित झालेले मन कदाचित असा सम्यक् विचार करू देत देत नसेल. सावरकरांचे व गांधीजींचे विरोधी दोन्ही बेताल बोल ऐकवू लागले की मनात येई, अरे, याची तयारी बरोबर नाही, अजून हा तब्बलजी कच्चा आहे!

माझ्यासारख्या ॲमॅच्युअर (प्रोफेशनल नव्हे!) विद्यार्थ्याला ही दोन्ही टोके जमत नाहीत. त्यामुळे पुष्कळ वेळा पंचाईत होते. यशवंतरावांच्या गटात हा प्राणी आपला दुष्मन् आहे असा 'गैरसमज' (अंहं, तेथे समज–बिमज नाही, एकदम खात्री!) होतो व यशवंतरावांच्या घोषणावादी विरोधी गटात 'भडवा पवाडे-वाला दिसतोय!' अशी आत्यंतिक प्रतिक्रिया होते. कोणी खरे बेटा समजून घेण्याच्या मनःस्थितीत नसतोच. 'कन्स्ट्रक्टिव्ह क्रिटीसीझम्' या शब्दास लोकशाहीत काय व हुकूमशाहीत काय एकाच टिकाणी जागा आहे–थडग्यात!

पण इतिहासाच्या खऱ्या अभ्यासकाने, मला वाटते, लोकांना बिचकून चालत नाही.

'जग काय म्हणेल' व 'सत्ताधीशास काय वाटेल' ह्या दोन भावना सच्या विद्यार्थ्याच्या मनास एकदा का शिवल्या की तो विद्यार्थी राहत नाही, परीक्षार्थी किंवा अर्थार्थी होतो. त्यास सारे क्षम्य. अर्थात् एकाच पक्षाकडून. जनतेने आश्रय दिला तर सत्ताधीश त्यास लाथांनी कुबकतो. सत्ताधीशाने सत्तेची पद्मश्री माळ गळयात बांधली तर जग हुर्यो करते. दोघांनी टपला मारण्यापेक्षा वरील प्रोसेस कदाचित् सुखावह असू शकेल.

साऱ्या यशवंत चाहत्यांप्रमाणे 'मलादेखील यशवंतराव पंतप्रधान झालेले पाहण्याचे भाग्य या डोळ्यांना लाभावे,' अशी मोठी कळकळीची इच्छा आहे. त्यामागे तीन हेतू मानसशास्त्रीय दृष्ट्या असावेत : १. फार दिवस मराठी माणूस हालअपेष्टात वाढला आहे. त्याची थोडीफार दुःखे यशवंतराव दिल्लीस गेल्याने कमी होतील अशी अपेक्षा होती. पण ते आज सत्तेच्या भोवऱ्यात सापडलेले दिसतात. त्यामुळे मराठी माणूस थोडासा नाराज आहे. मराठी वीर दिल्लीस जातो पण दिवाणी–ई–खास जिंकूनदेखील, तेथील सिंहासनाचे दगडी तख्त फोडूनदेखील तो पुण्यापर्यंत आपला सनदाच वाहतो असा एक निराशेचा सूर मराठी माणसाच्या तोंडी आज ऐकावयास मिळतो. हा नैराश्याचा स्वर बदलून तेथे आत्मविश्वासाचा, अस्मितेचा व आत्मबलाचा मर्द आवाज ऐकू यावा हीं माझी फार इच्छा आहे. भले जगाने त्यांत मराठी मस्ती वा माज 'शोधून काढला' तरी हरकत नाही. निर्बलाच्या निस्तेज रुदनापेक्षा मी त्या आक्रमक पुरुषी अहंकाराचे स्वागतच करीन.

२. आजच्या नादान नेतृत्वाच्या कारकीर्दीत भारतीयांची बौद्धिक वाढ होणे अशक्य दिसते. लेखक, कलाकार, शास्त्रज्ञ वगैरे लोकांसाठी आज फक्त परदेशगमन हा एकमेव पर्याय उरला आहे. दुसरा पर्याय गंजून जाणे. यशवंतराव सत्तेवर आले

तर हा गंज ते काढून टाकून भारतातील या सच्च्या पण अभागी बुद्धिजीवी 'अल्पसंख्यांकां'ना आश्रय देऊन ते देशहितार्थ, समाजहितार्थ त्यांना झळाळी आणतील, असा का कोण जाणे, मला पूर्ण भरंवसा वाटतो, या अल्पसंख्याकांना 'अपीज्' करण्यासाठी मला त्यांचे नेतृत्व आवडेल. ते येईस्तोवर 'तोबा तोबा' करणे आज! तरी या बुद्धिजीवी अल्पसंख्याकाच्या नशिबी लिहिले आहे.

३. भारताचा खरा उद्धार भारतीय शेती नीट होण्यावर आहे. पंजाब, गुजराथ, महाराष्ट्र व आंध्र याचे काही भाग, राजस्थानचा उत्तर विभाग येथे आज शेती फलदायिनी दिसते. इतरत्र ती वांझ आहे. महाराष्ट्रात हरित क्रांति घडवून आणण्याचे श्रेय मी या महाराष्ट्राच्या प्रतापसिंग कैरॉस द्यावयास उतावीळ आहे. आज बाईच्या सत्तेच्या राजकारणात पंजाव व गुजराथच्या हरित क्रांतीची आहुती दिली जाते की काय, ही जबरदस्त भीती निर्माण झाली आहे. बाई जाऊन लाल क्रांतिवाले आले तर त्यांच्या रामरगाड्यात शेताचे रूपांतर लेबर कँपात व्हायची भीती! यशवंतराव सत्ताधीश झाले तर ते 'राईट् मेन् ॲट द राईट प्लेस्' नेमून त्यांच्यात स्फूर्तीचे इंजेक्शन देऊन काहीतरी चांगले घडवून आणतील अशी मला आशा वाटते.

मी हे असे का म्हणतो याला काही जबरदस्त कारणे आहेत. ती कारणे सत्यावर आधारलेली आहेत.

सुदैवाने यशवंतरावांवर लहानपणी राष्ट्रवादी संस्कार झाले होते. मराठी, इतिहास व गणित शाळेत असताना त्यांचे आवडते विषय होते. 'मॉडर्न रिव्ह्यू' हे त्या वेळचे त्यांचे आवडते मासिक. यशवंतरावांनी लहानपणी 'बाजी' नावाच्या कथेत दारूच्या व्यसनापायी होणाऱ्या घराच्या वाताहातीचे अतिशय वास्तव चित्रण केले होते. कऱ्हाडातील शिवाजी मेळ्याची पदे १९३० नंतर यशवंतरावांनीच रचली होती. शाळेत व कऱ्हाडात ते 'यशवंत कवि' म्हणून ओळखले जात. राजाराम कॉलेजात ते डॉ. बाळकृष्णांचे आवडते विद्यार्थी होते. इतके की इंटरची हजेरी डॉ. बाळकृष्णांनी भरली होती! आणि फी गौरीहर सिंहासन्यांनी! प्रा. ना. सी. फडके त्या वेळचे कोल्हापुरातील तरुण 'लोकप्रिय' प्रोफेसर. त्यामुळे यशवंतराव व प्रो. फडके हे गुरुशिष्य एकमेकांवर लक्ष ठेवून होते!!

'ग्रामसुधारणा' या विषयावर पुण्याच्या केळकर, माटे व करंदीकर यांच्याकडून वक्तृत्वस्पर्धेत पहिले बक्षिस मिळविणे कऱ्हाडच्या बामणेतर पोरास त्या वेळी निश्चित आजच्याएवढे सोपे नव्हते. (आज तिघांची संयुक्त शिकवणी ठेवण्याची ऐपत कऱ्हाड-साताऱ्याच्या विद्यार्थी गणात आली आहे!) मला विशेष कौतुक वाटते ते त्यांनी चौथीच्या शेणोलीकर मास्तरांना दिलेल्या उत्तरास. मास्तरांना कोणी टिळक होणार, कोणी क्रिकेटियर होणार वगैरे उत्तरे दिली. या पठ्ठ्याने 'मी यशवंतराव चव्हाण होणार' हा जबाब दिला. आणि तो आज प्रत्यक्षात खरा करून दाखविलाही आहे.

यशवंतराव पहिल्यापासून नशिबवान् (? ) होते. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांना त्यांच्या राष्ट्रीय चळवळींसाठी १८ महिन्यांची सक्त सजा झाली होती. पण या संस्कारक्षम वयात त्यांच्या सुदैवाने आचार्य भागवत त्यावेळी त्या जेलमध्ये होते. आचार्य भागवतांशी तासनूतास चर्चा व गप्पा-गोष्टी करण्याची संधी ज्याला मिळाली. त्यास भाग्यवान नाहीतर काय म्हणावे? जगातील निरनिराळया देशांतील देशभक्तांची चरित्रे, इतिहास व राजकीय तत्त्वज्ञानाची पुस्तके त्यांना त्या जेलमध्ये वाचावयास मिळाली. नाही समजले तर आचार्य होतेच शेजारच्या खोलीत !

सातार-कऱ्हाडची ख्याती ज्यास ऐकून वा पाहून ठाऊक आहे त्याला या संस्काराच्या वरदानाची कल्पना सहज येईल. त्यामानाने, इतर नेते ह्या बाबतीत दुर्भागी व म्हणून थिटे वाटतात. नेहरूंप्रमाणे यशवंतराव शास्त्री, शास्त्रज्ञ व शाळकरी या सर्वांच्याच मेळाव्यात सारखेच इंप्रेशन मारून जातात, त्यामागे ही संस्कारांची जादूची कांडी जबाबदार असावी, असे मला वाटते.

दुसरे कारण, यशवंतरावांची संघटनकुशलता. मला वाटते, आज त्यांच्या तोलाचा संघटनकुशल पुढारी भारतात नाही. तामीळनाडूमध्ये अण्णादुराई व पंजाबात कैरों होते, पण दोघेही निधन पावले. पाटीलबुवा एके काळी मुंबईत उत्कृष्ट संघटक म्हणून प्रसिद्ध होते. आज पाटीलबुवा रोटरी व लायन्स क्लबात भाषणे ठोकतात. जुने पाटीलबुवा केव्हाच मरण पावले ! रामसुभग सिंग, मोरारजी, कामराज ही संघटक माणसे. पण सत्तेची मस्ती आल्यामुळे आज त्या जुन्या संघटनेवर पकड नसलेले हे पुढारी.

मगरीचा सारा जोर पाण्यात व तिच्या दाढेत. यशवंतरावांचा सारा जोर त्यांनी घडविलेल्या महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या संघटनेत साठवलेला आहे. ही ताकद चार यत्ता न शिकलेल्या कन्नमवारात होती ! म्हणून यशवंतराव त्यांना थोडेफार वचकून असत. तो शक्ती आज बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील व बाळ ठाकरे यांच्यात दिसून येते. पण ह्या तिघांत यशवंरावांचा लढाऊपणा व युक्तिबाजपणा नाही. तुषार पवार वगैरे नवीन पिढी सुदैवाने तयार होत आहे. पण यशवंतरावांना आव्हान देईल असा एकही संघटनकुशल पुढारी आज महाराष्ट्रात व भारतात नाही.

यशवंतराव बडोद्यास आले होते तेव्हाची गोष्ट. कऱ्हाडला त्यांच्या पल्याडला दहा घरांवर राहणारे माझे स्नेही बाबूराव साळुंके यांनी त्यांना चिठ्ठी पाठविली. कारण पोलीस लोक त्यांना वरात सोडीनात. यशवंतरावांनी त्यांना आवर्जून आत बोलावले. यशवंतराव रॉयिस्ट होते त्या वेळेस बाबूरावांचे पिताश्री कॉंग्रेसमन् होते. ' काय रे, काय करतोस येथे, हेलपर नाहीस ना, किती पगार मिळतो, घरी किती वेळा जातोस, घरी बायकामुलांना नेतोस का, घरी पैसे किती धाडतोस, घरी हल्ली

मंडळी किती आहेत, अमुक कोठे आहे, तमुक कोठे आहे ? '-सारी चौकशी यशवंतरावांनी मोठ्या आस्थेने केली. बाबूरावास त्याचे अजून धन्य वाटते ! त्याउलट मला जोशींची आठवण होते. हे वर्षभर सावरकरांचे फर्ग्युसनमध्ये रूम पार्टनर होते. उत्साहाने सावरकरांना भेटण्यासाठी ते बडोद्याच्या ब्राह्मणसभेत गेले व बाहेर चरफडत आले. सावरकरांनी त्यांना ओळखलेही नाही, बोलणं दूरच राहिले !

शांतारामबापू इनामदारांची गोष्ट सांगतो. शांतारामबापू बामण. पण यशवंतरावांचे पहिल्यापासूनचे सहकारी ! लाजाळू व शिस्त. साऱ्या जगाचे साहेबाने भले केले. राहिले फक्त नाना पाटील व शांताराम बापू. बापूंनी तर मातेपेक्षा यशवंतरावांची शुश्रूषा-सेवा केली आहे. साहेबांचे परमभक्त व एकनिष्ठ सेवक. त्यांच्याबरोबर तुम्ही मुंबईतून हिंडा. अरे इथे अमक्याची लेक दिली आहे, इथे अमक्याच्या पुतण्याची सून राहते, इथे आमच्या पाटलाचा मधला मुलगा असतो, पलीकडे अमुक गावातल्या वाण्याचा नातू राहतो, पण तो आज भेटणार नाही, गावी गेला असेल-सारी माहिती मुखोद्गत. त्यांच्याबरोबर कुठे जायचे असले तर हॉटेलात उतरावे लागत नाही. त्यांचे कोणी न् कोणी कुठे न् कुठे असतेच व त्यांच्याबरोबर आपले मोठ्या अगत्याने स्वागत होते. जणू जावईबापू आपण ! हे औचित्य आपल्याला अनोख असते. विशेषतः, आपण शहरी व त्यातून ब्राह्मण असलात तर. कारण नागरी संस्कृतीने आज आपल्याला हॉटेल संस्कृतीचे धडे दिले आहेत. त्या गावी आपले नातेवाईक असले तरीही आपण तेथे जात नाही, स्नेही व ओळखी-बात सोडा. हा जगावेगळा सोस, हा ' मास कॉंटॅक्ट 'चा हव्यास, हे ' सोशल कॉंटॅक्ट 'चे तंत्र तुम्हाआम्हाला नाही परवडणार ! आपण सुशिक्षित आहोत. अतएव, दुनियेपासून दूर फेकले गेलो आहोत.

तुम्हाला मारोती कानडचांची गोष्ट सांगतो. इंडिकेटच्या अधिवेनास हे बार्शीचे आमदार आले होते. आमच्या करंदोकराचे हे परम स्नेही. दोघांनी एकत्र बार्शीस कॉंग्रेसचे काम केले होते. मारोतीराव बोरीवलीला कुठे जाणार हा आमच्या करंदीकरांना प्रश्न पडला होता. कुतूहल म्हणून करंदोकर त्यांच्याबरोबर गेले. आश्चर्य वाटेल, पण महाडचाचा हा सरपंच बोरीवलीच्या प्लॅटफॉर्मवर अन्‌ऑथराईज्ड् हमाली करणाऱ्या एका सामान्य माणसाकडे जेवावयास आला होता ! दोन रुळांच्यामध्ये कोपऱ्यात मटण शिजविले गेले व प्लॅटफॉर्मवर या दोघांनी बसून त्यावर आडवा हात मारला ! काय हिंमत आहे, ह्या मंडळींचे मत मारोती कानडचांना सोडून आणखी कोणाच्या पेटीत पडेल ? आज मतदार शहाणा झाला आहे. गरीब असतो बिचारा. पैसे एकाकडून घेतो. घ्यावेच लागतात मुळी त्याला. खरोखर दुसऱ्या दिवसाची खायची भ्रांत असते त्याला. पण मत मात्र मारोती कानडचास पक्के !

दुसरी अशीच मनोरजक केस पेश करतो. नामदेवराव हे शहरी नाव झाले.

गावातले नाव नाम्या. शिक्षण काही नाही. पण सतत १०-१५ वर्षे एम. एल. ए. होता हा मुंबईत. रोज हा प्राणी फिरतीवर. स्नेही विचारायचे, नाम्या रोज कुठे फिरतोस एवढा ? याचा उद्योग एकच. मुंबईत गाववाल्यांपैकी कोणी न् कोणी आप्त, स्नेही वा दूरचा नातेवाईक असतोच. कोणी वकील, कोणी नोकरीवाला, कोणी हॉटेल-बॉय तर कोणी वेश्येच्या घरचा दलाल ! रोज कोणा तरी एकेकाकडे जायचे, त्याची वास्तपूस्त करायची, त्याचे काही वैयक्तिक वा कुटुंबाचे प्रश्न असतील तर सोडवायचे. नाम्याला तुम्ही विचारा, 'अरे नाम्या, असेंब्लीत बोलत का नाहीस ?' 'साहेब, बोलायला येत नाही हो, शिकलो नाही,' ही नम्र कबुली. मला सांगा, काय टाप लागली आहे नाम्यास मते न टाकण्याची त्याच्या गाववाल्यांची ? मुंबईहून त्या गाववाल्याच्या आप्ताची मनीऑर्डर लगेच बंद होईल ! छत्र्रसिंगांनी भाऊबदकीत नाम्याला पाडायला म्हणून त्याच्या भावास उभे केले. नाम्या गेला, पांड्या आला. घर एकच ना ? तीच होम सर्व्हिस पुढे चालू.

टिळकांनी जे आवाहन जुन्या काळी केले, जे आवाहन गांधीजींनी चालू ठेवले तेच आवाहन यशवंतरावांनी गावांगावांतून सतत पेटत ठेवले. यशवंतरावांना ह्या संघटनेच्या जिवंतपणाचे सारे श्रेय दिलेच पाहिजे ! श्रेय दिले नाही तरी हरकत नाही, यशवंतरावांचे कार्य थांबणार नाही, ते चालूच रहाणार आहे ! जाणतेदेखील डोळे बंद ठेवून 'अंधार, अंधार' असा आक्रोश करतात तेव्हा मला खरोखरीच दुःख होते.

ही संघटनेची ताकद एके काळी कम्युनिस्टांत होती. त्यांच्या गोदाराणीचे कार्य तेथे जाऊन पहावे व डोळ्याचे पारणे फेडून घ्यावे. गोदाराणींना सुदैवाने कम्युनिस्ट वर्तुळांत वहिणी नाहीत, भावंडे नाहीत. नाहीतर आज भारत लाल केव्हाच झाला असता ! कम्युनिस्ट पक्षाची ही शोकांतिका आहे. ती काल नेहरूंना व आज त्यांच्या सुकन्येला व यशवंतरावांना चांगली ठाऊक आहे. म्हणून स्वतंत्र-जनसंघ-पी. एस. पी. सारखे ते लोक ऊर बडवीत नाहीत. यशवंतरावांच्या संघटनेने कम्युनिस्टांच्या शिडांतील हवा केव्हाच काढून घेतली आहे. महाराष्ट्रापुरती तरी. भारतभर या पद्धतीने संघटना पसरविण्यास त्यांना अवघड नाही, पण तेवढी सवड, तेवढी निष्ठेची माणसे तयार करावयास लागणारा वेळ व 'जॉब अपॉर्च्युनिटीज्' आज त्यांच्याजवळ दुर्दैवाने भारतभर नाहीत. महाराष्ट्रात यशवंतरावांची संघटना अजिंक्य आहे. भारतांत त्या तोडीची संघटना दुसरी नाही. त्या संघटनेजवळ मोठी वृत्तपत्रे नसतील, पण त्यांचा 'व्हिस्परिंग कॅपेन' एवढी मोठी आहे की वृत्तपत्रांचा तेथं जरूरच नाही. आणि समजा, वृत्तपत्रे तेथे असतील तरी रडायला वाचायला येते कोणाला व एवढा वेळ आहे कोणाला ?

कम्युनिस्टांना जे साधले त्यापेक्षाही काकणभर सरस कार्य एकेकाळी गांधीवाद्यांनी करून दाखविले ! म्हणून तर त्यांच्या जोरावर मोरारजींच्या पोलिसांनी

या आदिवासींचे गोदाराणीचे बंड मोडून काढले ! आदिवासींच्या लंगोटया तर गांधीवाद्यांचे पंचे ! हिशेब सारखाच. तीच एकनिष्ठता, कळकळ व आत्मीयता. कम्युनिस्टांप्रमाणे हे आश्रमवासीयही आता म्हातारे झाले. कामापेक्षा चर्चाच जास्त. जॉर्ज फर्नांडीसची संघटना आज अशी काम करते. पाटीलबोवा मस्त भाषणे ठोकतात मरीना व ताजमहाल हॉटेलांतून. जॉर्ज फर्नांडीसच्या बाजूस दहा हॉटेलची पोरे, पाटीलबोवांच्या बाजूला एक हॉटेल-मालक ! रफीजखान हा एके काळचा असाच कामसू मुस्लीम पुढारी. आता मात्र कामातुन गेला.

हीच ताकद एके काळी संघाजवळ होती. अप्पाजी जोशींचा वर्ध्याचा संघ, आश्चर्य वाटेल, पण शुद्ध ब्रामणेतरांचा संघ होता ! बाकीच्यांनी जंग जंग पछाडले अप्पाजींना कॉंग्रेसमध्ये क्रियाशील पदाधिकारी करवून घेण्यासाठी. पण त्यांनी डॉ. हेडगेवारांना शब्द दिला होता. म्हणून खिचपत राहिले वर्ध्याच्या दमेकरीं हवेत. नाहीतर महाराष्ट्राचे पहिले मुख्य प्रधान व्हावयाचा मान कॉंग्रेसवाल्यांनीं खुषीने खेरांऐवजीं अप्पाजीं जोशांना दिला असता. संघाने, जनसंघाने व पीं. एस. पी. ने वहुजनसमाजाचे प्रश्न कधीं समजून घेतलेच नाहींत ! 'तीन वार पुढे, तीन वार मागे, झटकत पुढे येणे, झटकत मागे येणे' एवढ्यांतच संघशक्तींचा दुर्दैवाने लोप झाला. नाहीतर ब्राह्मणांत त्यागशक्ती जास्त असते. जवळ काही नसतेच तर त्याग करण्याचा मोठा प्रश्न वाटतच नाहीं ! पण ह्या तरुण पोरांना हीं दृष्टी संघाने दिलीच नाही. नाहींतर यशवंतरावांच्या संघटनेस पार मागे टाकले असते या संघाच्या तडफदार पोरांनी !

आज कुठे कुठे तीं जागृति येत चालली आहे. ठाणे जिल्ह्यांत, मुंबईच्या झोपडपट्टीत ही पोरे आज छान काम करून राहिली आहेत. यशवंतरावांचीं नवशिक्षित मराठा पोरे आज नोकरीं व छोकरीं यांच्या मागे लागलीं आहेत मुंबईच्या मस्त हवेत. त्यामुळे बहुजनसमाजांत थोडा थोडा असंतोष पसरत आहे. यशवंतराव तेवढ्यासाठीं तर दिल्लीहून महाराष्ट्राकडे पळतात वारंवार. ते त्यांचीं व्यथा बाहेर बोलून दाखवीत नाहीत. पण जाणत्यांना तीं काळजीं कळते. यशवंतराव चुकार पोरांना ठोकून व्यवस्थित जागेवर बसवितात. पण हे वारंवार घडत गेल्यास, त्यांचीं पकड ढिलीं पडल्यास भविष्यात हा संघटनेचा डोलारा सांभाळणे जड पडेल.—विशेषतः इंदिरेसारखीं पाताळयंत्रीं स्त्रीं त्यांच्या प्रत्येक हालचालींवर डोळ्यात तेल घालून न्याहाळीत बसलीं आहे म्हणून.

यशवंतरावांनी महाराष्ट्रापुरते तरी आपले 'समाजवादी' विचार साकार व फलद्रूप करून दाखविले आहेत. महाराष्ट्र शेतीच्या आबादीसाठी कधीच प्रसिद्ध नव्हता. खडकाळ जमीन, पावसाची अनिश्चितता, इतर गोष्टींची ऐपत नाही— अशा परिस्थितीत शेती हा शाप ठरला तर नवल नव्हते. पण यशवंतरावांनी त्यांच्या पद्धतीने महाराष्ट्राच्या शेतकऱ्याची अस्मिता जागृत केली, त्यास तगाई

देवविली, पंप सेट्स् दिले, खतांचा व चांगल्या वियाणांचा वापर करण्याचे शिक्षण दिले. 'कॅश् क्रॉप्स्' ही चीज महाराष्ट्रात अनोळखी होती. यशवंतरावांनी बागायतदारांना व उसाच्या मळेवाल्यांना सर्व प्रकारचे साहाय्य करून महाराष्ट्राचा नकाशाच बदलून टाकला. महाराष्ट्रात बिर्ला-टाटा मिळणार कोठून? आणि मराठी मनाला तो विचारही मंजूर नाही.

त्यातून सहकारी शेती, सहकारी बँका, सहकारी साखरेचे कारखाने — सारे 'सहकारी जीवन' जन्मास आले. या सहकारी बाळाचा बाप यशवतराव! आज महाराष्ट्रातच नाही, सर्व भारतभर लाचलुचपत उदंड मातली आहे. पण ही लाचलुचपत पचवूनही यशवंतरावांची ही सहकारी बाळे गोजिरवाणी निपजली आहेत. कन्नमवारांच्या कारकीर्दीत शेतीस विशेष बरे दिवस नव्हते. पण वसंतराव नाईक हे स्वतःच शेतकरी असल्यामुळे शेतीच्या क्षेत्रात ही यशवंती तट्टे त्यांनी थेट अटकेपार नेली! आज भारतात महाराष्ट्राची शेतकी व बागायती पंजाबच्या खालोखाल आहे.

हा हरित क्रांतीचा मराठी प्रकार न भूतो न भविष्यति आहे. दुर्दैवाने, पुन्हा ही क्रांति अजून मध्यमवर्गीयांच्यापर्यंत पोचलेलीच नाही. पुण्याशेजारी उरळी कांचनचा सुप्रसिद्ध आश्रम आहे. तेथे दत्तूभाई नावाचा एक साधा माणूस राबतो. शिक्षण? कुछ नही. पण प्रत्येक पिकावर तज्ज्ञासारखा बोलत असतो. पाणी किती असावे, तपमान किती ठेवावे — तेही सारे तांत्रिक भाषेत! मस्त दुभती जनावरे पाळलेली आहेत. अक्षरशः आंघोळ करावी एवढे दूध देतात तेथील गायी-म्हशी. पुण्याच्या लेखक वर्गातील किती जणांनी या दत्तूभाईंना भेटण्याची ओढ दाखविली आहे? हे असे 'दत्तूभाई' जागोजाग आज महाराष्ट्रात पाहावयास सापडतील. उसाचे आज एकरी दहा हजार रुपये उत्पन्न येते. हे ऊसवाले माळी आज वडे संपन्न झाले आहेत! दृष्ट लागावी असे त्यांचे उत्पन्न असते. एक एकर मळा असला की याच्याजवळ 'जावा' किंवा 'बुलेट्' येते. पाच एकरवाला 'विलीस्' जीप बाळगून असतो. दहा एकरवाला 'अँबॅसेडर' स्वतःला व घरच्यांसाठी 'फियाट' बाळगतो. त्याशिवाय बंगला, जीप हे सारे वैभव असतेच. सरकारी नोकरीतील शेतीचे अधिकारी हे मळेवाले पळवितात आणि पंधराशे रुपये पगार देऊन फार्म मॅनेजर म्हणून नेमतात!

मुंबईच्या खालोखाल सुंदर सुंदर इंपोर्टेड गाड्या आज श्रीरामपूरला आढळून येतात. साधे वॉर्डचे मुनिसिपल् इलेक्शन लढवायचे असेल तर किमान पंचवीस हजार रुपये खर्च येतो. मतदार किती तर दोन-चार हजार. हा खर्च का येतो? कारण लोकांजवळ तेवढे पैसे आहेत म्हणून. आज कोल्हापूर 'यंत्रपूर' झाले आहे ते उगीच? ही शेतकरी व कामगार मंडळी आज ह्या प्रचंड यशाचे 'जनक' कोण ह्याचे ऋण जाणून आहेत. एक काळ शेतकरी-कामगार पक्ष महाराष्ट्रात

यशवंतरावांवर रुसला होता. यशवंतरावांनी त्यास चुचकारून, गोड बोलून आपला उपपक्ष बनवून टाकला. मागच्या एका निवडणुकीत एक पुढारी यशवंतरावांना म्हणाले, 'मामा, या वर्षी आमचे मत साफ तुम्हांला पडायचे नाही.' यशवंतराव हसले, त्यांच्या पाठीवर थाप मारली व म्हणाले, 'मला ह्या निर्भीडपणा आवडतो. तुम्ही मत कोणालाही द्या. आपली मैत्री कायम. मत काय, मी ते तुमच्याकडून पुढील निवडणुकीतही मिळवीन!' खरोखरीच, गेल्या निवडणुकीत या तात्यांनी मामांना संपूर्ण सहकार्य दिले. तीन महिने राबत होता गडी!

महाराष्ट्रात पुढील निवडणुकी या शेतकऱ्यांच्या, उसाच्या मळेवाल्यांच्या व साखर कारखानदारांच्या पैशांवर लढविल्या जाणार आहेत. यशवंतरावांनी हे पक्षी स्वैर उडून जाऊ नयेत म्हणून त्यांचे पंख गेल्या वर्षी छाटण्याची योग्य ती खबरदारी घेतली आहेच. याचा अर्थ सरळ आहे. यशवंतरावांना नजीकच्या भविष्यात तरी स्पर्धा नाही. पैसा व संघटना दोन्ही यशवंतरावांच्या मागे कृष्णार्जुनाप्रमाणे हात जोडून उभ्या राहिल्या तर यशाची काय टाप आहे यशवंतरावांना 'यशवंत' न करण्याची?

मुंबई ही महाराष्ट्राचीच नव्हे तर भारताची पैशाची खाण आहे. कलकत्त्यास पूर्वी लक्ष्मीदेवीचे हेडक्वार्टर्स असे. आज लालभाईंच्या भूतबाधेने कलकत्ता शहर झपाटले गेले असल्यामुळे लक्ष्मीदेवीची कृपा मुंबई व दिल्ली या दोन शहरांवर आहे. दिल्ली राजकीय राजधानी तर मुंबई बंदर भारताची व्यापारी राजधानी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात पूर्वी या व्यापारी नाड्या साऱ्या गुजराथी पटेल व शहांच्या हाती असत. हे सारे स. का. पाटलांचे शागीर्द, पाटलांचा नुसता फोन येता की मफतलालांचा कोरा चेक कॉंग्रेसच्या सेवेसाठी हजर असे. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. यशवंतराव मुख्यमंत्री असतानाच गुजराथ्यांवर मात करण्यासाठी सिंधी, पंजाबी व मारवाडी थैलीशहांचे सहाय्य घेण्यात आले. राजकारण पैशांच्या साहाय्याशिवाय अशक्य आहे. सत्तेपुढे थैलीशहा चट् नमतात. 'या' बाबतीत यशवंतरावांना कमी नाही.

शिवसेनेविरुद्ध बोंबाबोंब करून गुजराथी थैलीशहांनी आपल्या इंग्रजी पत्र-प्रचारद्वारा यशवंतरावांना धक्का देण्याचा प्रयोग करून पाहिला. बाईंच्या कृपेने या थैलीशहांच्या मागील कर्तुमकर्तुम शक्ती आज अहमदाबादेत अज्ञातवासात आहे. मनुभाई शहा दिल्लीतून निघाले व गुर्जर थैलीशहांचे चेहरे पाहण्यासारखे झाले. त्यांची वृत्तपत्रे आज प्रो-इंडिकेट व म्हणून प्रो-यशवंतराव आपोआपच बनली आहेत. कम्युनिस्टांचे शिवसेनेने उच्चाटण केल्यामुळे त्यांना आज बोलायला संधीच नाही. इतके दिवस कम्युनिस्ट शिवसेनेचे वाभाडे काढीत., इंदिरा गांधी बाळ ठाकऱ्यांना भेटू लागल्यापासून कम्युनिस्टांची तीही कुचंबणा होऊ लागली आहे. बाळ ठाकरे यशवंतरावांना कुंचलीने बधून बधून सौम्य फटकारे देत असले तरी 'याद राखा,

खबरदार आमच्या यशवंतरावांना हात लावाल तर !' असे बजावण्यास बिलकूल भीत नाहीत. काही केले तरी रक्त पाण्यापेक्षा घट्ट असायचेच. या फ्रंटवर तरी यशवंतरावांना पहावयास नको. बेळगावच्या प्रश्नावर यशवंतराव बाळ ठाकऱ्यांचा उपयोग कसा करून घेतात ते पाहणे महत्वाचे ठरेल. पाहुण्याच्या हातून निजलिंगप्पांचा साप मेला तर इंदिराबाईंना तेच पाहिजे आहे. आणि यशवंतराव ? बोलून शहाणे आहेत ते !

राजकीय बुद्धिबळाच्या पटावर ते प्याद्यांचा, घोडयांचा व उंटांचा पार निकाल लावतात. मात्र राजास केवळ दुरून 'शह' (चेकमेट्) देतात ! त्यांची सारी राजकीय कारकीर्द उत्तम 'खो ऽ रे' म्हणण्यात गेली आहे. आटयापाटयातील खेळाप्रमाणे हुलकावणी देण्यात यशवंतराव कुशल आहेत. मी त्यांना दिल्लीस भेटलो त्या वेळी त्यांच्याविरुद्ध रुमर्स इतक्या फैलावल्या जात होत्या की यशवंतराव व त्यांचे 'तानाजी' डोंगरे दोन्ही संत्रस्त होते. अशा वेळी बोलायचे तरी काय ? डॉक्टर असल्यामुळे ब्लड प्रेशर कसे आहे, झोप उत्तम लागते का वगैरे डॉक्टरी प्रश्न विचारुन मी सुरुवात तर केली ! सत्तेचा संघर्ष तर उग्रड दिसत आहे, त्यात पडून आपले फुकट नुकसान कशाला करून घ्या अशा आशयाचे काहीसे मला साहेबांनी सुनावले. बाहेर तर साहेबांनी राजीनामा दिल्याचेही वृत्त बाहेर आले होते. साहेब एकीसाठी खूप प्रयत्न करीत आहेत असे मला त्यांच्या घरी बसून त्यांच्याकडे येणाऱ्या निरनिराळया व्ही. आय. पी ज् कडे पाहून वाटू लागले. साहेबांना जाताना 'डटे रहो' सांगून मी त्यांचा निरोप घेतला. 'हां, हां, बिलकूल डटे रहेंगे ऽ' असे साहेब मोठया आत्मविश्वासाने मला म्हणाले.

त्या दिवशी दिल्लीचे हवामान अफवांनी एवढे दूषित झाले होते की मला भीती वाटली, इंदिराजींनी यशवतरावांना धक्का दिला तर–

त्यानंतर काँग्रेस पक्षाची रीतसर फाळणी झाली. साहेबाने पक्ष बदलला. समस्त दिल्लीचा मराठी मध्यम वर्ग त्यांच्यावर नाराज झाला. म्हणे साहेबांनी आपली इमेज् खराब करून घेतली. मी त्यांच्याशी चर्चा करी, 'देशमुखांनी महाराष्ट्राच्या प्रश्नावरून राजीनामा दिला. त्यांची पुढे परिस्थिती काय झाली ? त्यांनी शेवटी नेहरूंना शरण जाऊन युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशनचे अध्यक्षत्व मागून घेतले ! पहिल्यांदा महिना एक रुपया घेईन असे जाहीर केले व मागाहून साराच्या सारा पगार मागून घेतला. त्यात हसे कोणाचे झाले– नेहरुंचे का चिंतामणरावांचे ? यशवंतरावांनी समजा सत्ता सोडली तर द गॉलप्रमाणे लोक त्यांना पुन्हा बोलावतील असे का वाटते तुम्हांला ?'

दिल्लीचा मराठी नोकरदार वर्ग सारा पुण्या–मुंबईचा रिक्रूट. त्यांनी चर्चा करावी ती वर्तमानपत्रे वाचून. माझा वृत्तपत्रांवर जराही विश्वास नाही. कारण आत काहीतरी निराळेच शिजते नेहमी ! त्यांचे माझे कसे पटावे ? माझ्या काही बातम्या

पेट आतील गोटातून आलेल्या असत. इतक्या सनसनाटी की ऐकणाऱ्याला वाटे हा थापाच मारीत आहे! शेवटी ठरविले, चूप बसावे, यासारखा यशवंती उपाय काही नाही. राजकारणात ताना घ्याव्या लागतात त्याप्रमाणे स्थायी-अंतराही आळवावा लागतो. लोक त्यास पलटे म्हणतात. त्यांचे दुसरे नाव राजकारण. कम्युनिस्टांनी आजवर असे पलटीचे राजकारण खूप खेळलेले आहे.

असे मी एका उच्चपदस्थ कम्युनिस्ट नेत्यास म्हणताच उसळून त्याने मला फट-कारले, 'स्टॉप दॅट नॉनसेन्सोकल रीओटेरोक स्लोगनोझम्. आम्ही वेडोवाकडी वळणे बरीच घेतली. पण आमच्याबरोबर प्रत्येक वेळेस काँग्रसही आपले धोरण बदलत होती हे तुझ्या ध्यानात का येत नाही? पहिल्यांदा ब्रिटिशांना पाठिंबा देणारे व जपान्यांना विरोध दर्शविणारे नेहरू-गांधी एकदम 'चले जाव'ची भाषा बोलू लागले याचा अर्थ काय? फाळणीचे विरोधक फाळणीचे मिशनरी होतात ते कसे काय? बच्चा, हे राजकारण आहे, 'वाकेन पण मोडणार नाही' हे आमचे ब्रीद असावे लागते. आपण खलास झाल्यावर कसले राजकारण खेळणार आपण? हुतात्मे होण्यासाठी आम्ही राजकारणात शिरत नाही, समजले का?'

यशवंतरावांची राजकीय कारकीर्द अशा पलट्यांनी खच्चून भरली आहे. ह्या उड्या त्यांनी त्या त्या वेळी घेण्याची तयारी दर्शविली नसती तर त्यांना आजच्या यशाचा सहस्रांशही लाभ दृष्टीस पडला नसता! हे ठाऊक आहे म्हणून की काय सिंडिकेटचा एकही वीर वा वीरा चव्हाणांवर प्रत्यक्ष हल्ला करण्याच्या फंदात पडत नाही. 'न जाणो-' ही आशा अजूनही या वृद्ध कपींच्या हृदयात धुगधुगी धरून बसली आहे. यशवंतरावांचे सारे राजकारण या 'न जाणो'वर तर आधा-रीत आहे. त्यांच्याएवढा पेशन्सचा पुढारी मी तरी अजून दुसरा पाहिलेला नाही. ते दबा धरून टपून बसलेले असतात. वेळ येताच कळतदेखील नाही इतक्या चपळाईने ते सावज तोंडात धरून गट्ट करतात. त्यांना या इंतजारीचा जराही कंटाळा नाही. त्यांच्याच पेशन्सचे त्यांना डोंगरे हे चिटणीस मिळाले आहेत. देवाने खरी जोडगोळी निर्माण केली आहे. त्यांना भेटायला येणारे त्यांचे गाववाले तक्रारीच्या सुरात म्हण-तात, साहेबाने ह्या त्यांच्या-आमच्यामंदी खरा डोंगर उभा केला आहे!

यशवंतराव मूळचे रॉयिस्ट पक्षाचे. १९३९ साली रॉयवादी लोक कांग्रेसच्या बाहेर पडले. यशवंतरावांनी ओळखले, या कविकल्पनांच्या बहाद्दरांबरोबर बाहेर पडून पदरात नैराश्याशिवाय काहीही मिळणार नाही. सामान्य जनता अजून कांग्रे-सच्या मागेच आहे. सर्वांनी बाहेर पडायचे ठरविले. चव्हाण नेमके अपवाद. खूप गरमागरमी झाली त्यांच्याविरुद्ध. यशवंतरावांची दूरदृष्टी मात्र खरी ठरली. त्यांना सिक्स्थ सेन्स् म्हणतात तो चांगला असावा. सारे रॉयवादी बरोबर दहा वर्षानंतर पुन्हा चव्हाणांचे सहकारी होण्यासाठी कांग्रेसमध्ये आले.

१९४७ मध्ये यशवंतरावांनी दुसरी पलटी खाल्ली. शंकरराव मोरे वगैरे लोकांना

मराठी पंचा कंपनीने तिकीटे दिली नाही. ही गोष्ट १९४६ च्या असेंब्लीच्या निवडणुकीची. बहुजनसमाजवादी पक्षाचा जन्म हा असा झाला. तो सारा राग या लोकांनी गांधीवधोत्तर काढला. ब्राह्मणांना पुरे ठोकून काढले. नाहीतर, गांधीजींचे प्रेम या पैकी एकालाही नव्हते. असला तर पंचा कंपनीवर जबरदस्त घुस्साच होता.

ह. रा. महाजनी, तर्कतीर्थ वगैरे मंडळी ज्याप्रमाणे कॉंग्रेसबाहेर गेली त्याप्रमाणे १९४८ साली वरील मंडळी कॉंग्रेसबाहेर पडली. यशवंतराव मात्र पुन्हा स्थिर. पुन्हा गरमागरमी. गद्दारी व "तोडीन-मोडीन"ची भाषा. यशवंतराव सर्वांचे बारसे जेवून बसले होते. पहिल्या पलटीत 'व्हॅक्यूम' तयार झाल्यामुळे ते एकदम सातारा जिल्ह्याचे कॉंग्रेस प्रमुख बनले. १९४८ साली पुनश्च 'व्हॅक्यूम' झाला. हिरे व यशवंतराव मागे राहिले. हिरे गाडगीळांच्या सल्ल्याने चालत असत. यशवंतराव मोरारजींचे जवळजवळ पी. ए. बनले होते. त्यांच्याकडून शासनाचे शिक्षण घेत होते.

त्या वेळच्या मंत्रीमंडळात एकापेक्षा एक अशी सरस गुर्जर माणसे होती. अभ्यास करून निर्णय देत. आमची मंडळी बेताबाताचीच होती. सेक्रेटरी त्यांचे 'बाप'! गुर्जर मंडळी या लोकांना बनवून गुजराथचा सर्वांगीण पण पक्षपाती विकास कसा साधून घेत हे यशवंतराव असहाय्यपणे न्याहाळीत होते. खेरांच्यानंतर मुरारजी मुख्यमंत्री बनले, हिरे नाहीत. हिऱ्यांनी विशेष प्रयत्नच केले नाहीत ना! आणि मोरारजींनी गोड बोलून इतरेजनांवर सुंदर हिप्नोटिझम् केले. पुन्हा यशवंतराव तटस्थ मुद्रा ठेवून आत जळत होते. गेम् ऑफ पेशन्स, टेरीबल पेशन्स !

तिसरी पलटी संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेवेळची. मुंबईच्या मंत्रीमंडळात मोरारजींच्या छायेत असल्यामुळे त्यांचे विशेष तेज पडत नव्हते. पडणार कोठून? मोरारजी डिक्टेटर होता. हम करेसो कायदा. नो आर्ग्युमेंट! त्याच्याशी बिनसले म्हणजे सरळ घरचा रस्ताच धरायचा! यशवंतराव त्या वेळी पुरवठा मंत्री होते. त्यांनी अन्नमंत्री रफी अहमद किडवाईशी सूत जमविले. किडवाईमुळे त्यांचे नाव दिल्लीत ऐकू येऊ लागले. चौदा नोव्हेंबर १९५४ रोजी 'नेहरु की संयुक्त महाराष्ट्र असा माझ्यासमोर विकल्प निर्माण झाला तर मी नेहरु असे उत्तर देईन.' असे त्यांनी जाहीर केले. या एका वाक्यासाठी यशवंतरावांनी अत्र्यांच्या केवढ्या शिव्या खाल्ल्या आहेत!

महाराष्ट्राचा मंगल कलश यशवंतरावांनी मोठ्या दिलाखाने स्वीकारला—अत्रे, एस्. एम्. यांच्या साक्षीने. सामान्यतः, लढ्यात विरोधी पक्ष जिंकला की तो सत्तेवर येतो. इथे विरोधी विरोधीच राहिले. थ्री चियर्स फॉर यशवंतराव !

यशवंतरावांनी समिती तोडली.

शे. का. प. खलास केला.

पुण्याच्या बुद्धिजीव्यांना खिशात ठेवले. सारी विरोधी पत्रे 'साहेब–साहेब' करू

लागली. एक दोन अपवाद वगळले तर. भाऊसाहेब हिरे मात्र मनातून फार दुःखी होते. ते १९६२ साली वारले. त्यांना मंत्री होता आले असते. पण त्या यशवंतरावांच्या हाताखाली मी नाही काम करणार असा त्यांचा बाणा. यशवंतरावांना काढण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले. पण ते सारे निष्फळ ठरले. यशवंतरावांची संघटनेवर पकड विलक्षण होती. हिऱ्यांकडे एक गाडगीळ होते तर यशवंतरावांनी सारी बामणे आपल्या कांखेला लावली होती. हिऱ्यांचा शेवटचा जबरदस्त प्रयत्न काकासाहेबांना महाराष्ट्राचे राजाजी बनवून शे. का. पक्षाची कम्यूनिस्ट तत्त्व-प्रणाली महाराष्ट्रातून हाकलवून लावण्यासंबधीचा होय. पण हे स्वप्न धुळीस मिळाले.

कारण १९६२ च्या चिनी आक्रमणामुळे सारी परिस्थितीच बदलली होती.

काका निर्वासित झाले.

हिरे स्वर्गवासी.

यशवंतराव चव्हाणकी जय!

कारण नेहरूंनी त्यांना दिल्लीस बोलावून घेतले. संरक्षण मंत्री म्हणून. काय नशीब असते एकेकाचे. दुसऱ्या दिवशी आक्रमकांनी जणू आपला पराभव जाहीर केला! युनिलॅटरल सीज् फायर!

महाराष्ट्रात विशेषणे सर्वांत स्वस्त. कोणास दे. भ., कोणास स्वातंत्र्यवीर, कोणास पॉल मुनी तर कोणास मदनमंजिरी! आमच्या यशवंतरावांना दिलेले विशेषण ऐकण्यासारखे आहे. सह्याद्रि हिमालयाच्या रक्षणार्थ धावून गेला!

सावरकरांनी मागे लेखण्या मोडाव्या हे सांगितले. ते का हे मला त्या वेळी प्रथम कळले.

चिन्यांनी अक्षरशः यशवंतरावांची अब्रू वचावली.

आमची तयारी नीट नव्हती. चिनी आसामात जवळजवळ पोचले होते. लढाई चालू राहिली असती तर काय झाले असते ते एक यशवंतरावांनाच ठाऊक.

रशियाविरुद्ध चव्हाण पुण्यात बोलून बसले, काय नेहरू चिडले होते त्या वेळी! कम्युनिस्ट साथीदारांनी यशवंतरावांना डिसमिस् करावे अशी मागणी केली. कारण भाषणावरून यशवंतराव प्रो–अमेरिकन वाटू लागले. कटाची तयारी शिजू लागली.

यशवंतराव वाचले. ते अमेरिकेत होते. आणि नेहरूच गेलेले!

इंग्लड-अमेरिकेचा दौरा रद्द करून यशवंतराव जॉनसनबरोबर भारतात परतले.

पुन्हा वारसाईचा लढा सुरू झाला. शास्त्रीजींना पंतप्रधान व्हायची इच्छा होती. मोरारजीभाईंना वाटले, यशवंतराव मलाच पाठिंबा देतील. मी एक्स् बॉस् ना? कामराजांचा पाठिंबा शास्त्रीजींना पाहताच यशवंतरावांचे मत शास्त्रीजींना.

पुढे १९६५ सालचे युद्ध झाले.

महाराष्ट्राचे यशवंतराव एका रात्रीत भारताचे सर्वांत महत्वाचे पुढारी झाले.

खरं म्हणजे हे युद्ध आपण घालवायचेच. पाकिस्तानची तयारी आपल्यापेक्षा जास्त चांगली होती.

यशवंतरावांना व भारतास उसाच्या मळ्याने वाचविले. पॅटन त्या उसाच्या मळ्यांत पुढे सरकतच ना.

पुन्हा यशवंतरावकी जय !

यशवंतराव ताश्कंदला गेले. लाल बहादूरशास्त्री जिवंत परत आले असते तर शास्त्री, चव्हाण व स्वर्णसिंग यांना घोंडे खावे लागले असते.

मोरारजी गटाची तशी तयारी होती. कामराजांच्या मनातूनही शास्त्रीजी उतरले होते

शास्त्रीजी घरी परतले पण कोसिजीनच्या खांद्यावरून !

आता तरी मोरारजी पंतप्रधान व्हावे किंवा नाही ? नाव नको. कामराजांनी बाईंना तो चान्स दिला. त्या आपल्या मुठीत, छे: चिमटीत, राहतील व आपण किंग–मेकरचा रोल शानीत खेळू ह्या हेतूने.

ह्या खेळात पहिल्याच सलामीत यशवंतराव असे मस्त बनले आहेत की ' बाई भलतीच वेरकी दिसत्येय् ' असे म्हणण्यावाचून त्यांना गत्यंतरच नव्हते. आपण पंतप्रधान व्हावे अशी बाईंना त्यांनी विनंती केली. त्यांना वाटले, बाई मी नाही, आपणच व्हा ना असे लाजतमुरकत म्हणतील. बाईंनी त्यांना काय उत्तर द्यावे ? त्यांनी उत्तर एका शब्दांत दिले—

" थँक्स— "

यशवंतरावांनी ओळखले, प्रकरण अवघड दिसत्येय्.

तालीम चाचा नेहरूंची होती, कोणा लुंग्यासुंग्याची नव्हे.

बाईंनी यशवंतरावांनी दिल्लीतून स्वतः होऊन तळ उठवावा यासाठी सर्व प्रयत्न करून बघितले. अगदी साम–दाम–दंड–भेद.

यशवंतराव राजकारणात सातारा युनिव्हर्सिटीचे ग्रॅज्युएट आहेत. सहजासहजी ते आपली विकेट जाऊ देणार नाहीत. मध्यंतरी वसंतरावदादा पाटलांनी उगीचच अंगात आणले होते. मळेवाले व बागाईतदार यांनीसुद्धा मध्यंतरी यशवंतरावांना टांग मारण्याचा प्रयत्न करून बघितला होता. यशवंतराव सर्वांचे बारसे जेवून बसले आहेत. त्यांनी कोणा एकाला आपल्यापेक्षा वरचढ होऊन दिले नाही. यांच्यांचे ताबूत थंडे –

बाईंनी मात्र त्यांना घाईला आणले होते.

बाईंची जात नागिणीची. बंगलोरला ही नागीण चिडलेली होती. म्हणून घरी परतल्यावर तावडतोब बाईंनी grave consequences ची धमकी दिली होती. या जुन्या पुढाऱ्यांना, खरं सांगू, ही धमकी फुसकी वाटली. तारकेश्वरी सांगत होत्या,

अरे चाळीस वर्षे राजकारण खेळता तुम्ही, एवढेही कळू नये त्या वेळी ? तारकेश्वरींचे शब्द : These people refused to move !

या कर्माला काय करणार ?

आज सिंडिकेटने एक जबरदस्त प्रचार चालविला आहे, आम्हीदेखील यशवंतरावांना पंतप्रधान बनविण्यास तयार होतो. साऱ्या मराठी वृत्तपत्रांनी ते सूत्र पकडून यशवंतरावांवर टीकेची गरळ ओतण्यास सुरुवात केली.

इथे मला दोन शब्द सांगावेसे वाटतात. यशवंतरावांना ही मंडळी पंतप्रधान नेमण्यास तयार केव्हा झाली ? जेव्हा त्यांच्याच्याने काहीच होऊ शकणार नाही हे जगजाहीर झाले तेव्हा.

लक्षात ठेवा, रामसुभग सिंगांनीदेखील इंदिरेकडे जायची तयारी केली होती. उमाशंकर दीक्षितांनी सी बी. गुप्ता इंडिकेटमध्ये यावे यासाठी आकाशपाताळ एक केले. टर्म्स जमल्या नाहीत म्हणून, नाहीतर हा मोहरा इंदिरेच्या जाळ्यात सापडत होता. त्यांना केंद्र सरकारात घ्यायला इंदिरा तयार होती. तेवढाच यशवंतरावांना शह झाला असता. पण कमलापती त्रिपाठींनाही वर यायचे होते. ही हिंस्र श्वापदे एकत्र होऊन बाईंवर उलटली तर काय करा ? म्हणून नाव बद्दू झालेले व कटबाजी करू न शकणारे लोक आजूबाजूला बरे. सर्वत्र रान पेटलेले असता उगीच आपल्या मचाणास आग लागली तर काय करा ?

निजलिंगप्पांना इंदिरेशी लढा नको होता–मोरारजींस नको होता–पण इंदिरेस मोरारजींशी लढा पाहिजे होता. संजीव रेड्डी हा इंदिरेचा माणूस. इंदिरेने लाथ मारली, गिरीस पत्करले व म्हणून तो मोरारजींकडे गेला. त्यांनाही लढा नकोच होता.

निजलिंगप्पा-इंदिरेचे गाजलेले जेवण ज्या रात्री घडले त्या सायंकाळी पाटीलबुवा प्लेनने मुंबईला पळाले. इंदिरा पाटलांना accomodate करायला तयार होती पण पाटलांना big post पाहिजे होती.

इंदिरेने दिमाखाने चार छोटचा मंत्र्यांना काढून टाकले व यशवंतरावांना घाबरवून सोडण्याचा एक प्रयोग करून पाहिला. यशवंतरावांची 'राजीनामा देईन' ही भाषा बंद झाली. बाईने खरोखरोच राजीनामा अ‍ॅक्सेप्ट केला तर काय करा ?

हवालदील झालेल्या सिंडीकेटने चव्हाणांना पुढे केले.

चव्हाणांनी सिंडीकेटची ताकद ओळखली. त्यांनी पवित्रा बदलला. शाळेत असताना यशवंतरावांचे गणित चांगले होते. ते आजही आहे. सहसा त्यांचे गणित चुकत नाही. पेंढा भरलेल्या सिंडिकेटपेक्षा ही जिवंत वाघीण बरी असे गणित यशवंतरावांनी मांडले असावे.

ते होण्यासाठी दुसरेही जबरदस्त कारण घडले आणि तेही यशवंतरावांच्या महाराष्ट्रात.

बाघीण येथेही पोचली होती.

एका मध्यरात्री मुंबईच्या विमानतळावर बाईंचे लष्करी जेट उतरले. महाराष्ट्राचे दोन पुढारी बाईंशी बोलणी करावयास आले होते, असे म्हणतात. यशवंतरावांच्या संघटनेवरच हल्ला होता हा. यशवंतराव तिसऱ्या दिवशी दौडत महाराष्ट्रात आले हे खरे! त्यांच्या पद्धतीने लोकांना चुचकारून, थोपटून थंड केले. हे प्रेमाचे शास्त्र-तंत्र व मंत्र-यशवंतरावांना चांगले जमते. एस. एम., मधू, जयवंतराव, प्रभाकर पाध्ये, तळवलकर वगैरे वगैरे माणसांना जिंकून घेणे साधे काम नाही, मिस्टर.

पाटकर सभागृहात शिवोर भरले होते ते आठवते का ?

यशवंतरावांना रेड्डी निवडून येणार ही खात्री होती. आयुष्यात गणिते चुकतात कधी कधी. यशवंतरावांचेही चुकले.

निजलिंगप्पांना मुख्य मंत्रीपद सोडून दिल्लीच्या आखाड्यात यायचे नव्हते. तीच गोष्ट संजीव रेड्डींची. दिल्ली म्हणजे शुद्ध म्हारकी आहे. गटबाजी परवडली पण कटबाजी भारी पडते. चव्हाण घट्ट टिकून आहेत हे मोठे आश्चर्य ! आणि कौतुकास्पदही ! !

पाटीलबावांना काँग्रेस अध्यक्ष व्हायची लहर आली. म्हणून मोहन धारियांनी फॉर्म भरला.

पण पाटीलबावा इंदिरेशी लढण्यास तयार नव्हते. ' आय वॉज् रोअरींग लाईक् ए लायन ' हे पाटलांचे शब्द वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले खरे.

पण रोअरींग ते हितेंद्रभाईंच्या तुलनेत !

पाटील मुंबईस पळून आले.

कामराज तर त्या मिटींगला अर्धा तास उशीरा आले.

यशवंतराव ? 'टू सेव्ह फेस् ' त्यांनी २५ ऑगस्ट १९६९ रोजी ऐक्याचा ठराव पसार केला.

मोरारजी तटस्थ होते.

आणि पाटीलबावा काय करीत होते ? म्हणे गर्जना करीत होते !

पाटलांच्या गर्जनाच भारी पडल्या आहेत त्यांना. यावच्चंद्र दिवाकरौ मुंबई महाराष्ट्राला त्यांच्या पुण्याईने मिळणार नव्हती. त्या महाराष्ट्रात, त्या मुंबईत त्यांना उभे राहणे आज मुष्कील झाले आहे, म्हणून तर ते बनासकांठ्याला पळाले.

बनासकांठ्याहून निवडून येताच त्यांच्या गर्जना चालू झाल्या. त्यांना वाटले, इंदिरेस घाबरवू. इंदिरा का अशी डरते ?

खरे खोटे कोण जाणे. पण पाटील गोटाची बातमी ही की पाटलांना इंदिरेशी कधीच लढायचे नव्हते. इंदिरा हसत पाटलांना ॲकामोडेट करून घ्यायला तयार होती. पण यशवंतराव–

" He forced us to have a showdown."

" नाहीतर आम्ही एवढी हिंमत केलीही नसती ! "

यशवंतराव बाईंच्याविरुद्ध गुरकत बोलत होते ही गोष्ट सत्य आहे : " Why should she take me for granted ? "

" ती नोकर समजते काय आपल्याला ?"

हे सारे ऐकून महाराष्ट्राच्या ' विरोधी ' पांढऱ्या टोप्यांनी आपल्या स्वार्थासाठी इंडिकेटमध्ये प्रवेश केला.

आणि यशवंतरावांनी आपली टोपी फिरविली. ते इंडिकेटमध्ये दाखल झाले !

या विरोधी लोकांची फार मोठी पंचाईत करून टाकली यशवंतरावांनी. ह्या विरोधकांची एवढ्या झटकन् टोपी फिरवायची हिंमत नाही ! आणखी इंडिकेटमध्ये यशवंतरावांच्या खास माणसांच्या नजरेखाली वावरणे त्यांना ऑक्वर्ड होते ! !

थ्री चियर्स फॉर यशवंतराव !

हे नक्की, महाराष्ट्र थैलीशहांचा एजंट म्हणून काम करणे अशक्य आहे. सिंडिकेट व इंडिकेट यांच्यात फरक काय ? Haves व Have Nots चा. मराठी काँग्रेसवाल्यांना पाटील, मोरारजी, अप्पा हा महाराष्ट्र विरोधी गट केव्हाही मंजूर होणे अशक्य आहे. महाराष्ट्र हा स्वभावतःच समाजवादी आहे. जनसंघातही मराठी लोकांनी त्यांच्या वार्षिकोत्सवात उत्पन्नावर पाच लाखांचे सीलिंग व्हावे ही जाहीरपणे मागणी करण्याचे धारिष्ट्य दाखवावे हे काय दर्शविते ?

यशवंतराव सिंडिकेटमध्ये जाणार हे ऐकताच महाराष्ट्र काँग्रेसमध्ये बंडखोरीची एकच लाट उसळली.

यशवंतरावांना ते नीट दिसले.

ही ' स्वच्छ दृष्टी ' पाटीलबावा, मोरारजी देसाई यांच्याजवळ नाही. म्हणून ते आपटी खातात.

यशवंतरावांची दृष्टी नीट आहे. त्यांचे गणित उत्तम आहे.

आश्चर्य आहे, मराठी मध्यमवर्गीय त्यांना ' संधिसाधू ' म्हणतो. राजकारण म्हणजे काय हे वर्तमानपत्रे वाचून कळत नाही, राजकारण लढवावे लागते. मराठी मध्यमवर्गीयांना हे जेव्हा कळेल तो सुदीन.

कोणीही व्यक्ती यशस्वी होण्यासाठी तिच्याजवळ प्रशासकीय गुणांची आजकाल गरज होऊन बसलेली आहे. हा 'बिझीनेस् मॅनेजमेंट'चा कोर्स यशवंतरावांनी मोरारजींकडे घेतला. मोरारजी जुना इंडियन सिव्हिल सर्व्हिसचा ट्रेंड माणूस. यशवंतराव चाणाक्ष. मुख्यमंत्री कसा नसावा हे ते मोरारजींपासून शिकले. संरक्षणमंत्री कसे नसावे हे ते कृष्ण मेननपासून शिकले. आणि गृहमंत्री कसे नसावे हे गायीचा बळी झालेल्या गुलझारीलाल नंदांपासून.

कन्हैय्यालाल मुनशींचेच यशवंतरावांना उत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून सर्टिफिकेट मिळालेले आहे. चव्हाण ' यांनी आपल्या एका वर्षाच्या कारकीर्दीत अत्यंत भरीव कार्य केले आहे. असे कार्य आतापर्यंत कोणाही मुख्यमंत्र्याने केलेले नाही. मागच्या मुख्यमंत्र्यांचे काम मी बरीच वर्षे पाहत आहे. त्यावरून मी सांगू शकतो की यशवंतरावांनी अल्पावधीत जेवढे भरीव कार्य केले आहे तेवढे कुठल्याही मुख्यमंत्र्याने केलेले नाही. दोन वर्षांपूर्वी या प्रांतात अस्वस्थता नांदत होती, पण चव्हाण यांनी जादूच्या कांडीप्रमाणे परिस्थिती बदलून टाकली. सर्वांना समान व न्यायाची वागणूक देण्याची त्यांची भूमिका वाखाणण्यासारखी आहे. त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे. त्यांची ही कामगिरी अभिमान बाळगण्यासारखी आहे. '

कार्यक्षम राज्यकारभाराविषयी यशवंतरावांच्या कल्पना सोप्या पण निश्चित आहेत. आजच्या कालांत सर्वत्र ही कार्यक्षमता खाली गेली आहे. यशवंतरावांच्या या कार्यक्षमतेच्या तीन कसोट्या ध्यानात ठेवण्यासारख्या आहेत : १. विलंब का लागतो ? विलंब टाळण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे आलेले काम एका ठराविक मर्यादेत पुरे केलेच पाहिजे अशी मनाला सवय लावन घेतली पाहिजे आणि ती सवय इतरांना लावली पाहिजे. २. ज्याला करप्शन् बाय एक्स्टॉर्शन् म्हणता येईल अशी, म्हणजे सक्तीने पैसे वसूल करण्याची लाचलुचपत काही काळ काही सर्व्हिसेस्मध्ये चालू ह तो. अशी वसुली आता बंद होत चालली आहे. ती बंद करण्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक खाते थोडफार यशस्वी होत आहे. परंतु संमतीने काही गोष्टी करण्याची जी पद्धत आहे त्या बाबतीत आळा घालण्याच्या दृष्टीने आपण कितपत यशस्वी झालो आहोत हे मला माहीत नाही. लाचलुचपतीचा दुसरा एक अप्रत्यक्ष मार्ग आहे. काही ठराविक पद्धतीनेच अधिकाऱ्याकडे गेले तरच काम होते. ३. जुन्या परंपरेत आम्ही वाढली आहोत. त्या परंपरेमुळे अजूनही पोलिस आणि रेव्हेन्यू खात्यांचे वर्चस्व लोकांच्या आणि अधिकाऱ्यांच्या मनातून जात नाही. अधिकाऱ्यांच्यासंबंधी लोकांची जी कल्पना आहे, तीच मंत्रीमंडळासंबंधी हा चुकीचा दृष्टिकोण हळूहळू बदलला पाहिजे.

त्यांच्या कार्यक्षम कारभाराचे श्रेय कोणास ? त्यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे, ' माझ्या राजकीय आयुष्यावर टिळक व गांधीजींची छाप पडली असून सामाजिक आणि शैक्षणिक बाबतीत महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराजांचा प्रभाव पडला आहे. '

यशवंतरावांचा सर्वांत मोठा गुण लोक हाताळण्याचा. शक्य तेवढे ते कडू न बोलता, दुसऱ्यास न दुखावता आपले काम साधतात. मराठी माणसात हीं पद्धत क्वचितच पाहावयास मिळते. मराठी माणूस सत्तेवर असताना दुसऱ्यास अती उद्धटपणे वागवितो, पाणउतारा करतो व समोरच्याचा बाप बनून काम करवून घेतो.

चार गोड शब्दांचा वापर करण्याचे चातुर्य त्यांच्या अंगी नसते. अशा परिस्थितीत चव्हाणांचे हे चातुर्य डोळयात भरते. त्यांचे कौतुक करावेसे वाटते. अर्थात् वेळ आली तर तेवढयाच निग्रहाने व निर्भीडपणाने ते नकार देऊ शकतात, तिकिटे देण्याच्या वेळी हा त्यांचा स्पष्टवक्तेपणा दिसून येतो. चवक ते इंग्रजी भाषेचा आसरा घेतात व मोटारीचे दार बंद करीत 'आय् ॲम् द बॉस' असे म्हणून शोफरला गाडी पुढे काढण्यास फर्मावितात.

या शासकीय चातुर्याचा उपयोग करून त्यांनी विस्कळीत झालेले संरक्षण मंत्रालय पुनश्च नीट सावरले व भारतीय सेनेची लढण्याची शक्ती वाढविली. १९६५ साली भारतास जो विजय प्राप्त झाला त्यामागे ही सैनिकांची शस्त्रसंभार व वैयक्तिक गरजा यांच्या बाबतीतील तुष्टी ही निश्चित जबाबदार होती. एका मोठ्या पण अत्यावश्यक संरक्षण प्रॉजेक्टचे मुख्य अधिकारी मला सांगत होते, 'यशवंतराव आमच्यकडे दोन दिवस होते. आमचा प्रॉजेक्ट् हायली टेकनिकल आहे. अती गुंतागुंतीचा आहे. पहिल्या दिवशी चव्हाणांनी सारे ऐकून घेतले. तोंड न उघडता. दुसऱ्या दिवशी मात्र त्यांनी प्रश्न विचारावयास व आम्हालाच क्रॉस् करण्यास सुरुवात केली. तेव्हा कळाले की स्वारीने बरीच माहिती आत्मसात केली आहे. प्रश्न विचारताना तुम्ही काय प्रश्न विचारता त्यावरून तुमची ग्रहणशक्ती नीट ध्यानात येते.'

ही कार्यक्षमता यशवंतरावांना गृहमंत्री म्हणून काम करीत असताना रोज उपयोगी पडत आहे. वल्लभभाई, गो. व. पंत वगैरे अतिकार्यक्षम गृहमंत्र्यांचा वारसा यशवंतराव कितपत चालवू शकतील याची सर्वांना खात्री नव्हती. नेहरूंच्या अमदानीत राज्यकारभार एकसूत्र व एकसंध होता. त्या काळी कॉंग्रेसचे डीव्हॅल्यू-एशन आजच्याएवढे नव्हते. आज गृहमंत्र्याचे काम सर्वात बिकट होऊन बसले आहे. बेताल पोरांनी नवशा शिक्षकास न जुमानता वर्ग डोक्यावर घ्यावा त्याप्रमाणे निरनिराळी प्रांतसरकारे स्वतंत्र होऊन स्वैर वागत आहेत. तेथे आपले विश्वासा-तील गव्हर्नर (उदा. पावटे) नेमून विरोधी पक्षाच्या मंत्रीमंडळास दाबात ठेवून जमल्यास त्यांना गडगडविण्याचा प्रयत्न करण्यात दुर्दैवाने आज गृहमंत्र्यांची शक्ती खर्ची होत आहे. जात्या कार्यक्षम असल्यामुळे यशवंतरावांनी हळूहळू सर्वत्र आपल्याला अनुकूल अशी राज्यसरकारे सत्तेवर ठेवण्यात बरेच यश मिळविलेले आहे, हे निःसंशय.

नाही म्हणावयास कम्युनिस्ट व कम्युनॅलिस्ट यांच्या बाबतीत ते संपूर्णपणे यशस्वी झालेले नाहीत. वल्लभभाईंनी दोघांना ठोकून काढले होते. वल्लभभाईंच्या वेळची परिस्थिती व सत्ता आज यशवंतरावांना नाही. गृहमंत्री म्हणून जास्तीत जास्त अडचणींना यशवंतरावांना तोंड द्यावे लागले आहे. आणि बहुधा सर्व वेळी ते त्या व्यूहातून पराभूत न होता बाहेर आले आहेत. त्या साहसांचे व युक्त्या-

प्रमुखांचे वर्णन करायचे झाल्यास त्याचा एक स्वतंत्र लेखच होऊ शकेल.

यशवंतरावांना पंतप्रधान व्हावयास काही मूलभूत अडचणी आहेत. पहिली अडचण, ते मराठी आहेत. मराठी माणसाच्या आज सारे जगच विरुद्ध आहे. नाहीतर यशवंतराव तसे 'टफ्' आहेत. एकेकाळी त्यांच्या डोक्यावर एक हजार रुपयांचे बक्षीस होते ! त्यांचा ऑल इंडिया 'रोल' वेल्स् हँगन् या लेखकाने पुढील शब्दांत मोठ्या कौशल्याने रंगविला आहे,

" By exploiting cast and provincial loyalties to the hilt, some observerers feel that Chavan has dis-qualified himself for an all India role. He emphatically denies this. He told me : " My present responsibility is Maharashtra. But my approach, background, everything, is absolutely all-India. As a member of the Congress Working Committee I have to take the larger view. Even my thinking for Maharashtra flows from my thinking about national problems. "

मराठी माणूस चोख, हिशेबी व फटकळ असतो. बंडखोरी त्याच्या नसातून वाहते. पण या गुणांना आजच्या जमान्यात अवकळा आली आहे. काँग्रेसमध्ये टिळकांनंतर तोलाचा असा एकही पुढारी टिकू शकला नाही, वाढू शकला नाही. गाडगीळही त्या मानाने थिटेच पडले. म्हणून ते काँग्रेसमध्ये राहू शकले ! टिळकानंतर खऱ्या दूरदृष्टीचा काँग्रेसमध्ये असलेला एकमेव मराठी पुढारी म्हणजे यशवंतरावच. महाराष्ट्राच्या बाहेर लोक हा पुढारी 'ठी' का 'ठा ?' 'या वादात पडत नाहीत. सारेच मराठा किंवा सारेच मराठी !' निजलिंगप्पा वरवर कितीही आश्वासने देत असले तरी मनातून चव्हाणांच्या विरुद्धच. केरळ व बंगाल त्यांच्यावर चिडलेले आहेतच. कामराजांचा घुस्सा प्रसिद्ध आहे. नाहीतर त्यांनी इंदिरेच्याऐवजी चव्हाणांनाच पंतप्रधान केले नसते का? लालबहादूराच्या जमान्यात यशवंतराव ऑल-इंडिया पुढारी झाले हे कामराजांना खुपतच होते. हेटाळणीच्या स्वराने ते एका माझ्या स्नेह्यास सांगत होते.

" What that fellow did ? Jawans fought, Jawans died, fellow got credit ! "

संस्थानिक एकजात यशवंतरावांच्या विरुद्ध 'हलक्या ब्रीड'चा 'टेबल मॅनर्स' नसलेला व इंग्रजी उच्चारही धड न येणारा ! मेडीकल 'कॉर्प्स' उच्चार करतात म्हणे ! सुरुवातीपासून सिमल्याच्या पब्लिक स्कूलमध्ये जायला मिळाले नाही व ममी-डॅडी संस्कृति आत्मसात् करावयास मिळाली नाही यात यशवंतरावांचा दोष काय ?

अडाणी बिहारी व ओरीसाच्या पुढाऱ्यांना भरपूर डुबवून टाकायला यशवंत-

रावांजवळ पैसा कमी पडतो. सी. बी. गुप्ता व सुखाडीया या दोघांची नजर यशवंतरावांच्या खुर्चीवर! म्हणजे ते दोन प्रांतही यशवंतरावांना अनुकल नाहीत. गुजराथ प्रांताचा भरवसा काहीच देता येत नाही. कारण गुजराथच आज ऑक्सीजनवर आहे! बघू या गुजराथ व म्हैसूर येथे यशवंतराव 'अनुकल सरकार' आणतात का!

'बढती' मिळाली तर त्यासाठी अंगी लागणारे गुण यशवंतरावांत भरपूर आहेत.

आजच्या बुढ्ढया राजकीय मंडळींत छपन्न वय म्हणजे भलतेच तरुण म्हणायचे. ब्याहत्तरींचा मोरारजी अजून पंतप्रधान होण्यासाठी धडपडतो, हे लक्षात असू द्या.

यशवंतरावांची तब्येत ठणठणीत आहे. सारा दिवसभर काम करूनही ते रात्री बैठकीला ताजे कसे राहू शकतात ह्याचे मला कौतुक वाटते. मात्र यशवंतरावांनी त्यांचे वाढलेले वजन बरेचसे कमी करावयास हवे अशी माझी प्रेमाची विनंती आहे त्यांना. पुढे मागे ते त्यांच्या हृदयास व मेंदूस त्रास देणार आहे अशी वैद्यकीय धोक्याची घंटा मला वाजवावीशी वाटते.

काँग्रेसमध्ये आज ते श्रेष्ठ पुढाऱ्यांपैकी एक आहेत. त्यांना अनुभव चांगला आहे. संघटक म्हणून आज फक्त तीन-चार काँग्रेसश्रेष्ठी हयात आहेत. त्यांत त्याचा क्रमांक पहिला लागतो. बाईंना यशवंतरावांना धक्का देणे तेवढ्यासाठी तर जड, जाते! आणि दुसरे जड जायचे कारण होम मिनिस्ट्रीच्या इंटेलिजन्स खात्यांतील फायली साऱ्या त्यांच्या ताब्यात आहेत. (का होत्या?)

त्यांना मुलाबाळांचा व्याप नाही. जेवढा व्याप जास्त तेवढे involvement जास्त. कारण प्रत्येकाची नफडी निस्तरताना दम निघतो आईबापांचा. कन्नमवार, कैरों व मोरारजी यांना खाली कोणी आणले ते कोणाला ठाऊक नाही काय? मी धी म्हणणारे बाळासाहेब देसाई! पण त्यांची इमेज केलीच की नाही 'डौन' त्यांच्या सुपुत्राने?

यशवंतराव जन्मतःच समाजवादी आहेत. त्यांना आता बिर्लांची प्रॉपर्टी जरी कोणी देऊन टाकली तरी ते या जन्मात पूंजीवादी होऊ शकणार नाहीत. त्यांचा समाजवाद परिस्थितीजन्य व अनुभवसिद्ध आहे. त्यावर तर्कतीर्थांनी सैद्धांतिक थर कदाचित थापण्याची कामगिरी केली असेल पूर्वी, पण खरे यशवंतराव समाजवादीच. जसे खरे डांगे व रजनी पटेल हाडाचे थैलीशहाच.

म्हणून त्यांच्या कार्यालयामध्ये त्यांना इतर 'बॉस'प्रमाणे वागता येत नाही. मी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या मुंबई व दिल्ली येथील निरनिराळ्या लोकांना भेटून मुद्दाम खोदखोदून विचारले आहे. डोंगरे हे त्यांचे जुने चिटणीस. किळकरसुद्धा. ते तर साहेबांचे गोडवे गातीलच, या बुद्धीने ते सोडून इतरांना मी गाठले. सर्वांचे एकच उत्तर. साहेब 'मित्रा'प्रमाणे वागतात आपल्याशी! मात्र हा

JEBIVAK JEBIVAK JEBIVAK

MORE THAN 10,000
JEBIVAK
VACUUM PUMPS
ARE BEING USED IN
VARIOUS INDUSTRIES
AND RESEARCH
CENTRES IN INDIA


THIS WE COULD ACHIEVE
ONLY BECAUSE OF OUR

- BEST WORKMANSHIP
- PROMPT SERVICE &
- REASONABLE PRICES.

FOR ANY
VACUUM PROBLEM
PLEASE CONTACT:-

JBS

UDYOG NAGAR, S. V. ROAD,
GOREGAON (WEST), BOMBAY-62.
PHONE: 692407
GRAM: 'JEBIVAK'—BOMBAY 62.



J. B. Sawant Engineering Private Ltd.

मित्र बेशिस्त खपवून घेत नाही. तो आदर व प्रेम देतो पण तेवढाच आदर व प्रेम मागतोदेखील आपल्यासमोर साऱ्यांनी धरतीवर बसावे वा उभे राहावे अशी साहेबांची इच्छा असते, ते कोणाला बसायला त्यांचे डोके देणार नाहीत !!

साहेबांच्या स्टाफवरील प्रेमावर पुष्कळसे लिहिण्यासारखे आहे. लेखाच्या ऐवजी पुस्तक होईल म्हणून आवरता घेतो.

साहेब देव नाहीत. आणि ते आपण देव आहोत अशी घमेंडदेखील कधी बाळगत नाहीत. मला वाटते, आपण देव नाही ही जाणीव जो बाळगतो तोच खरा माणूस त्या व्याख्येनुसार साहेब सच्चे माणूस आहेत

माणसात काही उणिवा असायच्याच

यशवतरावांना पंडितजी वा मोरारजी यांच्यासारखे आकर्षक व्यक्तिमत्त्व लाभलेले नाही. इतरांसारखा खानदानीपणा त्यांच्याजवळ नाही. त्यांची इंग्रजी भाषा, त्यांचे व्यवहार–सारे तद्दन ' देशी ' आहेत. देशी म्हणजे मराठी !

एका उत्तर भारतीयाने मला मोठ्या मार्मिकपणे सांगितले, " चौहाणदादाके हिंदीको कढीकी बू आती है ! " कढी हा अस्सल मराठी प्रकार. साहेबांच्या हिंदी भाषेला कढीचा वास मारतो. तरी पासष्ट सालपासून साहेब ' जंग, ' ' फजूल ' वगैरे शब्द ' इस्तमाल ' करण्यास शिकले आहेत.

आणि मुख्यतः साहेबांना परदेशी दौरे करायला संधीच मिळालेली नाही ! तशी रशिया-अमेरिकेची धावती मुलाखत त्यांनी संरक्षण मंत्री झाल्यावर घेतली होती. पण त्या वेळी नेहरू जिवंत होते व यशवंतराव अखिल भारतीय राजकारणात ' बच्चे ' होते. त्यामुळे संभाषणात इंदिरा ' मला जॉनसनने असे सांगितले, केनेडी मला असे म्हणाले ' किंवा ' कोसिजीनचे मत तसे नाही असे आहे ' अशा झाकीत जसे बोलते तसे भाषण साहेबांना ' आय् अॅज् द सेंटर ' रंगविता येत नाही –

त्यात यशवंतरावांचा काय दोष ?

आज ते दिल्लीतून आठवड्यापेक्षा जास्त वेळ बाहेर राहिले तर काय होईल ते सांगणे अशक्य आहे. कारण ?

जमाना गटबाजीचा नाही पण कटबाजीचा आहे.

दिल्लीत तुमच्या प्रत्यक्ष हजेरीत कोणचे कट चालतात, कसे धागेदोरे विणले जातात ते सांगणे मुष्कील आहे.

' यशवंतरावांना भविष्यात दगा कोण कोण देईल असे वाटते ? ' असा प्रश्न मी दिल्लीत व दिल्लीच्या बाहेर शंभर वेळा तरी ऐकला असेन. ह्या प्रश्नात मराठी माणसाच्या मनाचा जिव्हाळा व काळजी कळून येते. हा प्रश्न फक्त मराठी वर्तुळातच चर्चिला जातो, म्हणजे पाहा.

यशवंतरावांना मोठा धोका छुप्या सेक्युलर मुसलमान, पार्शी वा अँग्लोइंडियन लोकांकडून आहे. हे बेटे साहेबाचे (म्हणजे गोऱ्या ब्रिटिशाचे) एकेकाळचे कुत्रे !

नंतर नेहरूंचे ! राष्ट्रवाद त्यांच्याजवळ जराही नाही. भारतीय धर्मशाळेत आमच्या कृपेमुळे चरायचे व जेथें खायचे तेथेच विधी करायची वाईट सवय आहे यांना. एका अशाच मोंग्रेल संपादकाचे शब्द मी यशवंतरावांना सांगताच ते चमकून म्हणाले, 'अस्सं !'

नेहरूंना जेथे ही जात हलकी समजायची तेथे यशवंतरावांचे काय होय ? त्यांचा जरूर तो उपयोग त्यांनी खुशाल करून घ्यावा पण डोक्यावर बसू दिले की त्यांनी यशवंतरावांचा रेशमी धाग्याने गळा कापलाच म्हणून समजा.

फकरुद्दीनसाहेबांच्या नादाने एका औरंगाबादच्या रफीक् नामक पुढाऱ्याने यशवंतरावांच्याविरुद्ध काल परवा कोणची कारस्थाने केली ते काय महाराष्ट्र जाणत नाही ? त्याला तेथून निवडून आणण्यासाठी यशवंतरावांनी किती जणांना दुखावले म्हणून सांगू ? या साहेबांनी 'Study of Nehru' लिहून राजकारणात प्रवेश मिळविला. त्या ग्रंथाची 'जयको' या प्रकाशकाने स्वस्त आवृत्ती काढली. मूळ ग्रंथात डॉ. ना. भा. खरे यांचा नेहरूंच्या विरुद्ध अती जहाल असा खमंग लेख आहे. 'जयको'च्या आवृत्तीत या सेक्युलर मुसलमानाने प्रेशर आणून तो प्रसिद्ध होऊ दिला नाही झकेरिया साहेब, मग ई. एम. एस. नम्बुद्रीपाद वा मोदी यांचे कडक लेख आहेत ते का वगळले नाहीत ? मला वाईट वाटते, सेक्युलर फोरम वगैरे लोक अशा प्रमादांची दखलही घेत नाहीत.

तात्पर्य एवढेच, सावध राहा, साहेब. या लोकांची जबान अती मिठ्ठी असते !

यशवंतरावांना दुसरा धोका कम्युनिस्टांचा. यशवंतराव समाजवादी आहेत हे मॉस्को जाणते. पण ते समाजवादी असले तरी भविष्यात टिटोचे बाप होतील ही भीती त्यांना आहे. यशवंतरावांची महाराष्ट्रातील उत्कृष्ट संघटना पाहा, डोळे फाटून जातात. त्या रामरगाड्यासमोर कम्युनिस्टांचे ऑर्गनायझेशन काय कपाळ रडणार ?

दुर्दैवाने, महाराष्ट्राबाहेर शिवसेनेचे ठाकरे लोकांना यशवंतरावांचेच 'बाळ' वाटतात मला त्यात वाईट वाटत नाही. त्यात दरारा आहे, भीती आहे. साहित्य संघात नाके मुरडून कदाचित यशवंतरावांची 'इमेज्' त्याने खराब होईल अशी नाराजी व्यक्त केली जाईल. त्याने इमेज बिमेज काही बिघडत नाही. ।। सामर्थ्य आहे संख्याबळाचे, जो जो वाढवील तयाचे ।। हे वाचस्पतींना कळायला अजून अवकाश आहे. त्यांची मुले अजून मोठी व्हायची आहेत !

यशवंतरावांची शक्ती महाराष्ट्र आहे. जो घरात प्रेम देऊ शकत नाही तो बाहेर जाऊन प्रेमाच्या लंब्याचवड्या बाता मारू लागला तरी जग त्यावर विश्वास ठेवीत नाही. मोरारजींकडे पाहा. त्यांची प्रेमाची पकड गुजराथवर नव्हती. त्यांचे पतन त्यांच्या घरात घडलेले आहे, दिल्लीत नाही. यशवंतरावांनी हे नीट ओळखले नाही तर त्यांचे हितशत्रू – बाईसुद्धा सारे – त्याचा फायदा उठवतील.

सुदैवाने, आज महाराष्ट्रातील ब्राह्मण Anti-politics होत चालला आहे. तो आज महाराष्ट्राबाहेर जाऊन तेथील लोकांचे प्रेम संपादन करून तेथून पुढारी बनतो. मधू लिमये या पुढाऱ्याचे जिवंत उदाहरण डोळ्यासमोर आहे. कोठे पुण्याची शुक्रवार पेठ व कोठे बिहारमधील पाटणानगरी! आणि एकदा तुम्ही बाहेर पडलात की हेल् वुईथ महाराष्ट्र पॉलिटिक्स्!! मग पुण्याचा संबंध फक्त रिटायर्ड झाल्यावरच.

मराठ्यातील जातकुळी ही आताशा नाहीशी व्हायच्या मार्गावर आहे. पण वरचा मराठा वर्ग आज ब्राह्मणाची जागा घेऊ पाहत आहे. अगदी खालच्या मराठ्यास वा महारास भेटा म्हणजे त्याचे खरे दर्द तो तुम्हाला सुनावेल व तुमच्या डोळ्यात अश्रू उभे राहतील.

यशवंतरावांना हे महाराष्ट्राचे बदलते सामाजिक चित्र दिसत नसेल असे नाही. यशवंतराव महाराष्ट्रात असंतोष – जातीय, आर्थिक वा बौद्धिक – माजू देणार नाहीत अशी मला आशा वाटते. नेमके इथे त्यांचे व कम्युनिस्टांचे वाकडे येणार आहे.

यशवंतरावांचा पतंग आता तर कुठे स्थिरावला आहे. या पतंगाच्या दोरीचे नाव महाराष्ट्र! जर कोणा नतद्रष्ट कम्युनिस्टाने वा कम्युनॅलिस्टाने ही दोरी कापण्याचे नुसते प्रयत्न जरी केले तरी यशवंतराव दिल्लीत अस्वस्थ होणार आहेत. एवढे सत्य जरी प्रत्येक सच्चा मराठ्याने जाणले तरी बस्स आहे. बाकी साऱ्या भारतास महा–राष्ट्र बनविण्यास यशवंतराव समर्थ आहेत! यशस्वी टिळकयुगानंतर अर्धशतकाने तरी यशस्वी यशवंतयुग जन्मायची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## समाप्त

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

...मुखपृष्ठ २ वरून

दुखावलेले होते. ही चीड प्रभावीपणे व्यक्त करण्याची मराठी जनतेची रास्त इच्छा होती. हे इच्छाबळ नसते तर बंदला शंभर टक्के यश मिळू शकत नव्हते.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा कामगार-मध्यम वर्गाने लढवला. शासन आणि मालकवर्ग विरुद्ध असताना लढवला. या लढ्याचे उरलेले शेवटचे टोक म्हणजे बेळगाव. यासाठी मालक-सरकार पुढे आणि कामगार-मध्यमवर्ग मागे अशी उलट युती जमून आली. प्रतिपक्षाचे हत्यार ताब्यात घेऊन, त्याच्यावरच ते उलटविण्याच्या मालक-राज्यकर्त्यांच्या कौशल्याचे कौतुक करावे तितके थोडे आहे. हे टोक मात्र शेवटचेच ठरो. नाहीतर महाराष्ट्राबाहेरचे शिवाजीचे सर्व पुतळे उखडले जातील. विजापुरात घडलेला अपवाद कदाचित सार्वत्रिक नियम होऊन बसेल.

दोन मार्चच्या शंभर टक्के यशामुळे शिवसेनेचे एक पाऊल निश्चित पुढे पडलेले आहे. आजवर यशवंतराव-वसंतराव वगैरे महाराष्ट्र काँग्रेस नेत्यांनी केंद्राविरुद्ध वापरण्यास वेळप्रसंगी उपयोगी पडणारे हत्यार म्हणून या सेनेची जोपासना केली. उद्या कदाचित केंद्रात बसून बाईच हे हत्यार या शिवाजीकुलावर उलटविण्याची फार शक्यता आहे. यशवंतराव-वसंतरावादिकांचे महाराष्ट्रावरील एकछत्री नेतृत्व उचकटविण्यासाठी बाई टपून आहेत. शिवसेनेच्या कोकण प्रवेशाच्या हालचाली त्यादृष्टीने सूचक आहेत. कारण पश्चिम महाराष्ट्र यशवंतरावांमागे घट्ट उभा आहे, तसा विदर्भ-कोकण नाही. दोन्हीकडे बाई आपले मोर्चे बांधल्याशिवाय राहणार नाहीत. बाईंना असे छोटेछोटे तुकडे गिळंकृत करायला सोपे वाटतात. पंजाबात त्यांनी अकालींना जवळ केले. दक्षिणेत डी. एम्. के. चा पाठिंबा मिळविला. किंमत मोजली की असले चंचल तुकडे इकडून-तिकडे हवे तसे फिरवता येतात, वापरता येतात. त्या वेळी यशवंत-राव-वसंतरावादिकांना असे वाटल्यावाचून राहणार नाही—हे काय फळ मम तपाला!

**श्री. ग. मा.**

MANOOS (Weekly) : 80 Paise : Regd. No. M–H 649



" महाग होणार म्हणून तूच या चहात साखर कमी घातलीय्स की महागाईच्या कल्पनेनं मलाच तो गोड लागत नाहीय् ? ... "